IRBK-0100163

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १६३

ची

नंबर १

थासार

विष्णुचा दहावा अवतार.



IRBK-0100163
IRBK-0100163

किंमत १२ आणे.

IRBK-0100163

IRBK-0100163

दा. क्र. १६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

11 MAY 2000

7 OCT 2013

7 OCT 20

IRBK-0100163

पुराणोक्त कथासारमाला.

श्रीशंकर प्रसन्न.

# कल्कीचरित्र-कथासार

अथवा

# विष्णूचा दहावा अवतार.

संग्रहालय, ठाणे.

लेखक—हरि विठ्ठल धावडे.

प्रकाशक—

**पी. बी. पाठक,**

**बुकसेलर्स व मार्केट जनरल एजंट्स**

जुम्मा मसीद व गिरगांव—मुंबई.

प्रिंटर—श्रीराम सीताराम वर्तक, यांनीं

चौपाटी पोष्टाजवळ " शंकर " प्रिंटिंग प्रेसांत छापिलें.

शके १८३७, सन १९१५.

[ सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत. ]

किंमत १२ आणे.

IRBK-0100163

पुराणोक्त कथासारमाला.

श्रीशंकर प्रसन्न.

# कल्कीचरित्र-कथासार

अथवा

# विष्णूचा दहावा अवतार.

लेखक—हरि विठ्ठल धावडे.

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे
... क्रमांक ...१८२

प्रकाशक—

पी. बी. पाठक,

बुकसेलर्स व मार्केट जनरल एजंट्स्
जुम्मा मसीद व गिरगांव—मुंबई.

प्रिंटर—श्रीराम सीताराम वर्तक, यांनीं-
चौपाटी पोष्टाजवळ " शंकर " प्रिंटिंग प्रेसांत छापिलें.

शके १८३७, सन १९१५.

[ सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत. ]

किंमत १२ आणे.

# प्रस्तावना.

वेदव्यासांनीं रचिलेल्या पुराणांपैकीं कल्की पुराणांतील कथा या पुस्तकांत सरळ गोष्टीरूपानें लिहून या पुस्तकास **कल्कीचरित्र–कथासार** अथवा **विष्णूचा दहावा अवतार** असें नांव दिलें आहे. यांतील कथा जरी पुढें होणाऱ्या भविष्यरूप आहेत तरी त्या भूतकाल रूपानेंच लिहिल्या आहेत.

या कलियुगांत पुढें दिवसेंदिवस अधर्म व कली कसे वाढतील व ते वाढल्यामुळें वर्णसंकर होऊन पृथ्वीला भार होईल; तो उतरण्याकरितां श्रीविष्णु दहावा कल्की अवतार घेऊन पृथ्वीवर संचार करून जैन, बौद्ध, म्लेंच्छ इत्यादि पाखंडी, दुष्ट, अधर्म व कलीचें कूळ यांच्याशीं तुंबळ युद्धें करून व त्यांचा संहार करून, सत्ययुगाची स्थापना करील. इत्यादि अद्भुत व मनोहर अशा कथा वर्णन केल्या आहेत. त्यांच्या वाचनानें आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचें मनरंजन होईल.

मुंबई, ता. १।११।१५.

लेखक.

श्रीशंकर प्रसन्न.

१६३
२८०५३

# कल्कीचरित्र-कथासार.

## अध्याय १ ला.

### मंगलाचरण व कलीचा जन्मवृत्तांत.

हे विनायका, लंबोदरा, संकटहारका गणाधीशा ! कार्यारंभीं तुझ्या पादपद्मास नमन करितों. तरी सर्व विघ्नें दूर करून मला तात्काळ सिद्धि देऊन कामना पूर्ण कर. तसेंच वीणादंड हातीं घेऊन चतुर्दश विद्येची बुद्धिदाती जी सरस्वती देवी, तिला माझा नमस्कार असो. हे सरस्वती माते ! मला ग्रंथकथा वदविण्याची स्फूर्ति दे. हे धूतपापेश्वरनामक देवा श्रीशंकरा ! तुझा महिमा ब्रह्मादिकांसही कळत नाहीं, तुझें जे स्तवन करितात त्यांचे मनोरथ पूर्ण होतात. त्या तुला माझा साष्टांग दंडवत असो. तसेंच भवानी पार्वती देवी, श्रीगुरुराज दत्तात्रय यांस नमन करून, संतसज्जन व व्यास वाल्मिकादि कविजन यांस नमन करितों. आणखी इंदिरावर-श्रीलक्ष्मीनारायण यास नमन असो. तरी आतां श्रीभगवंता ! कल्किविजयाची जी भविष्यकथा ती माझ्या मुखानें वर्णन करण्याची मला स्फूर्ति दे, हेंच माझें मागणें आहे.

आतां माझा पिता रघुनाथ व माता सीता यांच्या चरणीं मस्तक ठेवून कथेस आरंभ करितों.

नैमिषारण्यांत सूत शौनकादि ऋषींस अनेक पुराणकथा सांगत असतां अकस्मात् ह्मणाले-जो कलियुगांतील कलि-कुलास, व परिवारासह अधर्मास आणि पृथ्वीला त्रास देणाऱ्या राजांस व पाखंड्यांस मारून टाकून, सत्ययुगाची स्थापना करून, धर्माचा प्रसार करील, असा द्विज कुळांत उत्पन्न झालेला कल्क्यावतारी श्रीभगवान् सर्वांचें रक्षण करो.

अशी सूतांची वाणी ऐकून समस्त ऋषि ह्मणाले-हे त्रिका-लज्ञ महामुने ! अधर्म कली ते कोण व त्यांचें कुल उत्पन्न कसें झालें ? आणि त्यांनीं सत्यधर्माचा संहार कसा केला व कल्की नामक श्रीलक्ष्मीपती कोणत्या स्थानीं प्रगट होऊन, त्यानें दुष्ट अधर्म कलिकुलाचा संहार करून, सद्धर्म कृतयुग कसें स्थापिलें ? ती सविस्तर कथा आह्मांस कथन करावी.

असा ऋषींचा प्रश्न ऐकून श्रीलक्ष्मीनारायणाचें ध्यान करून, ऋषींस ह्मणाले-ऋषिजनहो ! आतां मी तुह्मांस परमा-द्भुत भविष्यकथा सांगतों श्रवण करा. पूर्वी नारदानें ब्रह्मदेवास हाच प्रश्न केला होता, तेव्हां ब्रह्मदेवानें नारदास, नारदानें व्यासास व व्यासानें स्वपुत्र शुक यास हीच कथा सांगितली होती. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर अभिमन्यूचा पुत्र परि-

क्षिती राजा याला ब्रह्मशाप बाधला. ह्मणून तो जन्मसार्थक करण्याच्या इराद्यानें गंगातीरावर येऊन प्रायोपवेशन (एकदां जें आसन घातलें तें मरणपर्यंत न ढळविणें.) मांडून हरि-ध्यान करित बसला. तों तेथें मार्कंडेयादि ऋषिगण आले; त्यांच्यामागून शुक योगींद्र आला. त्या सर्वांस परिक्षितीनें नमन करून, त्यांचें यथाविधि पूजन केलें आणि हात जोडून प्रार्थना केली कीं—

" हे सर्वज्ञा ज्ञानसमुद्रा शुकमुने! मजवर कृपा करून माझ्या कल्याणास्तव बोध सांगावा. मी लक्ष चौऱ्यायशीं योनींत दुःख भोगून पूर्व सुकृतानें दुर्लभ मानवदेहास आलों आहें. येथें मोक्षाचा लाभ होईल. मनुष्यजन्मावांचून कोठेंही शुभ कल्याण होणें नाहीं. मी आजपर्यंत काळ व्यर्थ घालविला. आजपासून सातव्या दिवशीं मला मरण येणार आहे. तरी मला कांहीं तरणोपाय असल्यास तो सांगून माझा उद्धार करावा "

असें राजाचें वचन ऐकून, श्रीशुकानें अठरा हजार श्लोकांचा श्रीमद्भागवतधर्म राजास सांगितला. मग सात दिवस पूर्ण होतांच परिक्षिती मरण पावला, परंतु त्याचा भविष्य प्रश्न एक शेष राहिला. मग मार्कंडेयादि मुनींनीं पुण्याश्रमीं जाऊन तोच प्रश्न शुकास विचारला; तेव्हां त्यानें मोठ्या

आनंदानें त्यांस सांगितला. त्यावेळीं मीही तेथें होतों. असें बोलून सूत ऋषींस ह्मणाले—श्रीकृष्ण निजधामीं जातांच कली उत्पन्न झाला. त्याची कथा सांगतों ऐका.

विश्वोत्पत्तीस आदिकारण जो ब्रह्मा त्यानें ब्रह्मांडप्रलयाचे अंतीं आपल्या पाठीपासून स्वपापरूपी घोर मूर्ति उत्पन्न केली तोच अधर्म होय. त्याच्या वंशाचें वर्णन, श्रवण, मनन जो करील तो सर्व पापांपासून मुक्त होईल. ह्मणून त्याचा परिवार सांगतों ऐका.

जो पापखाणी दुष्ट अधर्म त्याच्या वायकोचें नांव मिथ्या तिच्यापासून क्रूर स्वभावाचा दंभ पुत्र व माया नांवाची कन्या झाली. दंभाला बहीण माया हिच्यापोटीं लोभ नांवाचा पुत्र व निवृत्ति नांवाची कन्या झाली. लोभ व निवृत्ति यांच्या संगानें हिंसा कन्या व क्रोध नामक पुत्र झाला. हिंसेस क्रोधापासून दुरुक्ति कन्या व कली यांचा जन्म झाला. कलीनें आपलें लिंग डाव्या हातांत धरलें आहे. कलीचा वर्ण काजळासारखा असून, पोट कावळ्यासारखें, तोंड अक्राळ विक्राळ, जीभ लोंबती, व अंग दुर्गंधीयुक्त असून सोनें, स्त्री, मद्य, जुगार यांच्याठायीं त्याची वस्ती निरंतर असते. अशी कलीची उत्पत्ति झाली.

पुढें कलीराजापासून दुरुक्तीच्या पोटीं भय नांवाची कन्या

व मृत्यु नांवाचा पुत्र झाला. मृत्युपासून भय वहिणीच्या पोटीं निरय पुत्र व यातना कन्या उपजली. निरयानें यातनेच्या पोटीं हजारों कन्या उत्पन्न केल्या. अशा रीतीनें कलीच्या कुलांत अनेक पापी दुरात्म्यांनीं जन्म घेतला. ते कलीचे साह्यकारी आधि, व्याधि, जरा, ग्लानि, दुःख, शोक व भय यांचे ठायीं आपला वास करावयास लागून, यज्ञ, अध्ययन, दान, वेद, तंत्र, सद्धर्म, स्नानसंध्यादि पुण्यकर्मांचे नाशकर्त्ते होतील. पुढें जनांची रीती कशी होईल ती ऐका.

पुढें सर्व पृथ्वीवर क्षणिक कामुक नरनारी पितृमातृहिंसक, दुराचारी व ढोंगी होतील. ब्राह्मण स्नानसंध्येविरहित शूद्र सेवेंत लीन होतील; व ते वेदविक्रय, कुतर्कवादी, धर्मविक्रय, रस, मांस, कन्या विक्रयकर्त्ते होतील. ब्राह्मणादि चारी वर्ण शिश्नोदरपरायण, क्रूर, परस्त्रीरत, उन्मत्त होऊन वर्णसंकर करण्यास सिद्ध होऊन सर्व खुजे ( ठेंगणे ) होतील. मठांतील संन्याशादिक शठ, दुराचारी होतील. सर्वांचें आयुष्यप्रमाण सोळा वर्षांचें होईल. मस्तकावरील केंस हेंच भूषण मानतील, नीचांची संगत, भावांशीं कलह, मेवण्यांशीं प्रीति व आप्तजनांशीं कलह नित्य होत जातील. आईबापाची निंदा व पत्नीची स्तुति करतील. धनवानांस कुलवान् व दुराचारी जे ब्राह्मण त्यांस पूज्य मानतील. संन्यासी, गृह-

स्थाश्रमी, अविवेकी गृहस्थ होऊन सर्व गुरूंची निंदा करतील; साधुसंतांस फसवून त्यांचें धन घेतील, धर्माचरण करणारास पीडा देतील. स्वधर्म सोडून परधर्माचा स्वीकार करून, परस्त्री व परसंपत्ति यांचें हरण करतील. उंच वर्णाचे लोक शूद्र होऊन दानें घेतील व वेदवाक्यें बोलतील. स्त्री पुरुषांचें भोगदान हेंच विवाहलक्षण होईल. मैत्री, क्षमा, दातृत्व नाहींसें होईल. कन्यादानाचे विधि नष्ट होऊन, चावटपणा हेंच पांडित्य समजतील. जे धनवान् तेच साधु, दूरच्या जलास मोठें तीर्थ समजून त्याची पूजा करतील. जानवें धारण करणारास ब्राह्मण, दंडधारण कर्त्यांस संन्यासी मानतील. ब्राह्मण महाचांडाळांच्या घरीं यज्ञकर्में चालवितील, स्त्रिया पातिव्रत्यधर्म आचरणार नाहींत, वेश्यांच्या संगतीनें त्यांस सुख वाटेल. त्या पतीचा त्याग करून परपुरुषीं रत होतील, आणि जांघा व स्तन परपुरुषास दाखवितील. गतभर्तृका वैधव्याचा त्याग करून स्वच्छंदानें पृथ्वीवर फिरूं लागतील.

अशा प्रकारें चारी वर्णांचे नारीनर स्वधर्माचार सोडून पृथ्वीवर फिरतील. मग पृथ्वीवर दारुण अधर्माचार होतांच, सर्व देशांत मेघ विचित्र वृष्टी करतील. धान्य अल्प पिकूं लागेल. राजे प्रजाभक्षक होऊन, कर दानादिकांनीं जनांस

पीडा देतील. म्हणून क्षोभलेले सर्व जन खांद्यावर बोजा व हातांत पुत्र घेऊन, भयंकर वनें, पर्वत, अरण्यें यांत वास करून, फळें, मुळें, मध, मांस, मत्स्य कूर्मादिक जलचरें यांचें भक्षण करून त्यांवर आपली उपजीविका चालवितील.

अशी वर्तणूक कलीच्या पहिल्या चरणांत होऊन, लोक श्रीकृष्णाची निंदा करूं लागतील. दुसऱ्या चरणांत श्रीकृष्णाचें नांव कोणीही उच्चारणार नाहीं. तिसऱ्या चरणांत वर्णसंकर होईल, चवथ्यांत समग्र जन एकवर्णी होतील. मग स्वाहा स्वधाकार वषट्कार, वेदाध्ययन आणि ॐकार इत्यादि सत्क्रियाचार समग्र बुडतील. त्यामुळें स्वर्गांतील देवांचीं अवदानें बंद होऊन त्यांस पीडा होईल. याप्रकारें पुढें पृथ्वीस व इंद्रादि सर्व देवांस दुःखशोकाचे महाराशींत पडावें लागेल.

---

## अध्याय २ रा.

## देवांचें ब्रह्मदेवाशीं गाऱ्हाणें व कल्कीचा जन्म.

मग पृथ्वीनें दीन गाईचें रूप धारण केलें. तिला इंद्रादि देवगणांनीं पुढें घालून, आपलें दुःख ब्रह्मदेवास जाऊन सांगावें असा विचार करून, सर्व ब्रह्मलोकीं आले. त्या ब्रह्मलोकाची शोभा अवर्णनीय होय. ब्रह्मदेव सनकसनंदन नारदादि सिद्धांसह आपल्या सिंहासनावर बसला असतां,

त्यांच्या पुढें सर्व देव जाऊन साष्टांग नमस्कार घालून, हस्त जोडून म्हणाले–"हे प्रभो सृष्टिकरा! आम्हांस या ब्रह्मांडांत थारा राहिला नाहीं. कलीच्या दोषानें सर्वत्र धर्महानी होऊन, यज्ञयागादि कर्मैं कोणीच करीत नाहींत; त्यामुळें आम्हांस अवदान न मिळून, आम्हीं अन्नावांचून अति दीन झालों आहों, पाखंडी जन मातून सत्यधर्म नष्ट झाला. जिकडे तिकडे म्लेंच्छादिक जीवहिंसा करीत फिरत आहेत, स्नान-संध्यादि कर्मैं बंद पडलीं, नर मद्यमांसभक्षक झाले, जिकडे पहावें तिकडे अधर्म पसरला असून,मानव घोर कर्मैं आचरण करित आहेत,हरिपूजन नामकीर्तन कोणी करीत नाहीं.दुष्टांच्या भारानें पृथ्वी त्रासून, गाईच्या रूपानें तुम्हांस शरण आली आहे तरी आपण कृपाळू होऊन आमचें रक्षण करावें."

अशी देवांची वाणी ऐकून ब्रह्मदेव म्हणाला–देवहो! तुम्हीं काळजी करूं नका. आतां आपण हरीजवळ जाऊन त्यास प्रसन्न करून कार्य साधून घेऊं. असें बोलून ब्रह्मदेव पृथ्वी, देव यांसह गोलोकीं येतांच, सर्वांनीं साष्टांग नमस्कार घालून, स्तुति करून म्हणाला–हे मोक्षदात्या! कर्ता कर-विता तुजवांचून दुसरा कोणी नाहीं. हे जगन्नियंत्या लक्ष्मी-कांता! तुला सर्व वृत्तांत कळत आहे तरी विनंति हीच कीं–"पृथ्वीवर कली अधर्म मातून त्यांनीं सर्वांस त्रास दिला

आहे. जन पाखंडी बनून हिंसा करूं लागले; संत परागंदा झाले; स्नान, संध्या, हरिपूजन, पंचयज्ञ इत्यादि सत्कर्मे बुडून गेलीं.

असा पृथ्वीवर अधर्माचा प्रसार झाल्यामुळें देव अपार दुःखें भोगून इंद्रादिकांस उपोषणें घडत आहेत. पाखंडी राजे बनून, सद्धर्म राहिला नाहीं. यास्तव देवगण व पृथ्वी गाईच्या रूपानें दीननाथा तुला शरण आली आहे, तरी आपण रक्षण करावें" असें वचन ऐकतांच हरि प्रसन्न होऊन म्हणाला–"हे कमलोद्भवा ! माझ्या वचनावर विश्वास ठेवून सर्वांनीं स्वस्थ असावें. मी शंभल गांवांत विष्णुयश नांवाच्या ब्राह्मणाच्या सुमति स्त्रीच्या पोटीं कल्की नांवानें अवतार घेऊन तीन बंधूंसह देशोदेशीं फिरून, कलीकुलाचा नाश करीन. तुम्हीं त्रिवर्ग देव माझ्या आईच्या पोटीं जन्म घेऊन माझे वडील बंधु होऊन मला साह्य करा. तसेंच सर्व देवांनीं अंशावतार घेऊन मला मदत करावी. माझी कांता रमा सिंहलद्वीपांत कौमुदीच्या पोटीं जन्म घेऊन बृहद्रथ राजाची कुमारी पद्मा नांवानें होईल. तिचें पाणिग्रहण करून, मरु व देवापि राजांस कलाप गांवांतून आणून, त्यांची राज्यावर स्थापना करीन, आणि जैन म्लेंच्छादि पाखंड्यांचा सह-परिवारें संहार करून, दुष्ट अधर्म कलिकुलास स्वबळानें मारीन

व पुनः कृतयुगाची स्थापना करून सद्धर्माची सुरुवात करीन. यज्ञयागादि कर्म चालू करून, सकल जनांचें रक्षण केल्यावर मग निजधामास जाईन. ”

अशी हरीची अभयवाणी श्रवण करून ब्रह्मदेव, पृथ्वी व सर्व देव आपापल्या स्वस्थानीं गेले. पुढें हरीच्या आज्ञेप्रमाणें कल्कीस साह्य करण्याकरितां देव अंशरूपानें अवतार घेऊन, पृथ्वीवर राहिले. तेच गार्ग्य भर्ग्यादिक प्रसिद्धीस येऊन लक्ष्मीपती कधीं जन्म घेतो याची वाट पहात राहिले. तों शंभल गांवांत विष्णुयश ब्राह्मणाच्या सुमती स्त्रियेच्या पोटीं ब्रह्मा, विष्णु व शंकर अंश रूपानें भगवंतास साह्य करण्याकरितां अवतरले. त्यांचीं नांवें कवि, प्राज्ञ व सुमंत्रक अशीं ठेविलीं. ते तिन्हीं बाळ दिवसेंदिवस वाढूं लागले.

पुढें कांहीं काळ लोटल्यावर सुमती गर्भवती होऊन, तिच्या पोटीं भगवंतांनीं अवतार घेतला. त्यावेळीं तिच्या तेजांत चंद्रसूर्यही झांकून जात होते. त्यावेळीं जिकडे तिकडे शुभ चिन्हें भासूं लागलीं, सर्वांच्या चित्तवृत्ति पालटून गेल्या, व आतां नारायण नररूपी होणार ह्मणून देव, ऋषि आदिकरून आनंदित होत्साते मार्गप्रतिक्षा करीत राहिले.

नंतर सुमतीचे नव मास पूर्ण भरतांच वसंतऋतुमध्यें वैशाख महिन्याच्या शुद्ध द्वादशीस भगवंतांनीं जन्म घेतला.

त्यावेळीं शंभल गांवांत विमानांची दाटी झाली, देवांनीं पुष्पवृष्टि केली, अप्सरांचें गायन वादन सुरू झालें. असो. सुमति एकांत स्थानीं बसली असतां, तिनें आपल्यापुढें अकस्मात् पांच वर्षांची दैदीप्यमान मूर्ति पाहिली. त्यावेळीं ती ब्रह्मानंदांत डुलूं लागली. कल्केश्वराच्या सेवेकरितां मातृका, योगिनी, सरस्वत्यादि देवस्त्रिया, देवता, तीर्थें गुप्त रूपानें प्राप्त झालीं.

इकडे ब्रह्मदेवास कळलें कीं, हृषिकेशी विष्णुयशाचे सुमतीच्या घरीं चतुर्भुज रूपानें प्रगटला आहे. तेंव्हां ब्रह्मदेवानें वायूस बोलावून आज्ञा केली कीं, आतांच तूं शंभल ग्रामांत जाऊन श्रीहरीस सांग कीं, आपलें चतुर्भुज रूप गुप्त करून मानवरूप घे. अशी ब्रह्मदेवाची आज्ञा ऐकून वायु शंभल ग्रामांत विष्णुयशाच्या सूतिकागृहांत गुप्तरूपानें येऊन हरीच्या कानाजवळ जाऊन म्हणाला–" अगा लक्ष्मीरमणा ! ब्रह्मदेवाचा निरोप सांगतों ऐक. तुझें हें चतुर्भुजरूप इंद्रादिकांसही दुष्प्राप्य आहे, यास्तव त्याचा लोप करून मानवरूप घे."

असें ब्रह्मदेवानें सांगितलेलें वायूचें वचन ऐकतांच नारायण नूतन बालकाप्रमाणें होऊन, सुमतीच्या पुढें टाहो फोडीत मोठ्यानें रडूं लागला. तोंच सुमति शुद्धीवर येऊन, मुलास पाहून आश्चर्यचकित झाली. सुमतीस पुत्र झाल्याची बातमी

नगरांत पसरतांच, मंगलवाद्यांचा घोष सुरू झाला, आकाश नादानें दुमदुमून राहिलें. सुवासिनी हळदी कुंकवाचीं ताटें भरून धांवत आल्या. विष्णुयशानें ब्राह्मणांस अपार दानें वांटिलीं, व जातक संस्कार कर्म केलें, नारायण जन्मास येतांच, समस्त जनांचीं मनें प्रसन्न होऊन ते आनंदानें वर्तन करूं लागले. सर्वांच्या दुष्ट बुद्धींचा नाश होऊन देव स्वर्ग-भुवनीं आनंदानें वागूं लागले.

पुढें बाराव्या दिवशीं विष्णुयशानें ब्राह्मणांस बोलावून, मुलाचें नांव काय ठेवावें याचा विचार करित असतां, चार चिरंजिव कृपाचार्य, वेदव्यास, परशुराम व अश्वत्थामा बाल-रूप हरीच्या दर्शनाकरितां भिक्षु वेषानें आले. त्यांचा विष्णु-यशानें आदरसत्कार करून, त्यांस उत्तमासनावर आणून बसविलें, आणि षोडशोपचारें पूजन करून प्रार्थना केली कीं, महाराज! आपल्या आगमनानें आज जन्माचें सार्थक झालें. तुमच्या सारख्यांचें दर्शन सुकृतावांचून प्राप्त होणें नव्हे तें आज अनायासें प्राप्त झालें! तरी आतां या मुलाचें नांव काय ठेवावें तें सांगा.

विष्णुयशाचें वचन ऐकून कृपाचार्यादि चौघेजण म्हणाले— हे विष्णुयशा! हा तुझा पुत्र कलिकुलाचा नाश करणारा होईल, यास्तव याचें कल्की असें नांव ठेवावें. मग त्यांनीं

विधियुक्त नामकरण संस्कार केल्यावर विष्णुयशानें त्यास वस्त्रालंकारादिक अपार दानें दिलीं व सर्वांस भोजनें घालून बोळवण केली.

कल्की दिवसेंदिवस शुक्लपक्षांतील चंद्रकलेप्रमाणें वाढत असतां, अनेक प्रकारच्या बालक्रीडा करूं लागला. त्या वर्णन करावयास शेषाचीही मति कुंठित झाली; तेथें माझी मति काय चालणार ? असो. पुढें कल्की आईबापांस बाललीला दाखवित असतां सात वर्षांचा झाला. त्याचें मौंजीबंधनवृत्त पुढील अध्यायांत कथन केलें आहे.

## अध्याय ३ रा.

# कल्कीचा विद्याभ्यास, शंकरापासून वरप्राप्ति व विशाखयूप राजाची भेट.

कल्कीचे वडील बंधु कवि, प्राज्ञ व सुमंत्रक केवळ साधुसारखे धर्मतत्पर झाले. व गार्ग्य भर्ग्य विशालादिक जे कल्कीचे आप्त तेही कल्कीच्या अनुकूलतेनें वर्तत असत. तसेंच विशाखयूप राजा व इतर प्रजाजन यांचीं दुःखें नाहींशीं होऊन ते आनंदानें वर्तन करूं लागले. तों कल्कीस सात वर्षें होऊन आठवें लागलें. तेव्हां विष्णुयश पुत्रास ह्मणाला—हे सर्वोत्तमा गुणनिधाना ! आतां तुझें मौंजीबंधन करावें असें मला वाटतें.

तरी तुझी मुंज करून, कंठांत यज्ञसूत्र घालून, गाईत्रीमंत्राचा उपदेश तुला करावितों. गाईत्रीमंत्रावांचून ब्राह्मणपणा येत नाहीं व वेद पठणावांचून अधिकार प्राप्त होत नाहीं. ह्मणून तुझें उपनयन केलें ह्मणजे तुला ब्राह्मणपण येईल.

असें पित्याचें वचन ऐकून कल्कीनारायण ह्मणाला–अहो ताता ! आपण वेद ह्मणतां तो कोण व तो जगांत कसा उत्पन्न झाला ? सावित्री ( गाईत्री ) ती कोण व कोणत्या सूत्रानें संस्कार केला असतां ब्राह्मणपणा येतो ? असा कल्कीचा प्रश्न ऐकून विष्णुयश ह्मणाला–वेद ह्मणजे हरीची वाणी व सावित्री ती वेदांची माता. त्रिगुण केलेल्या सुतानें ( ह्मणजे ज्यास तीसुती ह्मणतात तें तीनपट केलें ह्मणजे नवसुती होतें त्या सुतानें ) ब्राह्मणपण येतें. ज्या ब्राह्मणाचे दशसंस्कार झाले ते ब्रह्मवेदी ब्राह्मण चार वेदांचें अध्ययन करून त्रैलोक्य पोषक होतात. व ते तंत्रविधीनें, यज्ञ, अध्ययन, दान, तप, स्वाध्याय व संयमादिकेंकरून विष्णूस प्रसन्न कर्त्ते होतात. ह्मणून विप्र व बांधवांसमक्ष तुझा मौंजीसंस्कार करण्याचें योजिलें आहे.

हें ऐकून पुनः कल्की ह्मणाला–बाबा ! ब्राह्मणांचे दहा संस्कार कोणते व ते विष्णूची पूजा कशी करितात ? बाप ह्मणाला–जो ब्राह्मणापासून त्याच्या धर्मपत्नी ब्राह्मणीच्या

गर्भांत उत्पन्न झाला व ज्याचे गर्भदानादि संस्कार झाले आहेत, जो त्रिकालसंध्या व सावित्रीची पूजा व जप करतो तो तपकर्त्ता होय. जो सत्यवादी धर्मात्मा ब्राह्मण विष्णूची पूजा करतो, तोच संसाराचें रक्षण करील. अशा प्रकारचें जें वर्तन तेंच हरीचें अर्चन जाणावें.

असें बापाचें वचन ऐकून कल्की म्हणाला—अहो ताता! जे ब्राह्मण जगास तारून, लक्ष्मीकांतास तोषवितात ते आतां कोठें आहेत? विष्णुयश ह्मणाला—बालका! सांप्रत दुष्ट कलिकुल ब्रह्महत्या व धर्मनाश करणारें उत्पन्न झालें आहे. त्या कलीच्या भीतीनें ते ब्राह्मण देशांतरास पळून गेले आहेत. व जे अल्पतपी ब्राह्मण कलियुगांत आहेत ते शिश्नोदरपरायण, मलीन, अधर्मीरत, क्रियाहीन असे झाले आहेत. असें बापाचें वचन ऐकतांच कल्कीनारायणाच्या मनांत कलिकुळाचा नाश करण्याची अभिलाषा उत्पन्न झाली.

मग विष्णुयशानें ब्राह्मणांस व आप्तजनांस बोलावून उत्तम प्रकारचा उत्सव समारंभ करून, कल्कीचें उपनयन आरंभून यज्ञोपवीत गळ्यांत घातलें व गाइत्री मंत्राचा उपदेश करविला. नंतर कल्की वेदाध्ययन करावें म्हणून उत्तम गुरूच्या शोधाकरितां वनोपवनें फिरत महेंद्र पर्वतावर आला. तों तेथें परशुराम राहात होता. त्यास कल्की आल्याचें कळतांच, तो

त्याच्या जवळ जाऊन ह्मणाला—हे कल्के! मी भृगुवंशांतील जमदग्नीचा पुत्र, वेद, शास्त्रें, पुराणें, धनुर्विद्या यांत प्रवीण असून, मी एकविस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी करून, ती ब्राह्मणांस दान दिली. पुढें तपाचरण करावें ह्मणून येथें राहिलों आहें. माझें नांव परशुराम असें आहे तरी आतां तूं माझ्याजवळ राहून, चार वेद व व्याकरणादि शास्त्रें यांचें पठन कर.

असें भार्गवाचें वचन ऐकतांच, कल्कीनें नमस्कार घातला. मग तेथेंच राहून परशुरामास गुरु करून षडंग वेदाचा अभ्यास केला व धनुर्विद्या व्याकरणादि शास्त्रें शिकून चतुःषष्ठीकलेंत कल्की प्रवीण झाला. नंतर कल्की गुरुजीस ह्मणाला—गुरुजी, मी तुमच्यापासून विद्या शिकलों तरी आतां तुमच्या संतोषास्तव गुरुदक्षिणा काय देऊं? गुरुदक्षिणा दिल्यावांचून विद्या सफल होत नाहीं; यास्तव इच्छित दक्षिणा मागून घ्या.

असें कल्कीचें वचन ऐकल्यावर परशुराम हर्षित होऊन ह्मणाला—हे दीननाथा दयासागरा! तूं साक्षात् भगवान् असून, तुझा सर्वांस आश्रय आहे. कलिकुलाचा विध्वंस करण्याकरितां ब्रह्मदेवानें तुझी प्रार्थना केली ह्मणून तूं शंभली गांवांत सुमतीच्या कुशीस उत्पन्न झालास. तूं प्रत्यक्ष देवाधिदेव असून, कारणास्तव मानवावतार घेऊन मजपासून सर्व

विद्या शिकलास. तरी आतां शिवाचें पूजन करून त्याच्या पासून कामग अश्व, खड्ग व पोपट मिळवून घे. मग सिंव्हल-द्विपास जाऊन पद्मेचें पाणिग्रहण करून, स्वसामर्थ्यानें सर्वत्र सद्धर्माची स्थापना करशील. पुढें दिग्विजयाच्या मिषानें कलीस प्रिय असणारे अधर्मी भूप व बौद्ध म्लेंच्छादि पाखं-ड्यांस स्वबळानें जिंकशील. आणि मरु, देवापि राजांस पृथ्वीवर स्थापून, यज्ञयागदानें चालू करशील. त्या तुझ्या साधुकृत्यांनीं आह्मीं संतोषित होऊं व यज्ञदान तपकर्माचें आचरण करावयास लागूं. तीच आमची उत्तम गुरुदक्षिणा होय. दुसरें आह्मांस कांहीं नको.

असें भार्गवाचें वचन ऐकून, कल्कीस आनंद झाला. मग चरणावर मस्तक ठेऊन ह्मणाला–गुरुजी ! आतां मला घरीं जाण्यास आज्ञा द्यावी. नंतर परशुरामानें आज्ञा देतांच, कल्की घरीं येण्याकरितां निघाला. तो वनोपवनें उल्लंघन करीत शिवक्षेत्रांत बिल्वोदक नामक शंकराच्या देवळांत येऊन, पूजा करून मधुर वाणीनें स्तुति केली.

अशी स्तुति ऐकतांच पार्वतीसह शिव प्रगट होऊन, कल्कीच्या आंगावरून हात फिरवून ह्मणाला–हे कल्के ! तुझ्या स्तुतीनें मी संतुष्ट झालों तरी इच्छित वर मागून घे. तूं जें माझें स्तवन केलेंस त्याचें पठण जे नर करतील त्यांच्या

सर्व इच्छा पूर्ण होतील. तरी आतां तुला हा कामग नामक घोडा शीघ्रगतीनें चालणारा, खड्ग व हा पोपट देतों. यांच्या साह्यानें दुष्टांस समरीं जिंकून, पृथ्वीचा भार उतरून धर्माची स्थापना कर. तूं सर्व शस्त्रास्त्रें, षडंगवेदार्थ जाणणारा अशा तुला सर्व जयी असे बोलतील.

असें शिवाचें वचन ऐकून, कल्की घोडा, खड्ग व पोपट यांचें ग्रहण करून, गौरिहरास साष्टांग नमून घोड्यावर स्वार होऊन शंभलपुरांत आला. आणि माता पिता व आप्तजन यांस नमन करून, भेटून परशुरामापासून विद्या व शिवापासून प्राप्त झालेल्या वराचा वृत्तांत कथन केला. तो ऐकून सर्वांस व विशाखयूप राजास अत्यानंद झाला. त्यानें आपल्या माहिष्मती नगरींतील चतुर्वर्णांस याग दान तपें व्रतें करण्याची आज्ञा देऊन, पितापुत्र न्यायानें प्रजेचें पालन करूं लागला. तेव्हां लोभनृतादि पापराशी जे अधर्मवंशी होते ते दूर पळून गेले.

पुढें एके दिवशीं कल्की भगवान् शिवानें दिलेल्या अश्वावर स्वार होऊन, हातांत खड्ग व धनुष्यबाण घेऊन, सहपरिवारासह नगराबाहेर येत असतां, विशाखयूप राजा कल्कीस पाहण्याकरितां निघून आला. त्यावेळीं कल्की शंभलपुराच्या बाहेरील प्रदेशांत गार्ग्यभर्ग्यादि ज्ञातिजनांसह, घोड्यावर

बसलेला होता. त्यास विशाखयूप राजानें पाहतांच साष्टांग नमस्कार घातला. त्यावेळीं राजास फारच आनंद झाला.

## अध्याय ४ था.

# वर्णाश्रमकथन व कल्कीशुकसंवाद.

विशाखयूप राजानें कल्कीस साष्टांग नमस्कार घालतांच, कल्कीनें त्यास दयार्द्र दृष्टीनें अवलोकन करितांच, राजा पूर्णात्मा असा वैष्णव झाला. असें त्याचें अंतर कल्कीनें जाणलें. मग त्याला जवळ वसवून वर्णाश्रमधर्म सांगितला आणि ह्मणाला-वा विशाखयूपा ! तूं आज माझें स्वरूप पाहिलेंस तेणेंकरून जगीं धन्य झालास. मी प्रत्यक्ष नारायण कलीच्या नाशास्तव विष्णुयशाच्या पोटीं नरदेहानें उत्पन्न झालों. गार्ग्य भर्ग्यादिक माझे ज्ञातीय हे सर्व देवांचे अंश माझ्या साह्यार्थ पृथ्वीवर उत्पन्न झाले आहेत. आतां मी म्लेंच्छादि पाखंड्यांस व अधर्मयुक्त कलिकुलास स्वबळानें मारून टाकीन. मग सूर्य व सोमवंशोत्पन्न मरु आणि देवापि असे दोन राजे कलाप ग्रामांत तप करीत आहेत, त्यांस पृथ्वीपति करून, कृतयुग स्थापीन. नंतर स्त्रीसहित निघून जाईन. तरी तूं मजप्रीत्यर्थ राजसूय अश्वमेध यज्ञ कर, तेणेंकरून तुला उत्तम गति प्राप्त होईल. जो सनातन उत्तम धर्म तोच

मी असून, माझ्यापेक्षां जगांत थोर कोणी नाहीं.

अशी हरिची वाणी विशाखयूप राजानें श्रवण केल्यावर नमन करून ह्मटलें—हे हृषीकेशी ! वैष्णवजनांचा सद्धर्म ऐकावा अशी मला इच्छा झाली आहे. तरी तो धर्म कथन करावा. असे हे राजाचे बोल ऐकून, कल्की ह्मणाला—हे राजा! उत्तम प्रश्न केलास? त्याच्या श्रवणानें समग्र पापांचा नाश होईल. तरी तो सद्धर्म सांगतों श्रवण कर.

पूर्वीं महाप्रलय होतांच, एकाच वेळीं हें त्रिभुवन माझ्या अंगांत प्रवेशतें झालें. मजवांचून दुसरें कांहीं न राहतां मीच एक सर्व व्यापक राहिलों. मग मी बहुत काळपर्यंत शयन केलें होतें. ह्मणून माझी इच्छा मुरून गेली. मग पुढें महानिशांतीं द्वैतहीन जो मी आत्मा त्यापासून माझ्या क्रीडेकरितां एक चमत्कार झाला, तो असा कीं, सहस्र पायांचा, सहस्र शिरांचा, सहस्र भुजांचा व सहस्र नेत्रांचा असा एक विराट पुरुष उत्पन्न झाला. त्याच्या अंगापासून माझ्या मायाअंशानें ब्रह्मदेव उत्पन्न झाला. त्यानें मम आज्ञेनें नानाविध जीव जाती उत्पन्न केल्या. तसेच देव मन्वादिक सप्रजापती सर्व लोक वेदाच्या आज्ञेनें ब्रम्हद्यानें निर्माण केले. अशा प्रकारें स्थावर जंगमाची उत्पत्ति माझ्या मायेपासून झाली. ह्मणून प्रलय होतांच, जें तेजाळ मत्स्वरूप त्यांत स्थावर जंगमाची

स्थीरता होते. जे ब्राह्मण यज्ञाध्ययन, तपदानादि क्रियांच्या नानासेवोपचारांनीं माझें स्तवन करितात ह्मणून ते मला मनापासून आवडतात. जसे ब्राह्मण मला प्रिय वाटतात तसे इतर देवादिक आवडत नाहींत. जे ऋगादि सकळ वेद त्या केवळ माझ्या मूर्ती होत. त्यांचें ब्राह्मण सदोदित उच्चारण करितात. त्यांस सर्व जग वंदन करितें. जे सदाचारी उत्तम ब्राह्मण आहेत, त्यांच्या सर्व जग आधीन आहे ह्मणून त्यांस मी प्रीतीनें नमन करितों.

अशी कल्कीची वाणी श्रवण करितांच, विशाखयूप राजा पुनः हस्त जोडून ह्मणाला-हृषीकेशी ! आतां विप्रांचें लक्षण व तुझी भक्ति कशी करावी ती मला सांगावी. तिच्या आचरणानें सर्व जगांतील ब्राह्मण पूज्यत्वास पावतील. असें ऐकून कल्की ह्मणाला-मेदिनीपती ! जे वेद मला ईश्वर ह्मणतात तेच वेद सर्वकाळ ब्राह्मणांच्या मुखांत राहून, नानाधर्मांत प्रकाशित होतात. आणि जो ब्राह्मणांचा धर्म तीच माझी भक्ती, तिनेंच मी संतुष्ट होऊन, युगायुगीं जन्म घेतों. हळुहळू सुवासिनीनें काढलेलें सूत्र तें त्रिगुणत्रिवृत ग्रंथियुक्त केलें असतां, यज्ञसूत्र होतें, तें वेदमंत्रानें अभिमंत्रून डाव्या स्कंदावरून धारण केलें असतां, तेंच सर्व ब्राह्मणांस बलप्रद होतें. त्यामुळें यज्ञयागादि सर्व कर्मांस ब्राह्मण अधिकारी होतात;

ह्मणून ब्राह्मणांस आदिकारण यज्ञसूत्र जाणावें. ब्राह्मण मृद्रस्म चंदन तिलक धारण करून स्नान संध्यादि कर्मं नित्य आचरण करितात.

अशा विधीनें चालणारे जे ब्राह्मण ते ब्रह्मांडमय असतात, ब्राह्मणांच्या हातीं स्वर्गभुवन व वेदवाचा प्रत्यक्ष आहे. नारायण करांत राहतो, तीर्थें गात्रांत वसतात, राग नाडींत वसतात व प्रकृति त्रित जाणावी. सावित्री कंठांत, हृदय प्रत्यक्ष ब्रह्म, स्तनांत धर्म व पाठींत अधर्म जाणावा. अशा रीतीनें संपूर्ण विश्व ब्राह्मणवर्ण आहे ह्मणूनच त्यांस भूदेव असें ह्मणतात. यास्तव ते वंद्य आहेत. जे चतुराश्रमांत कुशल व सद्धर्मप्रवर्तक असे तपोनिधि वृद्ध, बाळ, तरुण जरी असले तरी ते मला प्रिय आहेत व त्यांच्यासाठींच मी जन्म घेतों. अशा सद्धर्मी ब्राह्मणांचें आख्यान जे एकवेळ ऐकतील त्यांचीं पापें उपपापें व कलीचे दोष आपोआप तात्काळ लय पावतील. असें हें कल्कीनें सांगितलेलें आख्यान विशाखयूप राजानें ऐकून संतोष पावून नमस्कार घालून आपल्या नगरास जाता झाला.

इकडे शिवदत्त शुक ( पोपट ) त्रैलोक्यांत हिंडून सूर्यास्तसमयीं शंभल ग्रामांत येऊन, कल्केश्वराच्या चरणीं मस्तक ठेवून, स्तवन करून सन्निध उभा राहिला. त्यास पाहतांच

कल्की भगवान् ह्मणाले–हे सखया कीरा ! ये माझ्याजवळ ये. तुझ्या दर्शनानें माझ्या मनास आल्हाद होतो. आज तूं कोणत्या देशास गेला होतास आणि उत्तम वस्तु भक्षावयास कोणत्या मिळाल्या ? त्याशिवाय कोणकोणते चमत्कार पाहिलेस तें मला सांग.

असें कल्केश्वराचें वचन ऐकून कीर ह्मणाला–हे वाजी-वाहना खड्गहस्ता ! आज मी भक्ष्याकरितां स्वइच्छेनें फिरत फिरत समुद्रांतील सिंहलद्वीपांत गेलों. तेथील अनुपम शोभेचें मला वर्णन करवत नाहीं, असें तें द्वीप अति सुंदर आहे. त्यांतील कारुमती नामक नगरींत प्रवेश केला. तींत अति सुंदर विमानें चोहोंकडे फिरत असून, सुवर्णाचे तट व बुरुज सुशोभित दिसत असून रत्नखचित मंदिरें शोभा देत आहेत. अशा त्या नगरीचें वर्णन माझ्यानें होणार नाहीं.

त्या कारुमती नगरींत बृहद्रथ राजा राज्य करित असून, त्याची कौमुदी नामक कांता पतिव्रता आहे; तिच्या पोटीं पद्मा नांवाची एक सुंदर कन्या असून, सर्व ब्रह्मांडांत प्रत्यक्ष लक्ष्मीसारखी आहे. तिच्या लावण्यास मदनही मोहित होईल. व ब्रह्मेंद्रादिक देहभान विसरतील, असो. अशी ती पद्मा आपल्या मैत्रिणीसह रात्रंदिवस शिवाची भक्ती करीत शिवनाम जपत आहे. ती पंचपक्वान्नांचा नैवेद्य देवास समर्पण करून, मग ब्राह्मणांस व सुवासिनींस भोजन घातल्यावर

आपण जेवित असते. असा नित्यनेम चालवित शिवाचे पवित्र नामाचा जप करित असते. सोमवारादि शिवव्रतें विधियुक्त आचरण करून एकशें आठ दंपत्यांस भक्तीनें पुजून, उत्तम वस्त्रें, अलंकार, सुवर्णदानें, रत्नें, भूमिदानें, व पक्वान्न भोजनें घालीत असते. शिवाच्या सेवेवांचून तिला दुसरें कांहीं आवडत नाहीं, व शिवाच्या ध्यानावांचून तिला कांहीं सुचत नाहीं.

अशा त्या राजकुमारीची निस्सीम भक्ति पाहून शंकरास संतोष होऊन ह्मणाले–ही बृहद्रथ भूपालसुता प्रत्यक्ष हरीची कांता होय. हिनें माझी पुष्कळ प्रकारें आराधना केली; तरी आतां दर्शन देऊन, हिची इच्छा पूर्ण करावी. असें शंकरानें मनांत आणलें, मग पार्वतीसह नंदीवर आरूढ होऊन कारुमती नगरीस येण्यास निघून, जेथें पद्मा ध्यान करित बसली होती तिच्यापुढें येऊन उभे राहिले. आणि ह्मणाले–गे वत्से बृहद्रथ कुमारिके ! तूं ज्याचें ध्यान करित आहेस तोच मी पंचवदन गौरीसह प्रसन्न होऊन तुला दर्शन देण्याकरितां आलों आहें तरी नेत्र उघडून पहा.

अशी शिवाची अमृतवाणी ऐकतांच, पद्मा नेत्र उघडून पाहूं लागली तों पार्वतीसह शिव वृषभारूढ उभा आहे असें पाहून त्याच्या चरणावर मस्तक ठेविलें. परंतु उत्तम वराची

जी इच्छा ती तिला सांगवेना ह्मणून लज्जेनें खालीं पाहूं लागली. तेव्हां शंकरांनीं तिचें अंतर जाणून ह्मटलें-गे वत्से बृहद्रथसुते ! मी तुझी इच्छा जाणिली तरी वर देतों कीं, "तुला प्रत्यक्ष वैकुंठपती वरील. श्रीनारायणावांचून तुला योग्य वर नाहीं. असें असून जर कोणी नर तुजकडे कामदृष्टीनें पाहील तर त्याचें पुरुषपण तात्काल जाऊन स्त्रीरूप प्राप्त होईल. मग तो देव, दैत्य, दानव किंवा नाग चारण सिद्ध गंधर्व असून, तुला वरण्याची इच्छा धरील तरी त्यास स्त्रीत्व प्राप्त होईल, हाच माझा तुला आशिर्वाद आहे. वैकुंठविहारी घननीळ तुला वरील. हें माझें वचन हृदयकमलीं ठेव. आणि आतां देह न कष्टवितां स्वगृहीं निघून जा." असें वरदान देऊन गौरीरमण अंतर्धान पावले आणि पद्मा आपल्या मैत्रिणींसह स्वगृहास गेली.

---

## अध्याय ५ वा.

# पद्मेचा स्वयंवर व राजांचें स्त्रीरूपी होणें.

नंतर कीर ह्मणाला-कल्केश्वरा ! पद्मा शिवापासून इच्छित वर मिळवून नगरांत आल्यावर, पुढें तारुण्यभरांत येतांच ती रमा सावित्री शची पार्वती रंभा उर्वशी सरस्वति यांच्या स्वरूपांसही लाज आणील अशी सुंदर स्वरूपाची दिसूं लागली.

तेव्हां तिचा बाप बृहद्रथ राजा विचार करूं लागला कीं, ही सुलक्षणी कन्या कोणत्या क्षत्रियास अर्पण करावी ? हिच्या स्वरूपास शोभेल असा भूप सिंहलद्वीपांत एकही नाहीं. या यौवनपूर्ण तनयेनें जर पापाचार केला तर आपला अति पवित्र वंश दूषित होईल.

असा विचार करीत राजा अंतःपुरांत गेला, तोंच कौमुदी राणी नमन करून हात जोडून उभी राहिली. तिला सिंहलेश्वर ह्मणाला–आपली कन्या उपवर झाली आहे तरी तिला कुलशीलसंपन्न वर कोणता योजावा ? यावेळीं वराची योजना न केली तर कदाचित् परपुरुषीं रत होऊन आपलें कुल दूषित करील. 'स्त्रियांचा विश्वास कधींही धरूं नये' असें सांगणें आहे. यास्तव वराची योजना केलीच पाहिजे.

असें राजाचें वचन ऐकून कौमुदी राणी हास्य करून ह्मणाली–स्वामी ! चिंता करूं नका. स्वस्थ असा. मी तुह्मांस सांगतें ऐका. पूर्वीं पद्मेनें शंकराची आराधना केली; तेव्हां शंकर गौरीसह प्रगट होऊन ह्मणाले–" हे राजकुमारी पद्मे ! जो वैकुंठविहारी श्रीमुरारी तोच तुला वरील. " असें शिवाचें वरप्रदान आहे ह्मणून नारायण तिचें पाणिग्रहण खचित करील. तुह्मीं चिंतामग्न होऊं नका.

हें राणीचें वचन ऐकून राजा ह्मणाला–ब्रह्मदेवाचा पिता

जो विष्णु तो पद्मेला कशी वरील ? तो सर्वांतर्यामीं वसणारा लक्ष्मीकांत आमचा जांवई व्हावा, असा आपला भाग्योदय होईल? असें वाटत नाहीं. माझ्या कन्येचें नारायण पाणिग्रहण करील असें मी पुण्याचरण काय केलें आहे? परंतु जो गजाननाचा पिता व मदनांतक शिव याचें वचन कदापि असत्य होणार नाहीं. तरी आतां स्वयंवर मांडून भूप बोलावितों, त्यांतच लक्ष्मीवर येऊन पद्मेचा हात धरील. पूर्वीं समुद्रमंथनाचे वेळीं चौदा रत्नें निघालीं, त्यावेळीं देवदैत्यांसमक्ष नारायण येऊन, त्यानें लक्ष्मीचें पाणिग्रहण केलें. त्याचप्रमाणें कैवल्यदानी पद्मेचें ग्रहण करील.

असें राजानें कौमुदीराणीस सांगून, प्रधानास बोलावून आज्ञा केली कीं, 'पद्मेच्या स्वयंवराकरितां देशोदेशीं दूताहातीं आमंत्रण पत्रिका पाठवून त्यांस मोठ्या सन्मानानें स्वयंवर मंडपांत बोलवावें.' अशी आज्ञा होतांच प्रधानानें आमंत्रण चिठ्या लिहून दूतांजवळ देऊन त्यांस देशोदेशीं रवाना केलें व इकडे स्वयंवर मंडप तयार केला. सिंहलद्वीपांतील श्रेष्ठ राजांकरितां आसनें, जानिवसा घरें, व सुंदर बागबगीचे सिद्ध केले. तिकडे दूत स्वयंवर पत्रिका घेऊन देशोदेशीं जाऊन, राजांस सन्मानानें देऊं लागले. ते राजे पत्रिका वाचून स्वयंवर वृत्तांत जाणून, आनंदित होतसाते

बोलूं लागले कीं, पद्मेचें पाणिग्रहण करून आपण धन्य होऊं.

मग सर्व राजे आपापल्या सैन्यासह, शस्त्रास्त्रें व वाहनें यांसह कारुमती नगरीस येण्यास निघाले. त्यापैकीं कित्ये-कांचीं नांवें सांगतों श्रवण करा. रुचिराश्व, काश, क्रूरमर्दन, मदिराक्ष, सुकर्मा, वसुमान, दृढाशुग, जीमूत, क्रथन, कृष्णसार, पारद, कृशांबु, सृंजय, प्रमाथी, गुरुमित्र, संजय, कंक, विजृंभ, अक्षमवर्य; इत्यादि राजे बृहद्रथपुराच्या सन्निध दशदिशांकडून येऊन एकत्र झाले. त्यांच्या वाद्यगजरानें आकाश दुमदुमून राहिलें. त्यावेळीं बृहद्रथ राजास कळतांच तो सामोरा येऊन सर्वांस भेटून त्यांचा आदरसत्कार केला.

मग बृहद्रथ राजानें सुमुहूर्त पाहून, सर्व राजांस लग्नमंड-पांत सन्मानानें पाचारण केलें. तेव्हां सर्व राजे योग्य स्थानीं सभामंडपांत येऊन बसले. नंतर राजानें पद्मेस इच्छित वर वरण्याकरितां मंडपांत पाचारण केलें. त्याबरोबर पद्मा वस्त्रा-लंकारांनीं नटून आपल्या मैत्रिणींसह सभास्थानीं आली. तोंच बृहद्रथानें तिचा हात धरून सर्व राजे दाखवित त्यांच्या कुल गुण ऐश्वर्याचें वर्णन करूं लागला. पद्मा लाल रेशमी वस्त्र नेसलेली हातांत रत्नमाला घेऊन राजांचे गुण ऐकत व सभेंतून फिरत होती. तिचें तें अप्रतिम लावण्य पाहून, राजकुमार काममोहित झाले व त्यांचीं शस्त्रें वस्त्रें विगलित

होऊन ते भूमीवर पडले. त्यांस आह्मीं कोण कोठील, कोणत्या नगरींत आहों व काय करीत आहों याबद्दलचें भान मुळींच राहिलें नाहीं. ते राजे पद्मेच्या कटाक्ष शरानें विव्हल होऊन त्यांची पूर्वरूपें वदलून त्यांस सुंदर तरुण स्त्रियांचीं रूपें प्राप्त झालीं.

अशीं आपलीं स्त्रीरूपें पाहून ते स्त्रीरूपी राजे विचार करूं लागले कीं, आपण सुंदर कामिनी झालों, आतां स्वनगरास जाऊन तोंडें कशीं दाखवावीं ? तरी आतां यापुढें येथेंच या राजकन्येच्या सेवेंत राहावें हेंच योग्य होय. असा विचार करून ते स्त्रीरूपी राजे पद्मेच्या दासी होऊन राहिले.

कीर ह्मणाला—कल्केश्वरा ! मी त्यावेळीं पद्मेचा स्वयंवर पाहाण्याकरितां वटवृक्षावर बसलों होतों. शंकराच्या वरानें राजे स्त्रीरूप पावले त्यामुळें स्वयंवरोत्सवाचा तात्काळ भंग झाला. तेव्हां पद्मेनें चिंताक्रांत होऊन शंकराचें ध्यान केलें. व म्लान वदन होऊन नानालंकार भोगाचा त्याग करून पादांगुलीनें भूमी खनन आरंभिलें. पूर्वीचा शिवाचा वर कीं—" हरि पद्मेचा कांत होईल. " तें वचन सत्य होण्याकरितां पद्मा हरीचें स्मरण करून दीनवाणीनें विलाप करूं लागली. तो विलाप मी वृक्षावरून ऐकिला. त्याचें समग्र कथन माझ्या मुखानें होणार नाहीं. तरी त्यांतील अल्प वर्णन करितों तें श्रवण करावें.

## अध्याय ६ वा.

# पद्मेचे विलाप व शुक पद्मेचें संभाषण.

मागील अध्यायांत स्वयंवरास आलेली मंडळी पद्मेच्या अवलोकनानें स्त्रीरूप झाली नंतर कीर सांगूं लागला-कल्केश्वरा! पद्मा राजांस स्त्रीरूपी झालेले पाहून विस्मित होऊन, श्रीहरीचें चिंतन करून, आपल्या विमला नामक सखीस ह्मणाली-विमले! आतां माझी गति काय होईल? ब्रह्मदेवानें असें माझ्या कपाळीं काय लिहिलें आहे? कीं माझ्या दर्शनानें पुरुष स्त्रीरूपी झाले. शंकरानीं मला वर दिला कीं, "नारायण तुझें पाणिग्रहण करील." तें शिववचन व्यर्थ जाऊन अनर्थ ओढवला! शारंगपाणी लक्ष्मीरमण माझा अंगिकार करील अशी जी मला आशा होती, ती समूळ नाहींशी झाली. तो ईश्वर जनार्दन या दीन मानवी स्त्रीचें पाणिग्रहण करील हें कसें घडेल? चिंतामणीची बरोबरी कांच खापरी कशी पावेल? जसें सिंह व कुत्री यांचें लग्न कालत्रयीं होत नाहीं तसेंच माझें पाणिग्रहण लक्ष्मिरमण करणार नाहीं. पूर्वीचें शिववचन जर मिथ्या होत असेल आणि लक्ष्मीकांतास माझी आठवण नसेल तर मी अग्नि पेटवून, श्रीहरीचें स्मरण करून, हा देह अग्नींत टाकून हरीचरण पावेन.

असा मी निश्चय केला आहे. जिला शिवानें फसविलें व विष्णूनें त्यागिलें तिनें वांचून काय करावें ? सखे विमले तें मला सांग पाहूं ?

अशा प्रकारें पद्मा विलाप करीत, धरणीवर मूर्छित पडे तिला मैत्रिणी सांवरित होत्या. ते तिचे विलाप मी वृक्षावरून ऐकून, तुमच्या चरण दर्शनाकरितां तात्काळ धांवत आलों. असा शुक मुखानें वृत्तांत ऐकून, कल्की विस्मित होऊन कीरास ह्मणाला-सखया ! तूं आतांच सिंहलद्वीपास जाऊन पद्मेला बोध करून, माझें रूप, गुण, कीर्ति तिला ऐकवून लौकर परत ये. पद्मा माझी कांता व मी तिचा कांत असा दैवयोगच आहे तरी तूं मध्यस्थी व्हावें. तूं मध्यस्थी झाल्यावर आमचा योग सत्वर जुळून येईल तरी विलंब न करितां सत्वर निघून जा. शुका ! तूं सर्वज्ञ असून, कोणत्यावेळीं काय केलें पाहिजे हें जाणणारा आहेस; तिला माझ्याबद्दलचें आश्वासन देऊन, तिचें आश्वासन वचन आणून माझें समाधान कर. मी अगदीं आतुर झालों आहें.

असें कल्कीचें वचन ऐकतांच शुक हर्षित होऊन स्वामीस नमन करून सिंहलद्वीपास गेला, आणि तेथील अमृततुल्य जीवनांत स्नानपान करून, महाळुंगादि फळें भक्षण केल्यावर राजसदनांत प्रवेशला. तेथें जें कन्यापूर होतें त्याच्या सन्निध

नागेश्वराचा वृक्ष होता त्यावर कीर बसून अत्यानंदानें डुलूं लागला आणि पद्मेच्या मुखाकडे पाहात मधुरवाणीनें बोलूं लागला—

"हे वरारोहे यौवन शालिनी ! तुझें कल्याण असो. तूं पद्मकांति, पद्मानना, पद्मगंधा, पद्मनयना, पद्मकरा, पद्मचरणा अशी हरिकांता आहेस. तुझें शरीर, कांति, मुख पद्मासारखें असून, पद्मा असें तुझें नांव आहे. मला असें वाटतें कीं, तूं साक्षात् विष्णुकांताच येथें जनांस तारण्याकरितां आली आहेस."

अशी ही कीराची मधुरवाणी ऐकतांच, पद्मा आश्चर्यचकित होऊन ह्मणाली–अरे कीरा ! तूं या स्थानीं कोठून आलास ? तूं देव, दानव किंवा किन्नर मजवर दया करण्याच्या इराद्यानें सुंदर कीररूप घेऊन येथें आला आहेस तरी तूं कोण आहेस तें मला सांग. तुझ्या मुखांतील वचनामृत श्रवणानें भाशून तृप्त होईल असा कोणी या जगांत मला दिसत नाहीं.

असें तिचें वाक्य श्रवण करून कीर स्पष्टाक्षरांनीं बोलूं लागला कीं–"हे पद्मे राजकुमारिके ! मी सर्वज्ञ कामचारी शास्त्रार्थविचारी असून लोकांतरीं माझी गति आहे. मला देव, गंधर्व, किन्नर, असुर, ऋषि, गण, बुध, राजेश्वर यांच्या

सभेंत मान मिळतो. असा मी सर्वपूज्य आज आकाशांतून फिरत असतां, तुझ्या दर्शनार्थ येथें प्राप्त झालों आहें. परंतु तूं हास्यवर्जित अशी कोणाशींच न बोलतां, सर्व भोगांचा, सख्यांचा त्याग करून हृदयीं संतप्त झाली आहेस याचें कारण कोणतें तें ऐकण्याची माझी इच्छा झाली आहे.

हें कीराचें वचन ऐकून पद्मा दुःखाश्रु ढाळीत गहिंवरून ह्मणाली—" हे कीरा गुणनिधाना, रूपलावण्या कुलशील धना! दासी सेवक जनांस घेऊन काय करावें? 'ज्याचें दैव फिरलें त्याचें सर्व निष्फळ झालें.' याविषयीं तुला गोष्ट सांगतें श्रवण कर.

बा कीरा! मी बाळपणापासून गौरिहराचें यथाविधि पूजन केलें. तेव्हां गौरिसहित शिव प्रसन्न होऊन मला दर्शन देऊन, सांगितलें कीं—"बाळे! मी तुला प्रसन्न झालों इच्छित वर मागून घे." त्यावेळीं मी लज्जित होऊन कांहीं बोललें नाहीं तेव्हां शिव पुनः ह्मणाले—" हे राजकुमारिके पद्मे! जो वैकुंठ विहारी श्री मुरारी तोच तुला वरील, तूं मनांत कांहीं संशय धरूं नको. जर देव, दानव, किन्नर, गंधर्व, यक्ष अथवा नर तुझें रूप पाहून कामातुर होईल तर त्याचें पुरुषरूप जाऊन स्त्रीरूप प्राप्त होईल." असा कैलासपतीनें वर दिला. त्यानें विष्णुअर्चन यथाविधी कथन केलें तेंच तुलाही सां-

गेन. ह्या सख्या ज्या मजजवळ वसल्या आहेत, हे सर्व पूर्वी देशोदेशींचे राजे होते. मी तारुण्यदशेंत येतांच माझ्या बापानें माझा स्वयंवर मांडला; त्यावेळीं सर्व देशोदेशींच्या राजांस पाचारण केलें. ह्मणून सर्वमान्य राजे स्वयंवराकरितां मंडपांत येऊन वसतांच, मी रत्नमाला हातांत घेऊन मंडपांत गेलें, तेव्हां माझें रूप पाहून, राजे काममोहित होत्साते मूर्छित पडले. थोड्या वेळानें सावध होऊन पहातात तों मदनकला-परिपूर्ण उरावर स्तन दिसूं लागून स्त्रीरूपें प्राप्त झालीं. असें पाहून लज्जित होऊन विचार करूं लागले कीं—आतां नग-रांत जाऊन तोंडें कशीं दाखवावीं ? जर नगरांत जावें तर परशत्रु येऊन आम्हांस स्त्रीरूपी पाहून, धरून नेऊन वंदि-खान्यांत टाकतील. असें त्या स्त्रीरूपी राजांस कोडें पडलें. मग त्यांनीं माझ्या दासी होऊन राहावें, असा निश्चय करून, माझ्या सेवेंत राहिले आहेत व माझ्यावरोवर भक्तिभावानें यथाविधि विष्णुपूजन करीत आहेत.

इतकें सांगून पद्मा ह्मणाली—हे भाग्यवंता सर्वज्ञा बुद्धिमंता शुका ! अशा या दासींची पूर्वकथा तुला सांगितली. माझें मन दुःखाग्नीनें तप्त झालें होतें परंतु तुझीं वचनें हाच मेघ वर्षला तेणेंकरून माझें चित्त शांत झालें. तुझी अमृतासमान वाणी ऐकून माझ्या दुःखाग्नीची धुणी झाली त्यामुळें मी

त्रिभुवनांत धन्य झालें. अशीं पद्मेचीं वचनें ऐकून शुकास संतोष होऊन त्यानें तिचें स्तवन करून शंकराच्या वचनांनीं विष्णू अर्चन कसें केलेंस त्याविषयीं प्रश्न केला. त्या दोघांचा प्रश्नोत्तर संवाद पुढें सांगितला आहे. तो श्रोतेजनांनीं श्रवण करावा.

---

## अध्याय ७ वा.

# शुकपद्मासंवाद–विष्णुपूजनकथन.

सूत शौनकादिकांस सांगतात–कीरानें पद्मेचें वचन ऐकून पुनः तिला ह्मणाला–हे पद्मे राजकुमारिके! तुला शंकराचें शिष्यत्व प्राप्त झालें आहे, ह्मणून तूं सर्व जगांत धन्य आहेस. तुझ्या सारखी अन्य कन्या कोठेंच मिळणार नाहीं. प्रत्यक्ष शिवानें तुला दर्शन देऊन जें विष्णुअर्चन कथन केलें तें यथाविधि श्रवण करावें अशी माझी इच्छा झाली आहे. तरी तें ऐकवून माझ्या जन्माचें सार्थक करावें.

मग पद्मा ह्मणाली–हे कीरा! तुजसारखा चतुर दुसरा कोणी नाहीं ह्मणून तुला हा विचार सुचला. तरी आतां जें शिवानें मला विष्णुपूजन कथन केलें तें तुला सांगतें एकाग्र चित्तानें श्रवण कर. श्री विष्णूचें पूजन पुण्यकारक असून, इहपरत्र सुख देणारें आहे. त्याचें जे भाविक आचरण व

श्रवण करितात, ते गुरु, गो, ब्राह्मण, स्त्रीहत्यारी असे जरी असले तरी त्यांच्या पापांची भुरी निःसंशय होईल.

इतकें सांगून राजनंदिनी पद्मा कीरास ह्मणाली—रे कीरा श्रवण कर. प्रातःकाळीं स्नान करून यथोक्त कर्में करावीं. मग हस्तपाद प्रक्षाळून शुद्धासनावर पूर्वाभिमुख बसून शुद्धोदकानें आचमन करून स्वस्थ चित्तानें राहावें. मग न्यास सांग केल्यावर भूत शुद्धि करून, नंतर अर्घ्य स्थापनेचें यथाविधी आचरण करावें. मग सर्व उपाधि टाकून केशवकृत्यादि न्यास यथाविधी करून तन्मय व्हावें. आणि जो सर्व हृदयस्थ आत्मा तोच विष्णुमूर्ति भगवंत असें ध्यान करून त्यास आसन अर्पण करावें. अर्घ्य, पाद्य, आचमन, मांगलिक पंचामृत स्नान असें यथाविधी पूर्व पूजन करून तसेंच अभिषेक स्नान करावें. मग वस्त्रोपवस्त्रें, यज्ञसूत्र, अलंकार, चंदन, केशर, कस्तुरीचा तिलक, शुद्धाक्षता, सुमनें, तुलसी, धूप, दीप, नैवेद्य, दक्षिणा, तांबूल, फल इत्यादि अर्पण करावीं आणि प्रार्थना करून नमस्कार करावा. अशा प्रकारें यथोपचारें नाना मंत्रांनीं पूजन केल्यावर ध्यान करावें नंतर नारायणाच्या प्रत्येक अवयवाचें निरनिराळें वर्णन करून नमस्कार करावे.

अशाप्रकारें विष्णुमूर्ती शुद्धमतीनें पुजून जप, ध्यान, स्तुती

प्रीतीनें केली असतां, पापें दग्ध होऊन मायाबंधन तुटेल. सूत शौनकादिकांस ह्मणतात-शिवानें जें पद्मेस कथन केलें तेंच तिनें कीरास सांगितलें. असें हें विष्णूचें ध्यान, जप, कथा श्रवण भक्तिभावानें करतील त्यांचें पाप, ताप, दैन्य, दुःख समूळ जळून जाईल. आणि त्या मनुष्यास चारी पुरुषार्थ साधून या लोकीं व परलोकीं अमित सुख प्राप्त होईल. इतकें सांगून पद्मा स्तब्ध झाली. तेव्हां कल्कीदूत कीरानें विनंति केली कीं, गे पद्मे राजदुहिते, रूप लावण्य गुणसरिते! हरिच्या अर्चनाचा प्रकार मला कथन कर. तूं जसें सांगशील त्याप्रमाणें मी आचरण करून जगांत धन्य होईन. असें त्याचें वचन ऐकून पद्मा हर्षित होऊन ह्मणाली- ' रे कीरा! सांगतें चित्त देऊन ऐक. '

नारायणाचें पूर्वीप्रमाणें पायांपासून केंसापर्यंत ध्यान करून पूर्णात्म स्थितीप्रत पोंचून, मग गुरुपदिष्ट मूळ मंत्राचा जप करावा. जप केल्यावर साष्टांग नमस्कार घालावा. नंतर नारायणास हृदयसंपुटीं स्थापून मनोभावानें नमन करावें. आणि हरि सर्वत्र कर्ता आहे, असें मानून हरिनामाचा उच्चार करून भक्तीनें गीत गावें. अशाप्रकारें संपूर्ण झाल्यावर नमन करून नारायण नामाचा उच्चार करीत नैवेद्य भक्षण करावा. इतकें सांगून पद्मा ह्मणाली-हे शुका! अशा आच-

रणानें कामिकांचा काम पूर्ण होतो व निष्कामियांस मोक्ष प्राप्त होतो. असें हें हरिपूजन देव, सिद्ध, गंधर्व, नर यांस फार आवडतें. तें तुला कथन केलें.

---

## अध्याय ८ वा.

# पद्मेस कल्कीचें वृत्तकथन व कल्कीचें सिंव्हलद्वीपीं गमन.

सूत शौनकादिकांस ह्मणतात–पद्मेचीं वचनें शुकानें ऐकून त्यास फार संतोष झाला. मग मोठ्या आदरानें पद्मेस ह्मणाला–हे राजकन्ये! मला हरिपूजन यथाविधी सांगितलेंस तें मज सारख्या प्राण्यास मोक्षदायक झालें. जशी सुवर्णाची प्रतिमा नाना रत्नांनीं भूषित केली असतां सजीवाप्रमाणें दिसते, तशी तूं केवळ लक्ष्मीरूपिणी आहेस. आजपर्यंत तुझ्या सारखी देवी, नागीण किंवा स्त्री या जगतांत मला आढळली नाहीं. तूं केवळ गुणानें शोभणारी आहेस. यास्तव तुझ्या योग्य भर्त्ता त्रिभुवनांत दुसरा मी पाहिला नाहीं. पण हे पद्मे राजकुमारिके! क्षार समुद्राच्या पैलपारीं जंबु द्विपांत शंभल नांवाची एक नगरी आहे, तींत गुणसंपन्न रूपवान, केवळ साक्षात् नारायण असा एक मानव पाहिला

आहे. त्याचें सौभाग्ययुक्त व सुंदर शरीर ब्रह्मदेवानें घडलेलें नव्हे असें मला भासत आहे. ध्यान योगानें श्रीवासुदेवास पाहिलें असतां त्याचें जसें रूप दिसतें त्याप्रमाणेंच तो केवळ रमाकांत होय. तूं श्रीहरीचें रूप पाद केशादि अवयवांत जें ध्यान केलेंस, तसेंच त्याचें हुबेहुब रूप आहे. जशी विष्णूची सुंदर मूर्ती दिसते तशीच त्याची आकृति आहे.

असें हें शुकाचें वचन ऐकून, पद्मा ह्मणाली—बा गुणनिधाना सखया! माझी कामना पूर्ण कर. तूं परम चतुर असून, ज्या उत्तम नराचें वर्णन केलेंस त्याचें जन्म कर्म तूं जाणतच आहेस. तरी त्याचे मातापिता कोण ? व तो उत्पन्न कसा झाला तें मला कथन कर. बा प्राणसख्या! तूं वृक्षावरून खालीं येऊन, माझें पूजन घेऊन पेरू किंवा डाळिंबें भक्षण करून शुद्ध उदक प्राशन कर. तुझी सुंदर चोंच पद्मरागाहून आरक्त सुरंगी आहे तिला रत्नांनीं सुशोभित करितें व तुझ्या मानेंत सुवर्णजडित सूर्यकांत घालतें. तुझे पंख हिरवे दिसत आहेत ते मोत्यांनीं आच्छादून टाकितें, तुझ्या सुंदर पिसाऱ्यास कुंकुम चर्चितें, पुच्छास उत्तम मणी व पायांत घुंगुर, पैंजण बांधितें. असें तुझें नेत्रांस आनंद देणारें रूप सुशोभित करितें. तरी तूं वृक्ष सोडून माझ्याजवळ ये. तूं अमृतवाणीनें बहुत गोष्टी मला कथन केल्यास, त्या ऐकून

माझ्या मनांतील दुःख समूळ नाहींसें झालें, तरी तुझ्या मनांत काय आहे त्याबद्दल मला आज्ञा कर. तें काम मी आपल्या सख्यांसह सत्वर करीन.

असें पद्मेचें वचन ऐकून तो पोपट तिच्याजवळ येऊन सुंदर वचनें बोलूं लागला. तो ह्मणाला—हे गुणनिधाने पद्मे ! पूर्वकालीं ब्रह्मदेवानें धर्मरक्षणार्थ विष्णूची प्रार्थना केली, यास्तव त्या नारायणानें ब्रह्मदेवास धर्मरक्षण करण्याचें आश्वासन दिलें आणि शंभलग्रामांत विष्णुयश ब्राह्मणाच्या सुमति नामक राणीच्या उदरीं जन्म घेतला, त्यावेळीं सिद्ध ऋषिजन येऊन त्याचें जातक वर्तवून कल्की असें नांव ठेविलें. पुढें किंचित् काळ लोटल्यावर विष्णुयशानें बंधु, याति, आप्तांस पाचारण करून मुलाचें मौंजीबंधन केलें. मग तो विष्णुयशनंदन परशुरामाजवळ जाऊन वेदाध्ययन, धनुर्विद्या, गायनकला शिकून, बिल्वोदकेश्वर महादेवास प्रसन्न करून घेऊन, त्याच्यापासून अश्वखड्ग मिळवून घेतलें आणि स्वगृहीं आला. मग विशाखयूप राजास भेटून त्याला उत्तम धर्म सांगून, अधर्माचें निवारण केलें. असा तो कल्कीनारायण साक्षात् भगवान आहे.

अशीं कीराचीं वचनें ऐकतांच, पद्मा हास्यमुख होतसाति; रत्नजडित भूषणें शुकास अर्पण करती झाली व ह्मणाली—हे

गुणराशी सखया ! माझें सर्व वर्तमान तुला सांगितलेंच आहे आणखी विशेष काय सांगूं ? तूं ज्ञाता, चतुर माझा प्रियकर आहेस. तरी कल्कीस येथें आणून माझें पाणिग्रहण करील असें कर. माझें दर्शन होतांच, " कदाचित् स्त्रीरूप प्राप्त होईल, अशा भीतीनें नारायण येणार नाहीं. तरी मी त्यांस मनोभावें अनन्य शरण आहें असें जाऊन सांग. पूर्वी मला शिव प्रसन्न होऊन बोलला कीं ' पद्मे ! कामइच्छेनें तुजकडे जे अवलोकन करतील ते स्त्रीत्व पावतील ! हा शिवाचा वर प्रखर शापासारखा झाला आहे. असें तिचें वचन ऐकून कीरानें साष्टांग नमन केलें आणि तिचा निरोप घेऊन आकाशांतून उड्डाण करून स्वस्थानास येण्यास निघाला तो जंबुद्वीपांत शंभलपुरीं आला. मग स्वामीजवळ जाऊन, प्रीतीनें साष्टांग नमन केलें, तोंच कल्केश्वरानें त्याला आपल्या मांडीवर बसविलें व सुवर्णरत्नालंकार भूषित पाहून आनंदित झाला. मग त्याला पाणी पाजून, अनेक प्रकारचीं मधुर फळें खावयास घालून, पाठीवरून हात फिरवून त्याच्या मुखाचें चुंबन घेतलें. अशा प्रकारें लक्ष्मीपतीनें त्यास सन्मानून विचारलें कीं:-

बा सखया कीरा ! तूं कोणत्या देशांत जाऊन आलास व तेथें अपूर्व काय पाहिलेंस आणि मणि, सुवर्ण भूषणें

लेवून कोठून आलास ? तुझी रात्रंदिवस संगति असावी असें मला वाटतें. तुझ्या दर्शनावांचून एक क्षण मला युगासमान भासतो. असें कल्कीचें वचन ऐकून कीरानें साष्टांग नमन केलें. मग पद्मेचें सकल वृत्त जें तिनें सांगितलें होतें तें स्वामीस कथन केलें आणि जो उभयतांचा संवाद सिंहलद्वीपीं झाला, नानालंकार प्राप्त झाले, तसेंच ती मनोभावानें शरण येऊन नमस्कार सांगितला तें सकल वर्तमान स्वामीस कथन केलें.

तें शुकानें सांगितलेलें पद्मेचें वृत्त कल्कीनें ऐकून हर्षित होऊन ह्मणाला—माझ्या प्राणसखया ! आतां सिंहलद्वीपीं जाऊं चल. असें बोलून शिवदत्त कवच लेवून, हातांत खड्ग घेऊन शुकासह कामग अश्वावर बसून मनोवेगानें क्षणमात्रांत समुद्रपारीं सिंहलद्वीपीं आला. तेथें बृहद्रथ राजाची कारुमति नामक नगरी सुवर्णरत्न तेजानें केवळ दुसरी लंकाच अशी भासत होती. तींत चोहोंकडे विमानें फिरत असून, सुवर्णाचे प्रचंड तट व बुरुज शोभत असून, सुवर्ण रत्नांचीं गोपुरासहित सभा मंदिरें शिल्पकारांनीं कुशलतेनें निर्माण केलीं होतीं. प्रत्येक घराच्या अग्रभागीं सुवर्ण पताका विजे सारख्या तळपत होत्या, जागोजागीं उत्तम तोरणें बांधिलीं असून, नटनटीचीं नृत्य गायनें, वादनें चाललीं

होतीं. गरुडपाचूचे कृत्रिम कीर, नीलमण्याच्या कोकिला पंचम स्वरांचे आलाप काढित होते. तेथील कामिनी पद्मिणी सारख्या असून, त्यांच्या अंगसुवासा भोंवतीं भ्रमर रुंजी घालित होते. अशा त्या नगरीचें संपूर्ण वर्णन केलें असतां ग्रंथविस्तार फार होईल यास्तव किंचित् वर्णन केलें आहे.

अशा त्या बृहद्रथाच्या पट्टणासन्निध एक उपवन ( बाग ) वृक्षांनीं दाट भरून गेलें होतें, त्यांत वटवृक्ष, पानवेली, लवंगा, खजूर, नारळी, तमाल, इडलिंबू, पोफळी, साग, ताड, कांचन, वकुळी, कंवठी, आंवळी, पिंपळ, उंडली, अर्जुन सादडा, पेरू, फणस, नारंगी, केशर, करंज, कळंब, सातवीण, शिसवा, आंबे, चंपक, अशोक, चमेली, मोगरी, गुलाब, शेवंती, वट मोगरे, जाई, जुई, पारिजातक, मंदार इत्यादि वृक्ष, पुष्पलतांनीं तें वन सुंदर दिसत होतें.

तसेंच जागोजागीं पुष्करणी असून, सर्वत्र पुष्प सुगंध पसरला होता. पक्ष्यांचे किलबिलाट चालले होते, वायु मंद मंद वाहात होता. अशा त्या सुंदर उपवनांत कल्कीनें प्रवेश केला. तों मधुर स्वच्छ जलानें तुडुंब भरलेलें एक सरोवर दृष्टीस पडलें, त्यांत श्वेत, रक्त, निळीं कमळें प्रफुल्लित झालीं असून, जलकुक्कुट, हंस, चक्रवाक, बदकें, सारस रात्रंदिवस शब्द करित होते. त्या सरोवरांतील स्वच्छोदकाच्या लहरी

वायुवेगानें तीरावर थडकत होत्या. असें तें सुंदर सरोवर कल्कीनें पाहतांच, शुकास ह्मटलें-मी येथें स्नान संध्यादि विधी आटोपून घेतों.

असें कल्कीचें वचन ऐकून, कीर ह्मणाला-स्वामी संध्यादि कर्म उरकून घ्यावें. तों मी आपण आल्याचें वृत्त पद्मेस जाऊन कथन करितों. असें बोलून कीर आनंदानें निघाला.

---

## अध्याय ९ वा.

## शुक पद्मा संवाद व कल्की पद्मेची भेट.

सूत शौनकादिकांस सांगतात-मग तो कल्की मोठ्या आनंदानें घोड्यावरून तळ्याजवळ येऊन उतरला व घोडा वृक्षास बांधून, स्नानसंध्या केली. तों स्वच्छ स्फटिकाच्या पायऱ्या दृष्टीस पडल्या. तेथेंच कदंबाचा वृक्ष असून, त्याची दाट छाया पसरली होती व कमळांचा सुगंध सुटला होता त्यांवर भ्रमर भ्रमण करीत असून, कोकिळादि पक्षी मधुर स्वरानें किलबिलत होते. असें तें रम्य स्थान पाहून, पाणी आणण्याच्या मार्गांत त्या कळंबाखालीं कल्की नारायणानें शयन केलें.

इकडे कल्कीचा दूत शुक, स्वामी आगमनाचा समाचार पद्मेस सांगण्याकरितां नगरांत प्रवेश करून, पद्मेच्या मंदिराजवळ नागेश्वराचा वृक्ष होता त्यावर बसून पद्मेस पाहूं लागला. तों पद्मा माडीवर विकळ होऊन लोळत पडली असून, भोंवत्या मैत्रिणी सेवा करीत आहेत. पद्मेचें मुखकमल दुःखाग्नीनें कोमेजलें होतें. त्या तिच्या अंगतापाचें शमन होण्याकरितां दासी चंदन लावित होत्या व हातांत सुंदर कमळें देत असून अंगावर पद्मराग मिश्रित नीर सिंचन करित होत्या. अशा रीतीनें दासी अनेक प्रकारचे उपचार करून थकल्या पण तापशांति न होतां ती तळमळत होती. जसा अग्नि प्रज्वलित होतांच, त्याच्या शमनार्थ घृताचें सिंचन केलें असतां, जास्त धडकतात. त्याप्रमाणेंच पद्मेची स्थिति झाली होती.

अशा त्या दुःखित पद्मेस शुकानें पाहून, तिला करुणावाणीनें ह्मणाला—हे पद्मे राजकुमारिके! तूं सुखी आहेस ना? असे शुकाचे मधुर शब्द कानीं पडतांच पद्मा आनंदानें वर उठून ह्मणाली—हे शुकेंद्रा! ये ये माझ्याजवळ ये. तुझ्या आगमनानें माझ्या हृदयास आनंद झाला आहे. बा सख्या! तूं सुखरुप आहेस ना? असे तिचे कुशल प्रश्न ऐकून, कीर ह्मणाला—तुझ्या कृपाकटाक्षें करून मी कुशल आहें. मग पद्मा

पुनः ह्मणाली तूं गेल्यापासून माझें अंतर अति व्यग्र झालें असून, मला कांहीं सुचत नाहीं. आतां तुझें दर्शन झाल्याबरोबर मी शांतिरसायण पावेन असें वाटतें, पण तें मजसारख्या भाग्यहीन कुमारिकेस कोठून प्राप्त होईल.

मग कीर ह्मणाला-राजकन्ये ! शांतिरसायणाचा लाभ अगदीं जवळ आहे हें माझें वचन सत्य मान. पद्मा ह्मणाली, मी दुर्दैवी, मला सौभाग्यदशा कोठून प्राप्त होईल. तरी वरागमनाची गोष्ट मला सत्य सांग. असें तिचें वचन ऐकून कीर ह्मणाला—गे वरवर्णिनी ! मी जंबुद्वीपांत जाऊन कल्कीस येथें आणिला असून, त्याला तुझ्या बापाच्या नगराबाहेर उपवनांत सरोवराच्या तीरीं ठेवून, तुला सांगण्याकरितां आलों आहे ! असें ऐकतांच पद्मेनें मनोरथ पूर्ण झाला असें मानिलें. आणि मोठ्या आदरानें शुकास हातीं धरून त्याच्या चंचुपुटीचें चुंबुन घेतलें.

नंतर पद्मा जलक्रीडेच्या मिषानें मुख्य सखीस ह्मणाली— जलक्रीडेविषयीं माझें मन उत्सुक झालें आहे. तरी तुह्मीं मजबरोबर चला. आपण उपवनांतील तळ्यांत जाऊं तेथें माझें अंतर राजी करा. असें बृहद्रथ बाळा बोलून विमला, कुमुदा, कामकंदला, चारुमती, विलासिनी, कमला, लीला, मालिनी अशा आठ सख्यांसह पालखींत बसून, उपवनांत

येण्यास निघाली. पूर्वी जशी भीमकनंदिनी (रुक्मिणी) कुलाचाराचें मिष करून यदुपतीच्या दर्शनास अंबिकेच्या मंदिरांत गेली, तशीच पद्मा राजकुमारी कल्कीच्या दर्शनास निघाली. तों नगरवासी जनांस कळलें कीं, "आज राजदुहिता जलक्रीडार्थ सरोवरास चालली आहे." असें ऐकतांच, नगरांतील पुरुषजनांस तिच्या दर्शनानें आपण स्त्रीरूप पावूं अशी भीति पडली, ह्मणून सर्वांनीं आपापल्या स्त्रियांकडे बाजारांतील देवघेवीचा व्यवहार सोंपवून, कित्येक अंतरगृहांत लपून बसले व कित्येक मार्गस्थ झाले. मग मत्त पालख्या वाहणाऱ्या स्त्रियांनीं पद्मेस शिबिकेंत बसवून सरोवराच्या तिरीं आणिली. ती मेघांतील विजेसारखी पालखींतून खालीं उतरली आणि सख्यांसह तळ्यांतील शंखाप्रमाणें स्वच्छ पाण्यांत प्रवेश करती झाली. मग त्या मुलींनीं एकमेकींचे हात धरून, स्नानें केल्यावर पोंहणी घेऊं लागल्या. एकएकीपुढें पोंहत आहे तों दुसरी तिला जाऊन धरी. इतक्यांत तिसरी बुडी मारून पुढलीस खालीं ओढी पुनः त्या तीरास येऊन एकदम उड्या टाकून, तळ काढून वर येत. पुनः पाण्यांत बुडी घेऊन एकमेकीस शोधून काढीत. असें त्यांचें पोहणें पाहून मगरीसुद्धां तटस्थ झाल्या. कांहीं एकमेकींचे हात धरून उदकांत चक्राकार फुगड्या

घालीत. तेव्हां त्यांचा सुख पद्मगंध आकाशांत जाई, त्याच्या करितां भ्रमर झेंपा घालित असत.

अशाप्रकारें त्या क्रीडा करित असतां, पद्मेला शुकानें सांगितलेल्या गोष्टीची आठवण पडून, ती कामसंतप्त राजकन्या सरोवराच्या तीरावर येऊन, शुष्क वस्त्र नेसून, अलंकार चढवून, शुकास ह्मणाली–आतां प्राणसखा कोठें आहे तो मला दाखीव. शुक ह्मणाला–राजसे ! स्वामी, कदंबतळीं निजले आहेत, चल तुला दाखवितों. असें बोलून तीं उभयतां कल्कीजवळ गेलीं, तो कदंबाच्या वृक्षाखालीं स्फटिक मण्याच्या शिळेवर निद्रा केली आहे असें दृष्टीस पडलें त्याचें कोटिसूर्यासारखें तेज असून, पीतांबर विजेसारखा झळकत होता. महामण्यांचे अलंकार सर्व अवयवीं शोभत होते. हृदयावर श्रीवत्सलांछन, कंठांत कौस्तुभमणी, गळ्यांत वैजयंती माळा, कटिप्रदेशीं रत्नखचित मेखळा व कानांत कुंडलें शोभा देत होतीं.

अशा अनुपम्य रूपावरून कोटी मदनांची कुर्वंडी करून टाकावी असें वाटे. ज्याचें लावण्य पाहून रंभा, ऊर्वशी, मेनका, नागिणी भुलून कामज्वरानें पीडित होत्सात्या तटस्थ होत असत. असें कल्कीचें अद्भुत रूप पाहून पद्मा चकित होऊन तिच्या चित्तवृत्ति विरून गेल्या तिला मी येथें

कशास आलें? माझा हेतु काय होता याचें स्मरण मुळींच राहिलें नाहीं. असें तिचें चित्त कुंठित झालें. नंतर एक क्षण लोटल्यावर सावध झाली. त्याबरोबर कीर कल्कीस जागें करण्याकरितां पुढें सरकावला. असें पाहून राजकन्येनें "आपल्या दर्शनानें कल्कीस स्त्रीत्व प्राप्त होईल" अशा शंकेनें शुकाजवळ भाषण करण्यास सुरवात केली.

ती म्हणाली—आज आकाशमार्गानें गमन करितांना फार श्रम झाले असतील ह्मणून पुरुषोत्तम निद्रिस्थ झाले आहेत. तरी त्यांचा निद्राभंग करूं नको. असें शुकाजवळ बोलून मनांत विचार करूं लागली—हा तेजोराशी पुरुष अति प्रबळ व अतिरूपी साक्षात् हरिस्वरूपी आहे. याच्या उपमेस त्रैलोक्यमंडळांत दुसरा कोणी नाहीं. जयंत ( इंद्रपुत्र ) स्कंद ( कार्तिकस्वामी ) इंद्र, सोम, वरुण, मदन, इत्यादि यांच्या रूपावरून ओंवाळून टाकावे. असा हा श्रेष्ठ पुरुष आहे, परंतु माझें भाग्य निकृष्ट! कदाचित् माझ्या दर्शनानें स्त्रीरूप पावेल कीं काय कोण जाणे! मला शंकरांनीं जो वर दिला तोच प्रखर शाप होऊन बसला व माझी समग्र पूजा व्यर्थ गेली. असें बोलून आणखी ह्मणाली—अहा प्रारब्धा! मी किती हांका मारूं? मर मररे अहा दुष्टा विधात्या! माझ्या नशिबीं हें काय लिहिलेंस? माझा जन्म व्यर्थ होय. आतां

हा देह ठेवून काय उपयोग ? प्राण द्यावा तर अधोगती प्राप्त होते असा शास्त्राचा नियम आहे. तर आतां मी हें महत् संकट कोणत्या रीतीनें लोटून काळ कंठूं ? हर हर माझा जन्म व्यर्थ गेला !

अशा प्रकारें राजबाळा विचार करित असतां विव्हळ झाली व तिच्या शोकाग्नीच्या ज्वाळा भडकून मुखाची कळा तेजहीन झाली. तों कल्कीनें तिचें चित्त जाणून तत्क्षणीं जागें होऊन नेत्र उघडिले; तों बृहद्रथ राजाची कन्या दृष्टीस पडली. त्यावेळीं जशी माधवापुढें तेजःपुंज लक्ष्मी तशी पद्मा दिसत होती. तिला सखीजनांसह आपल्या सन्निध पाहून कल्की तिला म्हणाला हे सकुमारे चंद्रमुखे, विद्रुमाधरे ! (पोंवळ्यासारखे लाल ओंठ जिचे) ये ये, तुझें कुशल असो. तुझा समागम होतांच मी कुशल पावेन. तरी कामाग्नीनें तापलेल्यास तुझ्या मुखचंद्रानें शांत कर. मी कामरूपी सर्पानें दंश केल्यामुळें त्या विषानें पीडित होऊन माझें जीवित दुर्लभ झालें आहे, तरी तुझें लावण्यामृत माझी शांति करो. माझ्या हृदयांत कामरूपी हत्ती माजला आहे, त्याच्या गंडस्थळाचें विदारण तुझ्या दोन भुजांचे नखांकुश करोत. सुंदरी ! तुझ्या हृदयावर दोन नूतन स्तन उठले आहेत, ते कामाच्या चाबुकांप्रमाणें शोभायमान, वर्तुळ कठिण दिसत

आहेत, ते माझ्या हृदयानें अभिमानरहित होऊन, माझें प्रिय पूर्ण करोत. तुझ्या केळीच्या खांबासारख्या मांड्या रुंद ढुंगण माझें संभोग महाकाम पूर्ण करोत. तसेंच कोमलांगाच्या संगसुखानें माझी हौस जास्त वाढो. हे सुंदरी ! तुझ्या पद्-कमलाच्या अंगुलींत नुपूरांचा नाद येत आहे, तेंच माझ्या हृदयावर ठेवून कामानल शांत कर.

असें कलिकुलविध्वंसक कल्केश्वर याचें वचनामृत ऐकतांच, पद्मेचें मागील सर्व दुःख तात्काल नाहींसें झालें. त्याची सत्पुरुषता पाहून, पद्मा आपल्या सखिजन परिवारासह आनंदित झाली. आणि जो धीरवीर गंभीर खड्ग हस्तरूपी निजपती जो श्रीकल्केश्वर त्यास साष्टांग नमस्कार केला. व हात जोडून खालीं मान घालून, मंदस्वरानें बोलूं लागली. तें बोलणें पुढें वर्णन केलें आहे.

---

## अध्याय १० वा.

## कल्कीपद्मेचें लग्न व स्त्रीरूपीराजांचें पुरुषरूपी होणें.

नंतर पद्मा कल्कीस पाहून, दयासागर लक्ष्मीपती हाच असें ओळखून, लज्जित होऊन स्तुति करूं लागली. ती म्हणाली–हे सर्व त्रैलोक्यनाथा, धर्मरक्षका रमाकांता, सर्वांपालिकडच्या, तूं आदि मध्य अंतरहित आहेस. तूंच जगन्नियंता

व उत्पत्ति स्थिति प्रलयकर्त्ता असून भक्तजनास मोक्ष देणारा व ध्यान करण्यास योग्य असा तूं आहेस. तुझे गुण, नामें, कर्में अनंत असून, तुझें वर्म कोणासही कळत नाहीं. सनकादिक, सिद्ध तुझ्या धामाचें चिंतन करितात. तूं सगुण गुणातित, मायापती माया रहित असा कर्त्ता अकर्त्ता व्यक्ताव्यक्त परब्रह्म आहेस. तूंच नाना अवतारांच्या मालिका गुंफतोस. असा तूं कैठभ दैत्याचा अंतकरणारा दुष्ट जनास मारून, भक्तांचें रक्षण करतोस. तुझीं स्वरूपें वर्णन करतां करतां वेद थकून त्यांची मति कुंठित झाली. जो सच्चिदानंद श्रीहरी तोच तूं आहेस. असा माझ्या मनाचा निश्चय झाला. तरी आतां सुप्रसन्न होऊन माझें संरक्षण करावें. मी तुह्मांस वश आहें. जप तप दानें व्रतें यांनीं संतुष्ट करून, जें दुर्मिळ पदकमल तें आज मला लाभलें आहे. ह्मणून मी धन्य झालें.

हे दयासागरा, हृषिकेशी ! आतां चरणीं नमन करून आपला आगमन वृत्तांत जनकास सांगावयास जातें, तरी आपली आज्ञा असावी. असें राजकन्या बोलून चरणीं माथा ठेवून, बापाच्या घरीं आली. मग ती सखीस ह्मणाली— सखे विमले ? शुकदर्शनादि सकळ वृत्तांत तुला माहित आहे. तरी तो माझ्या पित्यास एकांतीं जाऊन कथन करून, त्यांस घेऊन ये.

असें पद्मेचें भाषण ऐकून विमला सत्वर गतीनें राजाजवळ गेली आणि विनंती करती झाली कीं, हे सिंहलेश्वरा ! एक अद्भुत वृत्त सांगतें श्रवण करा. पूर्वकाळीं एक चतुर कीर राजकन्येच्या मंदिरा शेजारील वृक्षावर येऊन बसला व पद्मेस प्रश्न केला कीं, राजतनये ! तुझें मुख आज म्लान कां दिसतें. असें शुकाचें वाक्य ऐकून, पद्मा मनांत चकित होऊन, तिनें शिववरादि वृत्त कथन केलें. तेंव्हां तो राजकन्येस ह्मणाला—"पद्मे ! मनांत चिंता करूं नको. धर्म रक्षणाकरितां हृषिकेशी जंबुद्वीपांत अवतरला आहे. त्याचें नांव कल्की असून, तोच तुझें पाणिग्रहण करील. आतां मी जंबुद्वीपांत जाऊन तुझें वृत्त त्यास सांगून येथें घेऊन येतों. असें सांगून आकाशमार्गानें उड्डाण करून, गेला तो आज कल्कीस घेऊन येथें प्राप्त झाला आहे. त्यानें कल्कीस उपवनांत ठेवून पद्मेच्या मंदिरास येऊन त्याच्या आगमनाचा वृत्तांत कथन केला. ह्मणून पद्मा सख्यांसह उपवनांत गेली तो कदंबाच्यातळीं रत्नाकांत शिळेवर निद्रिस्थ पडला होता. त्याचें लावण्य काय वर्णन करावें ! त्रैलोक्यांत त्याच्या समान कोणी नाहीं. त्याच्या तेजावरून कोटी भानु ओंवाळून टाकावे.

मग कल्कीस पाहतांच पद्मा चकित होऊन, 'माझ्या

दर्शनानें यास स्त्रीरूप प्राप्त होईल कीं काय? अशा संशयानें तटस्थ उभी राहिली. तेव्हां तो चराचर ब्रह्मांड धनी कल्केश्वर, पद्मेचें चित्त जाणून तात्काल जागा झाला; तोंच परस्परांची दृष्टादृष्ट झाली. त्यावेळचा आनंद अवर्णनीय होय. नंतर उभयतांच्या गोष्टी झाल्या तरी त्याच्या स्वरूपाचा पालट झाला नाहीं. तोच कल्कीरूपी नारायण असा आमचा निश्चय झाला. जसें विष्णुहृदयावर श्रीवत्सलांछन, वक्षस्थळीं कौस्तुभमणी, गळ्यांत वैजयंती माळा, आजानुबाहु, त्याचप्रमाणें त्याचें रूप आहे. तें पाहून पद्मेनें त्याला वरण्याचा निश्चय केला. प्रकार आज घडला तो तुम्हास कथन केला आहे. आतां पुढें जें करणें असेल तें करावें.

असें विमलेचें भाषण ऐकून, राजा हर्षित होऊन म्हणाला—माझें भाग्य आज उदयास आलें. वैकुंठवासी नारायण माझ्या कन्येचें पाणिग्रहण करण्यास आला म्हणून मी धन्य झालों. असें बोलून नगरांत दवंडी पिटविली कीं, "आज सर्वांनीं नगरांत ध्वज, पताका, तोरणें उभारावीं व चंदन कुंकुमाचे सडे मार्गांत घालून बुरुजांस रंग लावावे. राजवाडा, देवालयें सुशोभित करून, नगरांतील लोकांनीं आपलीं मंदिरें चित्रविचित्र करावीं. घोडे, हत्ती, रथ नाना अलंकारांनीं भूषित करून, मेणे, पालख्या शृंगारून तयार क-

राव्या. वेश्या जनांनीं राजवाड्यांत नृत्यगायनें करावीं आणि कल्कीस आणण्या करितां चतुरंग सेना सिद्ध ठेवावी. ”

अशी नागरिकांस राजाज्ञा होतांच, सर्वांनीं महोत्सव केला. मग राजा सिंहलेश्वर सर्व पूजोपचार, पुरोहितादिक विप्र, मंत्री, मित्र, प्रधान, हत्ती, घोडे, पायदळ रथ, नगरवासी जन यांस बरोबर घेऊन कल्कीकडे निघाला. मार्गांत फार दाटी झाली, मंगल वाद्यांच्या गर्जनेंत वारांगना नृत्य करूं लागल्या.

अशाप्रकारें मोठ्या थाटानें राजा उपवनासीं आला तों कदंब वृक्षाच्या खालीं हृषिकेशी स्फटिक मण्याच्या दिव्य शिळेवर बसलेला दिसला. गळ्यांत पद्माची वनमाळा पायांपर्यंत लोंबत होती. वर्षाकालींच्या मेघाप्रमाणें अंगाचावर्ण असून, विजेसारखा पीतांबर परिधान केला होता. महामण्याचे अलंकार सर्व अवयवांत शोभत होते, असा आजानुबाहु कमलनेत्र प्रसन्न असा चंद्रवदनी दिसत होता. हृदयावर भृगुपदाचें लांछन, कंठांत कौस्तुभमणी, गळ्यांत वैजयंती माळा, कमरेंत रत्नखचित मेखळा, असें त्याचें अद्भुत लावण्य पाहून सर्वांस आनंद झाला.

त्यावेळीं राजाचें शरीर रोमांचित होऊन नेत्रांतून प्रेमाचा पाझर सुटला. तेव्हां राजानें चित्तांत निर्धार केला कीं हाच

ईश्वर होय. मग दोन्ही कर जोडून, बृहद्रथराजानें विनंति केली कीं, "हे कल्केश्वरा, लक्ष्मीवरा, शारंगधरा, जगदुद्धारा ! तुला नमन असो. तुझें स्वरूप ज्ञानासही न दिसणारें तें आज मला जसा यदुवीर मुचकुंदास वनांत भेटला त्याप्रमाणें प्रत्यक्ष दिसलें. माझें भाग्य आज उदयास आलें ह्मणून आपलें दर्शन घडलें. मी जपतपादि पुण्य काय केलें होतें कळत नाहीं !

असें आदरानें बोलून यथाविधी पूजन केलें. मग कल्कीस बरोबर घेऊन राजा नगरास निघाला. त्यावेळीं दमामे नौबती नानाप्रकारचीं मंगलवाद्यें यांची गर्जना होऊन, वेश्या जनांचे ताफे नृत्य गीतें गाऊं लागले. अशारीतीनें मोठ्या उत्सवानें कल्केश्वरास नगरास आणून सुंदर बंगला राहावयास दिला. मग उत्तम सुमुहूर्त पाहून, कन्यादान करून, वर दक्षिणार्थ घोडे, रथ, हत्ती असंख्य दिले. पद्मा ती प्रत्यक्ष लक्ष्मी व पद्मनाभ तो विष्णु तोच हा कल्केश्वर होय ह्मणून उभयतांचें लग्न लागलें. त्यांच्या विवाहाचें वर्णन करण्यास कवीची मति कुंठित झाली. रुक्मिणी स्वयंवर ग्रंथांत एकनाथानें लग्न सोहळा वर्णन केला आहे तसाच येथें श्रोते जनांनीं मानावा. असो. मग राजानें सर्व ब्राह्मणांस द्रव्यराशी वाटल्या, नरनारींस वस्त्रें भूषणें दिलीं. असा चार दिवस लग्न सोहळा झाला. तेव्हां कौमुदी राणी व बृहद्रथ

हर्षभरित झालीं. कल्कीस पद्मा कांता मिळाली व पद्मेस कल्की भ्रतार मिळतांच, उभयतां आपापल्या चित्तांत अतिशयित आनंदित झालीं. मग तो कल्कीनारायण सिंहलद्वीपाची शोभा पाहाण्याकरितां कांहीं दिवस तेथेंच राहिला. तों स्वयंवरांत जे राजे स्त्रीरूप पावले होते ते कल्केश्वराच्या दर्शनास आले. त्यांनीं साष्टांग नमस्कार घालून, आपापलें वर्तमान कथन केलें. तें त्यांचें दुःख जाणून, कल्की ह्मणाला–"तुह्मीं सर्वांनीं रेवाजलीं जाऊन स्नानें करा ह्मणजे आपापलीं पूर्वरूपें पावाल."

अशी आज्ञा होतांच स्त्रीरूप पावलेले राजे रेवाजलांत स्नान करून बाहेर येतांच पूर्वरूपें पावते झाले. असें पाहून चकित होत्साते, कल्कीप्रभाव अद्भुत आहे असें बोलून ह्मणाले–हा रमाकांतच कल्की रूपानें अवतरला आहे. असा मनांत निश्चय करून चरणीं नमन केलें आणि हात जोडून स्तवन करूं लागले.

नृप ह्मणाले–हे जयजयाजी जगदुद्धारा, भक्तरक्षका, दुष्टसंहारका, मायावरा, परमेश्वरा तुला नमन असो. तूं सच्चिदानंद, मायातीत परब्रह्म, तुला कर्म अकर्म नसून, धर्मरक्षक आहेस. त्वां श्रीमायेचा आश्रय धरून पृथ्वीवर नाना अवतार घेऊन, स्वेच्छेनें विलास क्रीडा करून धर्मरक्षणी सादर

आहेस. शंखासुरानें वेद बुडविले त्याचा मीनरूपानें उद्धार करून, दुष्टांस निर्दाळून धर्माचें रक्षण केलेंस. देवदैत्यांनीं समुद्रमंथन करतांना मंदरगिरी बुडत होता तेव्हां कूर्मरूप धारण करून अमृत देवांस दिलें ! हिरण्याक्षानें देवांस जिंकून पृथ्वी पाताळांत घातली त्यावेळीं वराहरूपानें त्यास मारून पृथ्वीचा उद्धार केला ! हिरण्यकश्यपु दैत्य ब्रह्मदेवाच्या वरानें आनिवार होऊन, त्यानें इंद्रादि देवांस जिंकून गाई ब्राह्मणांस पीडा दिली तेव्हां नरसिंहरूप धरून त्या दैत्याचा संहार करून गो ब्राह्मणांचें रक्षण करून धर्मवर्धन केलें ! वामन अवतार धरून बळीजवळ दान मागून त्यास पाताळांत घातलें व देवमंडळी सुखी करून द्वार रक्षण केलें ! राजे मस्त होऊन त्यांनीं धर्ममर्यादा उल्लंघन केल्या म्हणून भृगुवंशांत परशुराम अवतार होऊन, सहस्रार्जुन राजानें पितृधेनूचें हरण करतां त्वां फरश घेऊन एकविस वेळ पृथ्वी निःक्षत्रिय केली ! दुराचारी रावणानें देवांस बंदींत घालून गोब्राह्मणांस पीडून भूमिभार केला, तेव्हां तूं रामावतार होऊन रावणादि निशाचराचें मर्दन करून देवांची बंदिवासांतून मुक्तता केली ! पुनः या भूमीस कंसादि राजे मातलेल्यांस मारण्याकरितां तूंच श्रीकृष्ण अवतार घेऊन बालक्रीडादि मिषें करून, त्या दुष्टांस संहारून भक्तजनांचें रक्षण केलेंस !

कलियुगांतील पापिष्ठ जनांस पाहून तुझ्या मनाला कंटाळा आला ह्मणून तूं बौद्धराणा होऊन भक्तरक्षण करीत आहेस. तसेच बौद्ध, पाखंड, म्लेंच्छ, कलियुग यांचा नाश करून धर्मरक्षण करावें, ह्मणून तूं सर्वेश्वर कल्की अवतार धारण करून आमचा स्त्रीरूपापासून सांप्रत उद्धार केला आहेस. तुझ्या अवतार मालिका ब्रह्मादिकांसही कळत नाहींत. मग नाना प्रकारच्या वासनांनीं व्याकुळ झालें आहे चित्त ज्यांचें अशा आमच्या सारख्या मूर्खांची मति काय चालणार? तुझ्या दुर्लभ चरणांचें आह्मांस दर्शन झालें तरी आतां आह्मांस आश्वासन द्यावें. अशा प्रकारची स्तुति करून, स्त्रीपुरुषांपासून मुक्त होऊन पूर्वरूपें पावलेल्या राजांनीं भक्तिभावानें कल्की नारायणाच्या चरणकमलीं लोटांगणें घातलीं.

---

## अध्याय ११ वा.

# राजांस अनंत मुनीचा बोध (मायेचा चमत्कार.)

सूत शौनकादि ऋषींस सांगतात-कल्कीनाराण सर्व राजांची स्तुति ऐकून सुप्रसन्न झाला. मग त्यांस ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णांचें निरनिराळें धर्म विवरण कथन केलें आणि संसारी जनांचें कर्माकर्म व वेदाज्ञा सांगितल्या. त्या ऐकून भूपाळ शुद्धचित्त झाले. नंतर कल्कीना-

रायणाचे पद कमळाचें वंदन करून बोलूं लागले कीं-हे जगदुद्धारा, ब्रह्मदेव जनका, लक्ष्मीवरा कल्केश्वरा ! आमच्या संशयाचें निरसन करावें. आह्मीं राजे असतां स्त्रीरूप पावलों ते तुझ्या दर्शनानें पुनः पूर्ववत झालों तरी हें स्त्रीत्व व नरत्व असे दोन भेद कोणास कोठून झाले ? तें आह्मांस कथन करावें. आणि स्त्रीत्व किंवा पुरुषत्व, वृद्धपण, तरुणपण व बाल्यावस्था, सुख, दुःख, बुद्धि व मूर्खपणा, असे हे नानारीतीचे प्रकार कोणास कोठून उत्पन्न होतात, याचें मुख्य कारण कोणतें ? हें आह्मांस समजलें नाहीं ह्मणून आश्चर्य वाटतें; तरी कृपावंत होऊन संशय दूर कर.

असें राजांचें वचन ऐकून कल्कीनारायण अनंत नामक मुनीचें स्मरण करता झाला. त्यावरोबर तो संन्यास व्रती अनंत ऋषी कल्कीदर्शना करितां सभेंत आला आणि हस्त जोडून कल्कीस ह्मणाला-हे खड्गपाणी प्रभो ! काय आज्ञा आहे ? मी कोणतें कार्य करावें किंवा कोणत्या ठिकाणीं जावें तें मला सत्वर सांगावें.

असें अनंतमुनीचें वचन श्रवण करून, कल्केश्वर हास्य करून त्यास गूढ वचन बोललाकीं-हे अनंत मुने गुणराशी ! तूं केलेंस, पाहिलेंस व सर्व जाणलेंस व केलेलें नाहीं व पाहिलेलें नाहीं तरी आतां अनिवर्तकीं ( जेथून मागें फिरत

नाहीं ) गमन कर. असें कल्कीचें वचन ऐकून अनंतमुनी हर्षित होऊन गमनाविषयीं उद्युक्त झाला. असें पाहातांच, सर्व राजे आश्चर्यानें चकित होऊन ह्मणाले–हे कल्केश्वरा पद्मापती ! तुह्मीं उभयतांनीं जें भाषण केलेंत त्याचा अर्थ आह्मांस समजला नाहीं. तरी त्या अर्थाचें विवरण तुमच्या मुखानें ऐकावें अशी इच्छा झाली आहे. यास्तव मुनीनें काय विचारलें ? तुह्मीं त्याला उत्तर काय दिलें तें आह्मांस सांगितलें पाहिजे.

अशी नृपांची वाणी श्रवण करून पद्मापती ह्मणाला–हा प्रश्न तुम्हीं अनंतमुनीस विचारा. असें कल्कीनें सांगतांच सर्व राजे प्रसन्न मनानें मुनीस नमन करून विचारूं लागले. ते ह्मणाले—अगा श्रेष्ठा अनंत मुने ! आतां तुमचें उभयतांचें जें भाषण झालें, त्याचा अर्थ आम्हांस कळला नाहीं तरी तो उघड करून सांगावा. अशी राजांची सुंदर वाणी श्रवण करून ह्मणाला–अहो, सुगुणी भूपहो ! सांगतों श्रवण करा.

माझा विद्रुमशर्मा नांवाचा पिता वेदवेत्ता, परहित जाणणारा व धर्मज्ञाता असा होता. तशीच सुरूप व पतिसेवेंत तत्पर अशी महापतिव्रता सोमा नांवाची माझी माता होती. ती उभयतां पुरिकापुरींत आनंदानें राहात असतां, पुढें ह्मातारपणांत मी त्यांच्या पोटीं नपुंसक जन्मलों, त्यामुळें पि-

त्यास फार दुःख झालें. मग तो घर व स्त्री यांस टाकून शिववनास जाऊन, गंगास्नान करून षोडशोपचारें शंकराची पूजा केली व स्तवन आरंभिलें—तें असें कीं—हे वेद सारा, मदनदहना, गजास्यजनका, जगद्वंद्या, कैलासधामा तूं सर्वोत्तम सच्चिदानंद आहेस. तूं सकल ब्रह्मांडव्यापक असून, तुझें स्वरूप वर्णन करतांना वेदही थकून गेले. तूं सृष्टिचा कर्ता, संहार करणारा व भक्तांची इच्छा पूर्ण करणारा आहेस. तुझे गुण वर्णन करतांना शेषही शीण पावला. जे तुझी भक्ति करितात त्यांस अक्षय मुक्ति देतोस. जे तुला अनन्य शरण येतात त्यांच्यावर कृपा करून मनोरथ पूर्ण करतोस. विष्णु, गणेश, इंद्र इत्यादि पुष्कळ देव आहेत; त्यांत सत्वर प्रसन्न होणारा तूंच आहेस असें लोक बोलतात. यास्तव सर्व देव सोडून तुझ्या चरणीं शरण आलों आहे तरी कृपाळू होऊन माझा मनोरथ पूर्ण कर.

असें स्तवन ऐकून, शंकरास संतोष होऊन पार्वतीसह वर देण्याकरितां तात्काल प्रगट झाला. आणि ह्मणाला—हे विद्रुमा ! इच्छित वर माग मी तुझी कामना पूर्ण करीन. असें शिवाचें वचन ऐकतांच, माझ्या बापानें नेत्र उघडिले तोंच उमापतीची दिव्यमूर्ती दृष्टीस पडली. त्याबरोबर पित्यानें चरणावर मस्तक ठेवून माझ्या जन्माची सार्थकता झाली असें

मानून ह्मटलें–शंभो! आपण वर देण्यास सिद्ध झालेत, तरी माझा एकच पुत्र आहे तो षंढ निपजला आहे त्याला पुरुषत्व देऊन आमची वंशवृद्धि करावी.

अशी पित्याची वाणी श्रवण करून, शंकर पार्वतीच्या संमतीनें तथास्तु बोलून अंतर्धान पावला. नंतर माझा पिता घरीं आला. तोंच माझें षंढत्व जाऊन, मला पुरुषत्व प्राप्त झालें. तें पाहून पित्यास मोठा आनंद झाला. पुढें आठव्या वर्षी माझें मौंजीबंधन करून वेदशास्त्रांत प्रवीण केल्यावर बारावे वर्षी यज्ञरात ब्राह्मणाची कन्या स्वरूपानें शोभणारी शालिनी नांवाची हिच्या बरोबर लग्न लाविलें. पुढें मी स्त्रीलंपट झालों. पुढें किंचित् काळ लोटतांच मातापिता मृत्यु पावलीं. त्यांची क्रिया वगैरे यथासांग केली. मग श्राद्ध करून ब्राह्मणांस पक्वान्नाचें भोजन घातलें. पुढें मला मातापित्याचें वियोगदुःख सहन होईना, ह्मणून मी विष्णुसेवेस लागलों. त्याचें जपध्यान पूजन नित्यनेमानें करितांच नारायण प्रसन्न होऊन, स्वप्नांत स्वस्वरूप दाखवून, मला ह्मणाला–" मायेनें सर्व जग व्यापलें आहे. माता, पिता, बंधू, आप्त, स्त्री, कन्या, पुत्र इत्यादिकांवर ममता माया भ्रमानें वाढते. मायाभ्रम महा दारुण असून, त्यानें सर्व जनांस नाडून आपण कोणाचे कोण हें भ्रमानें ओळखीत नाहींत. जन्ममरण, अधःपतन

भ्रमानेंच होतें. तो भ्रम गेला असतां आपणाशिवाय कोणी नाहीं. घागरी, मडकीं, रांजण यांत सूर्य बिंबला आहे परंतु स्त्री पुरुष नपुंसकपणा त्यास कल्पातींही बाधत नाहीं. सोनें खरें व अलंकार लटके, एक समुद्र व तरंग मिथ्या, तसेंच चराचर ब्रह्मरूप आहे. घट अनेक व आकाश एक. अनेक मणी व सूत्र एक, अनेक मातृका व ओंकार एक, तसेंच ब्रह्म सर्वत्र आहे. म्हणून मायेची गांठ सोडिली असतां सर्व भ्रमाची निवृत्ति होऊन, कर्मीं ब्रह्मप्राप्ती होते, त्रिजगत् हें ब्रह्मरूप आहे."

असें त्याचें भाषण ऐकून, मी प्रतिवादास उद्युक्त झालों तोंच नारायण तत्क्षणीं गुप्त झाले. मग मी जागा होऊन चोहोंकडे पाहूं लागलों तों कोठेंच काहीं दिसेना, त्यामुळें चकित होऊन, पुरिकापुरीचा त्याग करून, भार्येसह विष्णुस्थानास गेलों. तेथें जो देव पुरुषोत्तम त्याच्या दक्षिण दिशेस विस्तीर्ण आश्रम बांधून परिवारासह राहिलों, आणि भगवन्मायेचें दर्शन व्हावें असा हेतु धरून हरिमंदिरांत आसन घालून षोडशोपचारें पूजन, नृत्यगायन, नामजप चिंतन भक्तिभावानें करूं लागलों. अशीं बारा वर्षें लोटतांच एक नवल झालें, तें असें—

मी भाद्रपद शुद्ध एकादशीस उपोषण करून, दुसऱ्या दि-

वशीं स्नान संध्या सारून, तो द्वादशीचा दिवस बुधवार श्रवण योग अशा पर्वावर समुद्रस्नानास परिवारासह गेलों. तेथें परिवार जनांस अगोदर स्नानें करवून, मग मी स्नानाकरितां समुद्रांत शिरलों. तोंच समुद्र खवळून भयंकर लाटा उसळूं लागल्या, त्यामुळें माझ्या सामर्थ्याचा भंग झाला. माझें मांस जळचरें तोडूं लागलीं तेव्हां माझे पंचप्राण व्याकूळ होऊन, तेथें रक्षणकर्त्ता कोणीच नव्हता. त्यावेळीं प्रचंड वाऱ्यानें लहरीवर लहरी येऊन त्यांत मी सांपडून दक्षिण सिंधूच्या तीरावर जाऊन मूर्च्छित पडलों. तेथें वृद्धशर्मा नांवाचा एक ब्राह्मण संध्योपासना करीत होता; त्यानें पाहतांच त्यास दया उत्पन्न होऊन मला आपल्या घरीं उचलून नेलें व औषधोपचार केले. तो वृद्धशर्मा संतति संपत्तियुक्त, धर्मिष्ठ असून त्याची सुशीला नांवाची स्त्री पतिव्रता होती. तिनें माझें पुत्रवत् पालन केलें. त्यावेळीं मला दिशा, देश, काल याचें ज्ञान मुळींच नव्हतें. मी हींच माझीं मातापितरें असें मानून त्यांच्याकडेसच कालक्रमणा करित होतों. मग वृद्धशर्म्यानें वेदशास्त्रांत माझें कुशलपण ओळखून, यास जांवई करावें अशी इच्छा धरून, आपल्या चारुमती नामक कन्येबरोबर माझा विवाह लाविला. तिच्याबरोबर मी नानाविध भोग भोगिल्यावर पुढें मला तिजपासून बुध, जय, वि-

जय, कमल व विमल असे पांच पुत्र झाले. ते गुणशौर्यानें व विद्याविनयरूप संपन्न असे पांच पांडवांसारखे निपजले. त्यामुळें मी जगांत विख्यात होऊन लोक मला इंद्रासारखे मानूं लागले.

पुढें मी बुध नांवाच्या वडील मुलाचें लग्न धर्मसार नांवाच्या ब्राह्मण कन्येबरोबर आरंभिलें. तेव्हां वेदसार ब्राह्मणानें पुण्याहवाचनादि उत्सव मांडला. मंगलवाद्यें, नृत्यगायनें सुरू झालीं. तेव्हां मी पुत्राच्या पुण्याहवाचनादि कर्माच्या दिवशीं देवऋषि पितृतर्पण करण्याकरितां समुद्रतिरीं आलों, तेथें समुद्रांत स्नान करून जों बाहेर येतों तोंच तीरावर एक आश्चर्य पाहिलें. तें असें—

पूर्वी द्वादशीच्या दिवशीं पुरुषोत्तमाची पूजा करून, परिवारासह जो समुद्रस्नानास गेलों होतों, तोच द्वादशीच्या पारण्याचा दिवस व तेंच स्थल, त्या ठिकाणीं परिवार जन स्नान करीत बसलेले पाहिले. तेव्हां मी वेड्यासारखा चोहोंकडे पाहूं लागलों. त्याबरोबर परिवारजन माझ्याजवळ आले आणि ह्मणाले-हे विष्णुभक्त ब्राह्मणोत्तमा! तुझ्या चित्तास व्यग्रता प्राप्त कां झाली? असें तूं नवल काय पाहिलेंस तें आम्हांस सांगून पारणें कर.

असें त्यांचें वचन ऐकून मी ह्मणालों-मी अद्भुत कांहीं

पाहिलें नाहीं व माझ्या चित्तास व्यग्रताही नाहीं, मी सावध आहें असें सांगून संध्यातर्पण केलें. नंतर परिवारासह आश्रमांत आलों, तरी अंतःकरण क्षणमात्रही स्वस्थ नव्हतें. पूर्वी हरिमाया पहावी असा जो मनाचा हेतु होता, तीच माया हरीनें दाखवून माझ्या चित्तास मूर्खत्व आणिलें म्हणून सर्व इंद्रियांस व्याकुलता प्राप्त होऊन क्षणभर चैन पडत नाहीं. माझी स्त्री, पुत्र, धन, घर व वृद्धशर्मादि यांचें वारंवार स्मरण होतें. मी कोण, कोठील व आतां कोणत्या स्थलीं येऊन राहिलों आहें ? जो दक्षिण देशस्थ वृद्धशर्मा ब्राह्मण त्याचा मी जांवई आहें, माझ्या स्त्रीचें नांव सुशिला. माझे पांच पुत्र असून, वडील मुलगा बुध याचें लग्न आरंभिलें होतें. असें असतां मी अकस्मात् अदृश्य होऊन सांप्रत या आश्रमांत येऊन राहिलों. आतां दक्षिण दिशेचा वृत्तांत जर खरा मानावा तर प्रत्यक्ष माझी भार्या मानिनी नांवाची येथें आहे. आणि तें असत्य म्हणावें तर सर्व प्रकारचे नानाभोग मी प्रत्यक्ष अनुभविले आहेत. असा माझ्या मनाला मोह उत्पन्न होऊन मी मूर्खासारखा बनलों आहें. तर ही स्वप्नावस्था किंवा जागृती हें कळत नाहीं.

आतां सत्यासत्य निवडून मला कोण सांगेल ? मी शरण कोणाला जाऊं ? असें बोलून नारायणाचा धांवा केला. तो

ह्मणाला-हे इंदिरावरा, वैकुंठवासिया सद्गुरो! मी संदेह-देहांत पडलों आहें तरी तुझ्याशिवाय मला तारणारा कोणी नाहीं. असा धांवा करून चंचल दृष्टीनें चोहोंकडे पाहूं लागला. त्यावेळीं त्याची स्त्री दुःखित होत्साती ह्मणाली-अहारे दैवा, हें काय केलेंस? माझ्या प्राणनाथास मूर्खवत् स्थिति कशी दिलीस? कुलदेवतेचा रोष झाला ह्मणून मम भ्रताराम भ्रम झाला कीं काय? किंवा भूत प्रेत यक्ष पिशाच्च, जलदेवता यांचें झडपण झालें कीं काय? तें कांहींच कळत नाहीं अथवा पित्तवायूच्या उद्भवानें भ्रम झाला किंवा काय? आतां काय उपाय करावा तें मला सुचत नाहीं. हे पुरुषोत्तमा! धांव धांव आणि माझ्या पतीचा भ्रम दूर कर.

असा मानिनीचा विलाप श्रवण करून मी भयाभीत झालों. तेव्हां सूर्यासारखा तेजस्वी एक परमहंस मला बोध करण्याकरितां माझ्या आश्रमांत आला. त्याला मी उत्तमासन बसावयास देऊन त्याचें यथासांग पूजन केलें.

---

## अध्याय १२ वा.

## राजांस अनंतमुनीचा बोध. ( माया व इंद्रियदमन. )

सूत शौनकादिकांस सांगतातः-सिंहलद्वीपस्थ राजांस अनंतमुनी ह्मणाला-तो परमहंस उत्तमासनावर वसतांच,

माझ्या आप्त जनांनीं विनंती केली कीं–हे यतिश्रेष्ठा ! हा अनंत महाज्ञानी असतां त्याची मूढवत् स्थिति होण्याचें कारण कोणतें ? आणि हा आपल्या पूर्व स्थितीस कसा पावेल ? तूं भूत भविष्य वर्तमान जाणणारा आहेस यास्तव हा प्रश्न विचारिला आहे. अनंत ह्मणाला–भूपहो ! असा माझ्या आप्तांचा प्रश्न ऐकून तो परमहंस ह्मणाला–हे अनंत मुनिवर्या ! तुझी चारुमती स्त्री, बुधादिक पांच पुत्र, धन, रत्नें, घर, मित्र, गोधनें हीं सर्व सोडून येथें केव्हां आलास ? वडिल पुत्राच्या विवाहाच्या दिवशीं तूं समुद्रस्नानास गेला होतास तेव्हां मला पाचारण केलें होतेंस, आणि आतां तूं येथें येऊन शोक करीत कां बसलास ? तुझें सत्तर वर्षांचें वय होतें तें आतां तीस वर्षांचें दिसत आहे. तर हें सर्व मला चमत्कारिक भासत आहे तर ही स्वप्नावस्था कीं काय ? येथें जी ही तुझी रूपवती स्त्री आहे ती तेथें मला दिसली नव्हती, अथवा हा मलाच भ्रम झाला कीं काय ? याविषयीं कांहीं कळत नाहीं. हें कसें कर्म ओढवलें ! येथें माझा व तुझा संयोग जाहला, हें मिथ्याभूत काय गौडबंगाल आहे. ही ईश-माया असावी असें वाटतें. ईश्वरी मायेचा अंत ब्रह्मादिकांसही लागला नाहीं. आतां ईश्वरी मायेचें स्वरूप कोणतें व तिनें जग उत्पन्न कसें केलें तें अनंता, तुला सांगतों श्रवण कर.

पूर्वी एक ब्रह्मानंद असतां, जो निःशब्द उठला तीच ध्वनी माया असें वेद बोलतात. समुद्रांत जी लहर उठते तशी चैतन्यरूपी आकाशांत मी ब्रह्म ह्मणून थोर हांक होते तिलाच माया असें ह्मणतात. ती आदिपुरुषाची चिच्छक्ती होय. तिनें पतीला सेजेवर निजवून सृष्टिकार्य आरंभिलें. प्रथम तिनें आपल्या सामर्थ्यानें महत्तत्त्व निर्माण करून, कालस्वभाव व कर्मात्मकापासून अहंकार झाला. मग विष्णु, रुद्र, ब्रह्मामय सत्व रज तमोगुण उत्पन्न करून, पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पंचमहाभूतें मायेनें उत्पन्न केलीं. त्या पंचभूतांचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच विषय निर्मिले. नंतर त्वचा, नेत्र, कर्ण, जिव्हा व घ्राण हें ज्ञानेंद्रियपंचक उत्पन्न केलें. मग हात, पाय, गुद, शिश्न व मुख हें कर्मेंद्रिय पंचक निर्माण केलें. नंतर प्राण, अपान, समान, उदान व व्यान असें वायुपंचक निर्मिलें. या पांच पंचकांची गणती पंचवीस होते.

अशीं पंचविस तत्वें करून, परस्पर प्रवेश केला. मग चिखल करून ब्रह्मांड रचना केली. त्यांत चार खाणी उत्पन्न करून, देव असुर नर धान्य पशुपक्ष्यादि जाती असे चौऱ्यांशी लक्ष जीव भरले. त्यांस मायेनें भुलवून, त्यांच्या मागें कर्मे लावून सर्वांस संसारांत टाकलें. मायेचें अद्भुत

सामर्थ्य कोणासही कळलें नाहीं. तिचीं ब्रह्मदेव, विष्णु व शंकर हीं तीन बालकें होत. त्यांस पूर्ण ब्रह्मस्वरूपास पाहूं देत नाहीं. अशी ती कवटाळीण केवळ विवशी आहे. सर्व चैतन्य झांकून अरूपास रूप आणून अनंत ब्रह्मांडीचे पुतळे एका सूत्रानें नाचविते. हिनें निर्गुणास गुण, निराकारास आकार, व अनामास नाम ठेवून जीवित्वास लाविलें. नानायोनींचे जीव फाशांत पाडले. निजात्म गोडी जिवास कडू भासवून विषय विषरूपी मोह भ्रमांत उत्तम गोडी आणिली. जसा मृगजळाचा पूर तशी माया मिथ्याभूत असून, सत्य किंवा लटकी हें ब्रह्मादिकांसही कळत नाहीं. तस्मात् जें जें दिसतें तें सर्व माया भ्रम कर्तृत्व होय. सर्व जीव भ्रमानें फसून त्यांस स्वरूपाचा अनुभव कळत नाहीं. भ्रमानें जन्ममरण व अधःपतन प्राप्त होतें. तो भ्रम संपूर्ण जातांच आपणांशिवास दुसरें कांहीं नाहीं. स्वतः ब्रह्मरूप झाल्यानें त्रिभुवन ब्रह्मरूप दिसून, शत्रु मित्र थोर लहान एक ब्रह्म दिसतात.

हे अनंता! हृदयग्रंथी सोडल्यानें संशयनिवृत्ति होऊन भक्तियोगानें ब्रह्मप्राप्ती होते. अनंत ऋषि ह्मणाला—भूपती हो! असें तो यती बोलून पुनः मला ह्मणाला—माझें पूर्व चरित्र ऐक. मी प्रपंच दुःखानें पीडित होऊन विचार केला कीं, तपसामर्थ्यानें शारंगधरास तोषवून कैवल्यपदास पावेन.

असा निश्चय करून वनांत जाऊन बहुत काळपर्यंत तपाचरण केलें; तरी इंद्रियदमन न होतां, मन स्वाधीन राहिना आणि पूर्णब्रह्मयाचें ध्यान करित असतां मन चोहोंकडे धांव घेई. घडोघडीं भार्या, पुत्र, धन, गृह, बंधु, आप्त, सोयरे, मित्र इत्यादिकांची निरंतर आठवण होई. नाना विषयीं वासना बसून मनास अनेक यातना होत. त्यामुळें सुख वाटत नसे.

असे बरेच दिवस लोटल्यावर निश्चय केला कीं, मनोव्यग्रतेस इंद्रियें कारण आहेत, तरी आधीं नानाउपायांनीं इंद्रियांचें दमन करावें ह्मणजे मन स्वाधीन होईल. मग मी नाना उपायांनीं इंद्रियघातास प्रवृत्त होतांच, दिशा, वायु, अर्क, वरुण, अश्विनीकुमार, हुताशन, इंद्र, उपेंद्र, मित्र व दहावा ब्रह्मा असे इंद्रियांचे ईश्वर मजपुढें नर शरीरानें प्रत्यक्ष उभे राहून मला सुंदर वाणीनें ह्मणाले—"हे ब्राह्मणश्रेष्ठा समर्था ! आम्हीं सर्व इंद्रियांच्या देवता तुझ्या शरीरांत सर्वकाळ राहूं; तरी आमच्या घातास प्रवर्तणें हें तुला योग्य नाहीं. अशानें तुझें कल्याण होणार नाहीं. तूं आमचें छेदन अथवा भेदन करशील तर तुला तात्काळ मरण प्राप्त होईल. अरे, तूं मनांत विचार करून पहा कीं, बहिरे, आंधळे इत्यादि विकलेंद्रिय प्राणी निरंतर वनांत राहतात, त्यांचेंही नाना विषयांचे ठायीं मन व्यग्र होतें. इंद्रिय घातानें मनास कांहीं स्वस्थपणा मि-

ळत नाहीं. जीव हा गृहस्थ असून त्याचें घर शरीर, बुद्धि स्त्री व इंद्रियें देवता त्याच्या दासी आहेंत. जीव हा कर्माधीन असून त्याच्या दासी आहेंत. जीव हा कर्माधीन असून त्याच्या बंधन मुक्तीस मन कारण आहे. जीव ईश मायेनें लुब्ध होऊन जन्म मरण पावतो. मनाचा निग्रह केल्यानें सर्व इंद्रियें बद्धता पावतात, त्यामुळें जीवाची कर्माधीनता सुटून मुक्तता प्राप्त होते. जिवाच्या मुक्ततेस आदिकारण मनोनिग्रह जाणावा. व मनोनिग्रहास आदिकारण हरिभक्ति जाणावी. यास्तव सर्व कर्मांस जाळणारी हरिभक्ति त्वरित करावी. हरिभक्तीच्या योगानें जीवकोशाचा नाश होऊन अंतीं निर्वाणपद मिळतें.

असा इंद्रियदेवतांनीं मला उपदेश केला तोच तुला अनंतमुने कथन केला. तरी आतां तूं ईश्वरभक्तीस तत्पर हो आणि जगदात्मा कल्केश्वर त्याचें दर्शन घे. त्याच्या दर्शनानें सर्व मायाभ्रमण तुटून जाईल. तूं जें कांहीं पाहिलेंस तें मायीक जाणावें. अशा प्रकारचा मला परमहंसानें बोध करितांच मी विष्णुभक्ति करावयास सिद्ध झालों. आणि भक्तिभावानें केशवाची पूजा करून कल्केश्वराच्या दर्शनास येथें आलों. धर्मरक्षणासाठीं हा जगजेठी अवतरला आहे; ह्मणूनच मी आपल्या दृष्टीनें याचें रूप पाहिलें. त्यामुळें त्रिभुवनांत धन्य झालों.

नंतर अनंतमुनी राजांस ह्मणाला—अनंतकोटी ब्रह्मांडाचा मेळ हाच ईश्वरीमायेचा मिथ्या खेळ असून, ब्रह्म केवळ सत्य आहे. सर्वांभूतीं एक नारायण असून प्रपंच मिथ्या आहे. व मायाभ्रमानें जिवास मीतूंपणा लटका लागला आहे. असें सांगून अनंतमुनी कल्कीपदांस वंदून तत्काळ अदृश्य होऊन मोक्षसदनीं गेला, आणि अनंताच्या बोधानें राजे शुद्धमति होऊन कल्की व पद्मा यांची पूजा व स्तवन करून आपआपल्या देशीं जाऊन, अनंत ऋषीनें सांगितलेल्या व्रताप्रमाणें आचरण करून तेही अंतीं कैवल्यपदास जाते झाले. या अनंतमुनीच्या आख्यानाचें जे भक्तिभावानें श्रवण पठन करतील त्यांचे मायाबंध तुटून ते मुक्त होतील. यास्तव श्रोते जनहो! मन शुद्ध करून हें आख्यान श्रवण करा, अशी प्रार्थना आहे.

---

### अध्याय १३ वा.

## कल्कीचें पद्मेसह शंभलग्रामीं जाणें व कीकट देशीं गमन.

सूतऋषि शौनकादिकांस सांगतात—ऋषीहो! सर्व राजे आपल्या देशीं गेल्यावर, कल्कीनारायणानें विचार केला कीं, आतां शंभल ग्रामास गमन करावें. तो त्याचा मनोगत

जाणून, इंद्रानें ब्रह्मदेवास बोलावून सांगितलें कीं, " रे विश्वकर्म्या कुशला! कल्की शंभल ग्रामांत जात आहे तरी तूं पुढें जाऊन, आपल्या अद्भुत शिल्पचातुर्य कुशलतेनें तें नगर सुशोभित कर. त्यांत अनेक तऱ्हेचीं प्रासाद स्थळें, महाल, मंदिरें, बगीचे इत्यादि सुवर्ण रौप्यादिकांनीं व हिरे, स्फटिक वैदुर्य रत्नांनीं सुंदर दिसतील अशीं निर्माण कर. तीं पाहून कल्केश्वराचें अंतःकरण संतुष्ट होईल."

अशी इंद्राची आज्ञा होतांच, ब्रह्मदेवानें शंभल ग्रामांत जाऊन, कल्कीच्या प्रीतिस्तव अनेक तऱ्हेचीं सुंदर मंदिरें, बाग बगीचे, सरोवरें, विहिरी निर्माण करून त्या नगरीस अनुपम शोभा आणिली. तिच्यावरून रावणाची लंका, द्वारका यांचीसुद्धां कुरवंडी करून टाकावी. अशा रीतीचें शंभलनगर इंद्राच्या आज्ञेनें ब्रह्मदेवानें निर्माण केलें.

इकडे कल्कीनारायण सासुसासऱ्यास ह्मणाला—आतां मला पद्मेसह स्वदेशीं जाण्याची आज्ञा द्यावी. तुह्मीं मनांत चिंता करूं नका., अशी त्याची वाणी ऐकून कौमुदीराणी व बृहद्रथ आतां जांवई कन्येचा वियोग होईल ह्मणून दुःखित झालीं. मग राजानें जांवयास दहा हजार मत्त हत्ती, एक लक्ष घोडे, दोन हजार रथ, दोनशें दासी, पायदळ सैन्य व वस्त्रें भूषणें रत्नें अर्पण केलीं. तेव्हां कल्की सासुसासऱ्याचे

६२४ क्र७॥
६।७२।५८

चरण वंदन करून स्वदेशास येण्यास निघाला. बृहद्रथ राजा व कौमुदीराणी पोंचवित निघालीं. तीं सर्व कारुमती नगरी सोडून समुद्रतिरीं येतांच, कल्केश्वरानें सर्व सैन्य थांबवून, सासुसासऱ्यास नगरास जाण्यास सांगून ह्मटलें-आतां आमच्याविषयीं कांहीं चिंता न करितां सद्धर्मानें वागा.

असें वचन ऐकून राजाराणी स्फुंदस्फुंदून रडूं लागलीं. मग बृहद्रथ राजा कल्कीस आलिंगन देऊन, पद्मेस मांडीवर घेऊन, मुख कुरवाळून ह्मणाला-पद्मे कुमारिके! आजपर्यंत मंदिरांत राहून मला सुख दिलेंस. आज वियोग सहन करवत नाहीं. ज्याच्या नामस्मरणानें दुरितांचा नाश होतो असा ब्रह्मदेवाचा पिता विष्णु तोच माझा जांवई झाला. तूं गौरिपती पुजलास ह्मणून हा लक्ष्मीपती तुला पती मिळाला. तरी आतां आनंदानें सुख भोग. पण आम्हांस विसरूं नको. असें राजा बोलून तिच्या अंगावरून हात फिरवून, सद्गदीत होत्साता अश्रु ढाळूं लागला.

नंतर माता कौमुदी पद्मेस अंकावर घेऊन गहिंवरून ह्मणाली-माझे कन्यके! आजपर्यंत मंदिरांत तुझ्या संगतीनें सुखानें काळ लोटला. आतां पुढें काय करूं? बाळे! तूं भाग्यवती ह्मणून तुला हा पती मिळाला, पण तुझा वियोग मला सहन होत नाहीं. आतां गुणनिधाने बाळे! मी सांगतें

तें लक्षांत ठेव. पतीची आज्ञा प्रमाण मानून, चित्त पतिचरणीं ठेव. पतीला जें प्रिय असेल त्याचेंच आचरण कर. सासु-सासऱ्याची सेवा करून, दीर, जावा, नणंदा यांसी प्रीति ठेव. सेवक जनांवर दया, व अतिथीस अन्न देऊन तृप्त कर. असें वर्तन ठेवशील तर त्रैलोक्यांत तुझी कीर्ति होईल, आणि तुझ्या योगानें आह्मांस मोक्षपुरीचा लाभ होईल. ज्यांची संतति सद्धर्मी असते त्यांस वैकुंठांत वस्ती मिळते, व जे अधर्मकर्मी रत होतात ते नरकांत जातात. तरी वारंवार हेंच सांगणें कीं, सद्धर्मानें आपली वागणूक ठेव. त्रैलोक्यपती कल्की तुला भ्रतार मिळाला आहे ह्मणून तुला अपार सुख होईल. मग कौमुदीनें मुलीच्या मुखावरून हात फिरवून चुंबन घेतलें. त्यावेळीं तिच्या वृत्ति विरून ती खांबासारखी तटस्थ झाली. बृहद्रथ राजाही शोकांत पडला.

मग पद्मेनें मातापितरांचे चरण वंदून म्हटलें—बाबा, आई! मी दूर जातें म्हणून तुह्मीं चिंतातुर न होतां निरंतर सुखानें राहा. मी तुमच्या आज्ञेप्रमाणें पतिव्रता धर्मानें वागून तुमचा उद्धार करीन. आई! आतां मी पतिबरोबर जातें, मला तुह्मीं विसरूं नका, माझें चित्त तुमच्या पायीं सदोदित राहील, व तुमच्या आशीरवादानें मी अपार सुख पावेन. असें बोलून पद्मेनें आईच्या गळ्यास मिठी मारिली, त्या

वेळीं पद्मा, कौमुदी व राजा स्फुंदस्फुंदून रडूं लागलीं. तोंच तेथें उपाध्याय येऊन राजास ह्मणाला—या मांगलीक गमनाचे वेळीं तुमचें हें रुदन कल्याणदायक होणार नाहीं. तरी वधुवरांस आशिरवाद देऊन, त्यांचें कल्याण चिंतून आपल्या सदनास जावें.

असें उपाध्याय बोलतांच कल्कीनें सासुसासऱ्याच्या चरणांवर मस्तक ठेविलें आणि पद्मेस जवळ घेऊन, सासुसासऱ्यास नाना वस्त्र अलंकार अर्पून पूजन करून ह्मटलें—अहो मामा मामी ! आतां आम्हीं जंबुद्वीपांत शंभलग्रामीं गमन करतों, तुह्मीं आपल्या घरीं जावें. आमच्याविषयीं कांहीं चिंता करूं नका. अशीं कल्कीचीं वचनें श्रवण करून राजा व राणी वियोग सहन करून निमूटपणें स्वनगरीस आलीं.

इकडे कल्कीनें सर्वसैन्यासह समुद्रापलिकडे जावें असें मनांत आणून, समुद्रांत बुडी मारिली व बाहेर आला तोंच समुद्राचें पाणी शिळेसारखें झालें. असें पाहून कल्कीनें त्या स्तंभित उदकावरून, सैन्य पलिकडे जंबुद्वीपीं नेलें.

मग कल्की कीरास ह्मणाला—सखया ! आतां शंभल ग्रामास जावयास त्वरा कर. मी संतुष्ट होण्याकरितां इंद्रानें आपल्या अमरपुरीसारखी आमची नगरी विश्वकर्म्याकडून सुंदर बनविली आहे. मला सिंहलद्वीपास येऊन बरेच दिवस

वेळीं पद्मा, कौमुदी व राजा स्फुंदस्फुंदून रडूं लागलीं. तोंच तेथें उपाध्याय येऊन राजास ह्मणाला—या मांगलीक गमनाचे वेळीं तुमचें हें रुदन कल्याणदायक होणार नाहीं. तरी वधुवरांस आशिरवाद देऊन, त्यांचें कल्याण चिंतून आपल्या सदनास जावें.

असें उपाध्याय बोलतांच कल्कीनें सासुसासऱ्याच्या चरणांवर मस्तक ठेविलें आणि पद्मेस जवळ घेऊन, सासुसासऱ्यास नाना वस्त्र अलंकार अर्पून पूजन करून ह्मटलें—अहो मामा मामी ! आतां आम्हीं जंबुद्वीपांत शंभलग्रामीं गमन करतों, तुह्मीं आपल्या घरीं जावें. आमच्याविषयीं कांहीं चिंता करूं नका. अशीं कल्कीचीं वचनें श्रवण करून राजा व राणी वियोग सहन करून निमूटपणें स्वनगरीस आलीं.

इकडे कल्कीनें सर्वसैन्यासह समुद्रापलिकडे जावें असें मनांत आणून, समुद्रांत बुडी मारिली व बाहेर आला तोंच समुद्राचें पाणी शिळेसारखें झालें. असें पाहून कल्कीनें त्या स्तंभित उदकावरून, सैन्य पलिकडे जंबुद्वीपीं नेलें.

मग कल्की कीरास ह्मणाला—सखया ! आतां शंभल ग्रामास जावयास त्वरा कर. मी संतुष्ट होण्याकरितां इंद्रानें आपल्या अमरपुरीसारखी आमची नगरी विश्वकर्म्याकडून सुंदर बनविली आहे. मला सिंहलद्वीपास येऊन बरेच दिवस

झाले ह्मणून मातापितरांस काळजी लागली असेल. तरी तूं आकाशपंथें पुढें जाऊन, पद्मेच्या लग्नादिकाचा वृत्तांत सांगून, मी सैन्यासह येत आहें असें जाऊन सांग. इतक्यांत मी मागून येतों.

असें कल्कीचें वचन ऐकतांच, शुक चरण नमून आकाश पंथानें उड्डाण करून, दोन घटका न लागतां शंभल गांवा जवळ आला. तेव्हां तें सात योजनें ( अठावीस कोस ) विस्तीर्ण नगर, सूर्य तेजासारखें लखलखित, सुंदर मंदिरांनीं सुशोभित असें पाहून आनंदित होऊन, आंत शिरला. नंतर तो पोपट ठिकठिकाणचीं आरामस्थलें, रम्य मंदिरें, देवालयें पाहात पाहात नगराच्या मध्यभागीं जें विष्णुयशाचें मंदीर होतें त्यांत प्रवेश करून विष्णुयशास भेटून चरण वंदून मधुर वाणीनें म्हणाला-हे विप्रवर्या ! तुझा सुत कल्कीनामक भगवंत यानें सिंहलद्वीपांत जाऊन, बृहद्रथ नांवाच्या राजाची पद्मा कन्या वरिली. तिनें शिवास प्रसन्न करतांच, वर दिला कीं, "श्री भगवान तुझा पति होईल. त्याच्या वांचून जे नर तुला वरण्यास आतुर होतील ते स्त्रीरूप पावतील." हें वर्तमान बृहद्रथास श्रुत होतांच, त्यानें सिंहलद्वीपाच्या राजांस आणून स्वयंवर मांडिला. तेव्हां पद्मा मंडपांत माळ घेऊन फिरूं लागली; तिच्या लावण्यास राजे मोहित झाले. तोंच

ते स्त्रीरूप पावले. असें हें शंकराच्या वरानें झालें. हें वर्तमान तुझ्या पुत्रास कळतांच, सिंहलद्वीपीं जाऊन पद्मेचें पाणिग्रहण केलें, आणि भूपांचा स्त्रीरूपापासून उद्धार करून, तेथें कांहीं दिवस राहून, इकडे येण्यास निघाला. तेव्हां बृहद्रथानें तुझ्या पुत्रास वस्त्रालंकार, रत्नराशी, हत्ती, रथ, घोडे, दासदासी देऊन बोळवण केली. मग स्वसामर्थ्यानें समुद्राचें पाणी शिळेसारखें स्तंभित करून त्यावरून सैन्यासह ऐलतिरीं आला आहे. तो आतांच स्त्रीसह गृहास येईल. तरी तुम्हीं वरातीची तयारी करा.

असें पोपटाचें वचन ऐकून, विष्णुयश आनंदित होऊन, नगरवासियांस आमंत्रण देता झाला, व शंभल गांवाचा जो विशाखयूप राजा त्यास सर्व वृत्त कथन केलें. तें ऐकतांच राजानें सर्व नगर शृंगारून सुशोभित केलें. जागोजागीं गुढ्या तोरणें उभारिलीं, वारांगनांचीं नृत्यें गायनें चालू करून, मंगलवाद्यें लाविलीं. नंतर दंवडी पिटविली कीं, "सर्व जनांनीं उत्सव करून, कल्कीस आणण्याकरितां चतुरंग सैन्य सिद्ध करावें." अशी आज्ञा होतांच सर्वांनीं आनंदोत्सव केला.

मग तो राजा शंभलेश्वर अनेक सैन्य, विप्र, मित्र, बंधु आप्त प्रजा यांसह चतुरंग सैन्यानिशीं नगारे नौबती वगैरे

वाद्यें वाजवीत नगराबाहेर कल्कीस सामोरा आला. तों कल्की पद्मेसह घोड्यावर बसून नगरांत शिरला. त्यास विशाखयूपादि शंभल ग्रामवासी आनंदानें भेटले. नंतर सर्वांस नगरांत जाण्याची आज्ञा केली. वधुवरें घोड्यावर बसलीं व सर्व सैन्य आणि विशाखयूपादि पुढें चालले. मग उत्तम मुहूर्तावर नगरप्रवेश केला. त्यावेळीं मंगलवाद्यांचा गजर चालू होऊन वारांगना नृत्य गायन करूं लागल्या, वधुवरांचें कौतुक पाहण्याकरितां नगरवासियांच्या दाटीनें मंडपघसणी झाली. कित्येक नरनारी माड्या, गोपुरें यांवर चढून पुष्पवर्षाव करून जयजयकार करूं लागल्या. पौरबाळी नानावस्त्रालंकारांनीं नटून वधुवरांस आरती ओंवाळित होत्या.

अशा प्रकारच्या उत्सवांत वधुवरें महाद्वारांत येतांच, त्यांच्या मुखावरून मीठ मोहऱ्या व मुदी उतरल्या. त्यावेळीं उंच मोलाचे वस्त्रालंकार स्त्रियांस अर्पण केले. मग गृहप्रवेश करून वधुवरें भाणवशास बसवून लक्ष्मीपूजन करविलें. नंतर कल्कीनें पद्मेसहित मातापित्याचे चरण वंदन केल्यावर, सुमती सासूनें सुनेच्या ओंठाला परमामृताची वाटी लाविली. तेव्हां पद्मा ह्मणाली—मी परमामृतानें तृप्त होऊन कल्कीसुखानें निवून तुमच्या सेवेस प्राप्त झालें. मग सुमती सासु सुनेचा हात धरून ह्मणाली—पद्मे ! आतां देणें घेणें सर्व

कर्त्तव्यता तुझ्या माथीं आली आहे. अशा प्रकारें सोहळा झाल्यावर पद्मेसह कल्की शंभल ग्रामांत सुखानें नांदूं लागला.

पुढें कल्कीचा वडील बंधु कवी नांवाचा त्याला कामकला नामक कांतेपासून बृहत्कीर्ती व बृहद्बाहू नांवाचे दोन पुत्र झाले. तसेंच धाकटा भाऊ प्राज्ञ याला सन्नती नांवाच्या स्त्रीपासून यज्ञ व विज्ञ असे दोन जितेंद्रिय पुत्र झाले, आणि तिसरा बंधु सुमंत्रक त्याची स्त्री मालिनी तिला शासन व वेगवंत असे दोन मुलगे झाले, व कल्कीला पद्मेच्या पोटीं जय विजय असे दोन पुत्र महा पराक्रमी झाले. असे चार बंधूंचे आठ पुत्रांस अष्टप्रधान नेमून प्रजेचें पालन करीत सुख भोगित होते.

एके दिवशीं विष्णुयशाच्या मनांत अश्वमेध करावा अशी कल्पना उद्भवली, ती कल्केश्वरानें जाणून, बापास ह्मणाला— अश्वमेध करावा अशी जर इच्छा असेल तर आज्ञा करावी. मी लोकपालांस व राजांस जिंकून अपार द्रव्य आणितों, त्या द्रव्यानें अश्वमेध करावा. असें सांगून कल्की बापाचे चरण वंदून दिग्विजयाकरितां निघून, अष्टप्रधानांसह व सर्व सैन्यासह कीकटपत्तनास आला. त्या अमंगल कीकट नगरांत म्लेंच्छ बौद्धांचीं घरें विपुल असून, वेद धर्माबाहेर वर्तन करणारे, पाखंडमती, पितृदेवार्चनाचा त्याग करणारे,

स्त्रिया, कन्या, धन ,पुत्र आपलें किंवा परक्याचें हें न जाणणारे असे पापीजन भरलेले होते. तेथें कल्कीनारायण जातांच बौद्धांनीं आपल्या राजास कळविलें कीं—'हे बुद्धेश्वरा ! कल्की ब्राह्मण असंख्य चतुरंग सैन्यासह तुला जिंकण्याकरितां नगराबाहेर आला आहे.

असें बौद्धेश्वर ऐकतांच, क्रोधानें दोन अक्षौहिणी सैन्यासह नगराबाहेर पडला. त्याला कल्केश्वर सामोरा आला. त्यांची युद्धकथा पुढें वर्णन केली आहे.

---

अध्याय १४ वा.

## कल्की व जीन राजाचें युद्ध व शुद्धोदनाचा पराजय.

जो अखिल दोषनाशक सर्वांस जिंकणारा कल्कीनारायण तो बौद्ध व जैन यांच्या पाखंडी सैन्याबरोबर निकरानें लढत बाणापाठीं बाण व शस्त्रास्त्रें सोडूं लागला. त्यांच्यायोगें शत्रु सैन्याच्या अंगांतून रक्तपाझर सुटून, त्यांचीं अंगें फुललेल्या पळसाच्या फुलासारखीं रक्तबंबाळ दिसूं लागलीं. त्यामुळें ते वीर जर्जर होत्साते प्राणरक्षणार्थ पळत सुटले.

असें कल्कीनें पाहून त्यांस ह्मटलें—बौद्धयजनहो ! तुह्मीं प्रबळ असून, रण टाकून पळून कां जातां ? शत्रूस पाठ

देऊन रणांतून पळून जाणें हें वीरास निंद्य होय. अशानें तुमची अपकीर्ति होईल. रणांत युद्ध करून, शत्रूस यमपुरीस पाठवावें. असें असून, आपला धर्म सोडून कसे पळतां? तरी पुरुषत्व असल्यास, धैर्य धरून मागें फिरा व आपल्या शत्रूंचा संहार करा.

असें कलंकीचें वचन ऐकून, जीनराजा कोपायमान होऊन अपार सैन्यासह बैलावर बसून, हातांत ढाल तरवार घेऊन, कल्कीच्या सैन्यांत शिरून, त्याचें चतुरंग सैन्य मारित कल्कीबरोबर तुंबळ युद्ध करूं लागला व गदा पद्म खड्ग तोमर इत्यादि शस्त्रें सोडूं लागला. परंतु कलंकीबलापुढें त्याचें कांहीं चालेना. इतक्यांत जिनानें शूल टाकून कल्कीचा घोडा धरणीवर पाडला, व लगेच तीक्ष्ण बाण काढून कल्कीवर सोडला. तो बाण हृदयांत भेदून कल्की धरणीवर पडला.

असें पाहतांच जीनाधिपती धांवत येऊन, कल्कीची मूर्ती पळवून न्यावी ह्मणून उचलूं लागला, पण त्याची खटपट सर्व व्यर्थ गेली. तेव्हां जीन कोपायमान होऊन त्यानें कल्कीच्या अंगांतील चिलखत छेदून टाकिलें, आणि हातांतील खड्ग घेण्यास सिद्ध झाला. तोंच विशाखयूप राजानें मोठ्या आवेशानें जीन राजास गदाप्रहारानें ताडण करून,

कल्कीस आपल्या रथावर घेतलें. त्याबरोबर कल्की सावध होऊन उठला.

येथें श्रोतेजन संशय घेतील कीं, जो उत्पत्ति, स्थिति, लय कर्ता कल्कीनारायण त्याला मूर्च्छा मोह मरण कोठून असेल? तरी याचें उत्तर असें कीं, रमाकांत दुष्ट जनांच्या संहारास्तव नरदेही झाला ह्मणून मानवासारखा जगांत वागत आहे. असो.

नंतर कल्की विशाखयूप राजाच्या रथावरून आवेशानें उडी टाकून, जसा गरुड सर्पावर, किंवा सिंह हत्तीवर धांवत येतो तसा जीनावर धांवत आला. तोंच कल्कीचा वारू शूलव्यथा सहन करून क्रोधानें शत्रुसैन्यांत प्रवेशून त्यानें पुच्छघातानें व लत्ताप्रहारानें हजारों वीरांस गति दिली, व कित्येकांस श्वासानें द्वीपांतरीं उडवून दिलें. त्यांत हजार हत्ती व घोडे प्राणास मुकवून रथांचा लाथांनीं चुराडा केला. अशा प्रकारें त्या वारूनें शत्रुसैन्याचा महाप्रलय केला. इतक्यांत कल्कीच्या दुसऱ्या सैनिकांनीं जीन सैन्यास जर्जर केलें. गार्ग्य नांवाच्या वीरानें जीनाचे सहस्रावधि वीर रणांत पाडिले, आणि विशाल नामक वीरानें पन्नास हजार रथ, हत्ती, घोडे व पायदळ सैन्य असंख्यात मारिलें. कल्कीच्या कवि, प्राज्ञ व सुमंत्रक बंधूंनीं आपापल्या पुत्रांस बरोबर घेऊन शत्रूचें कंदन आरंभिलें. त्यांत कवीनें वीस लक्ष, प्राज्ञानें

दहा लक्ष व सुमंत्रकानें पांच लक्ष सैन्य यमसदनीं पाठविलें.

नंतर कल्की हास्य करून, जीन राजास ह्मणाला-हे दुष्ट बुद्धे जिनाधिपते! तुह्मीं सर्व शुभाशुभ फलदातें दैव असें बोलतां, तेंच शुभाशुभ फल देणारें प्रत्यक्ष दैव मी तुझ्यापुढें युद्धार्थ सिद्ध झालों आहें. तरी आतां प्रत्यक्ष दैवापुढून पळून जाऊन चावट गोष्टी करूं नको. माझ्या बाणांनीं जोंपर्यंत मृत्युसदनीं गेला नाहींस तोंपर्यंत आपल्या स्त्रियांचीं मुखें पाहून ये. माझ्या धनुष्यापासून सूक्ष्म बाण सुटल्यावर, जर स्वस्त्रीचें मुख पाहून क्षणांत येतों असें ह्मणशील तर मुळींच अवकाश मिळणार नाहीं.

अशी कल्कीची वाणी श्रवण करून, जीन हांसून ह्मणाला-अरे कल्की ब्राह्मणा! तुझ्या शास्त्रांत दैव अदृश्य व आमच्या शास्त्रांत प्रत्यक्ष असें बोलतात. आतां तूं दैवरूपी असून आह्मांस जर मारशील, तर दैवापुढें आमचें सामर्थ्य क्षीण होईल. बरें असो. पण आतां युद्धास सिद्ध हो. असें बोलून बौद्धानें कल्कीवर अपार तीक्ष्ण बाण सोडिले. ते कल्की-नारायणानें एका बाणानें तोडून टाकिले. तसेंच कल्कीनें जीनाचे शरजाळही भंगून टाकिलें. असें पाहतांच बौद्ध क्रोधाविष्ट होऊन, त्यानें वायव्य ब्राह्म पार्जन्य पार्वताग्नेय आणि वारुण अस्त्रें अभिमंत्रून कल्कीवर सोडिलीं, त्यांस कल्कीचें

दर्शन होतांच तीं नाश पावलीं. मग कल्कीनें आपल्या घोड्यावरून जीनाच्या वृषभावर उडी टाकून, त्याचे केश धरिले. त्याबरोबर जसे पर्वताचे कडे कोसळून पडावे तसे ते दोघे खालीं पडले. तोंच जीनानें कल्कीचे केश धरून परस्परांचें मल्लयुद्ध जुंपलें. ते एकमेकांस मुष्टीप्रहार व मस्तकाच्या थडका रेड्यासारख्या देऊं लागले. त्यावेळीं ब्रह्मांड थरथर कांपूं लागलें व दिग्गज बधीर झाले.

अशा प्रकारें कल्की व जीन हे एकमेकांस मल्लयुद्धाचें कौशल्य दाखवित असतां, शेवटीं कल्कीनें पेंच मारून, जीनाचे दोन्ही हात एका हातांत धरून दुसऱ्या हातानें केंस धरून पाठीवर ओढून, लाथेनें अस्थींचा चुराडा करून कमर मोडून जमिनीवर पाडलें, त्याबरोबर मुखांतून भडभडां रक्त ओकून तो बुद्ध गतप्राण झाला. असें पाहतांच जीन वीरांस अपार शोक झाला, व कल्कीच्या सैन्यांत आनंद मावेनासा झाला.

इतक्यांत जीन राजाचा सख्खा बंधु शुद्धोदन नांवाचा क्रोधानें लाल होऊन, गदा घेऊन कल्कीवर धांवला. त्यास पाहतांच कल्कीचा कविनामक बंधु अपार शर सोडून, शुद्धोदनास जर्जर करून, त्याला शरपंजरांत कोंडिलें, व हर्षित होऊन सिंहासारखी गर्जना केली. तेव्हां शुध्दोदन गदा घेऊन चालत आहे, असें कल्कीचा बंधु धर्म यानें पाहातांच रथाव-

रून उडी टाकून, महागदा घेऊन युध्दास प्रवर्तला. त्या दो-घांचें अति तुंबळ गदायुध्द चालून त्यांच्या शरिराचे सांधे ढिले झाले. तरी ते परस्पर मागें न सरतां एकमेकांवर गदाप्रहार करित होते. तोंच कवीनें आरोळी देऊन, शुध्दोदनाची गदा भूमीवर पाडून, आपल्या गदेचा त्याच्या छातीवर प्रहार केला, त्याबरोबर शुध्दोदन मूर्च्छा येऊन खालीं पडला, आणि लगेच सावध होऊन, कवीच्या मस्तकावर गदाप्रहार करता झाला. त्याच्यायोगें त्याचीं सर्व इंद्रियें विव्हल झालीं. तरी तो भूमीवर न पडतां खांबासारखा स्थीर राहिला.

असें शुद्धोदनानें पाहून विचार केला कीं, याला इतक्या वेगानें ताडन केलें तरी तो खालीं पडला नाहीं. यांच्या चतुरंग सैन्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं, तरी आतां सत्वर जाऊन, मायादेवीस घेऊन यावें. मग तिच्या साह्यानें कल्कीसैन्याचा संहार करावा. असें मनांत आणून शुद्धोदन रण सोडून स्वनगरांत आला.

---

## अध्याय १५ वा.

# कल्कीसैन्यावर मायेचें आच्छादन व शुद्धोदनाचें पलायन.

सूतमुनी शौनकादिकांस सांगतात–मग शुद्धोदन माये-

पाशीं जाऊन, साष्टांग नमन करून म्हणाला--माये ! त्वां युद्धास चलावें. असें सांगून एक कोटी म्लेंच्छ व शंभर लक्ष जीन युद्धास सिद्ध केले, ज्या मायेच्या दृष्टीसमोर देव गंधर्व असुर नर निर्बळ होऊन बाहुल्याप्रमाणें रणांत पडतात, तिला अग्रभागीं करून, शुद्धोदन पुन्हां म्लेंच्छ जीनांच्या सैन्यासह मायेच्या आश्रयानें धैर्य धरून रणांत आला. तेव्हां कल्कीच्या सैन्यानें जीनाची सेना दुरून पाहिली, तिच्या अग्रभागीं एक स्त्री सिंहध्वज युक्त रथांत बसली असून, तिच्या भोंवतीं असंख्य कावळे, भालु यांचा समुदाय होता. जी सर्व शस्त्रास्त्रांची जननी, नाना रूपें धारण करणारी, त्रिभुवन भुलविणारी, अपार बलाची अशी ती भयंकर स्त्री कल्कीसैन्यानें पाहतांच, त्यांस भय उत्पन्न होऊन सर्व वीरांचीं शस्त्रें खालीं गळून, ते मूर्छित झाले. त्यांत कल्कीनारायण मात्र सावध होता.

आपल्या सैन्याची अशी स्थिति पाहतांच, कल्कीनें विचार केला कीं, जी आपली प्रत्यक्ष जाया (स्त्री) त्रिगुणात्मिका आदिमाया, तिनें जिनांस मिळून माझ्या सैन्यास मोहांत पाडिलें. असें मनांत आणून कल्की तिच्यासमोर उभा राहून एकाग्र दृष्टी करून पाहूं लागला. तेव्हां तीही कल्कीकडे पाहात, हा कल्क्यावतारी आपलाच पति रणांत उभा आहे असें ओळखून, कल्कीच्या देहांत तेजरूपानें गुप्त झाली.

त्यावेळीं बौद्धजन चोहोंकडे पाहूं लागले. परंतु ती माया देवी त्यांच्या दृष्टीस पडली नाहीं. तेव्हां ते दीन वापडे होऊन जी आपली प्रत्यक्ष माता ती मरण पावली असें जाणून, जसे पुत्रकन्येस रडतात त्याप्रमाणें ते रडूं लागून, माये माये असा आक्रोश करीत मूर्छित पडले. मग पुनः सावध होऊन आश्चर्य करून ह्मणाले-आमच्यावर रागावून माया कोठें गेली ? असा शोक करीत चकित होत्साते तटस्थ झाले.

इकडे कल्कीनारायणानें आपलें सैन्य कृपादृष्टीनें अवलोकन करून उठविलें, आणि हातांत तीक्ष्ण तरवार घेऊन म्लेंच्छ जीनांचा संहार करण्याच्या हेतूनें घोड्यावर बसून, दुसऱ्या हातांत धनुष्य धारण केलें, व चिलखत लेवून, खांद्यावर भाला बांधून शस्त्रास्त्रानिशीं सैन्यासह युद्धास सिद्ध झाला. असें म्लेंच्छ जीन पाहतांच ते त्रास पावले. त्यावेळीं सिद्ध गंधर्व देवमंडळी यांची विमानांतून युद्ध पाहण्याकरितां आकाशांत दाटी झाली.

नंतर कल्केश्वर शत्रुसैन्यांत शिरून म्लेंच्छ बौद्ध वीरांचा संहार करून त्यांस यमसदनीं पाठवूं लागला. त्यावेळीं रणभूमी धडमुंडांनीं रक्तबंबाळ झालेली दिसत होती, इतक्यांत विशाखयूप राजा, कवि, प्राज्ञ, सुमंत्रक, विशाल इत्यादि

कल्कीचे वीर म्लेंच्छ सैन्यावर उठले. त्यांनीं असंख्य वीरास यमसदन दाखविलें. असें पाहतांच शुद्धोदन कोपून हातांत धनुष्यबाण घेऊन, कल्कीच्या सैन्यास ताडण करूं लागला, व त्याचे मुख्य वीर काकरोमा, काकाक्ष,काककृष्णादि कल्की-सैन्यावर धांवले. उभय सैन्यें एकत्र मिळतांच, शस्त्रास्त्रांचा खणखणाट होऊन सृष्टि कंपायमान झाली. त्या युद्धांत किती वीर धरणीवर पडले त्यांची गणती नाहीं. तों कल्कीचे वीर बाण सोडून म्लेच्छांस मारूं लागले, रक्तांच्या नद्या वाहूं लागल्या. अशी कल्की नारायणानें रणधुमाळी करतांच कावळे, गिधाडें, कोल्हीं यांस आनंद झाला. भूतांस फार दिवस यथेच्छ भक्ष्य मिळालें नव्हतें तें कल्कीनें अर्पण केलें.

असा म्लेंच्छजीनांचा घात होतांच, उरलेले वीर धैर्य सोडून पळूं लागले. तों शुद्धोदन स्वसैन्यासह कल्कीसैन्या-बरोबर युद्ध करण्यास सिद्ध झाला. त्यावेळीं उभय सैन्यांतील रथ्यासीं रथी, घोडेस्वाराशीं घोडेस्वार, पायदळाशीं पायदळ भिडून, शस्त्रास्त्रांचा अपार मारा सुरू झाला. अशा प्रकारें सर्व सैन्य कलंकी वीरांनीं मारून यमसदनीं पाठविलें. तेव्हां शुद्धोदन उरलेल्या सैन्यासह प्राणरक्षणास्तव आपल्या नगरांत पळून गेला. तेव्हां सर्व बौद्ध सैन्यानें कपाळास भस्म व भगवीं रक्तवस्त्रें परिधान केलीं होतीं.

## अध्याय १६ वा.

# बौद्धजीन स्त्रियांचें कल्कीस शरण जाणें व उपदेश.

मागील अध्यायांत शुद्धोदन उरलेल्या सैन्यासह आपल्या नगरींत पळून गेला. सूत शौनकादिकांस सांगतात—म्लेंच्छ जीन युद्धांतून पळून आले असें त्यांच्या स्त्रियांनीं पाहून, त्या बलवान् तरुण युवती—पतिव्रता, व्यभिचारिणी, कसबिणी अशा प्रकारच्या कामिनी, आपल्या पतिपुत्रांस कल्कीनें मारिलें ह्मणून तें दुःख सहन न होऊन, पति, पुत्र धनाचा त्याग करून, कल्कीबरोबर युद्ध करावें अशा हेतूनें आवेशानें निघून. कित्येक जणींनीं खड्ग ढाला, धनुष्यबाण, पाशांकुश, गदा, तोमर, मुसळ, पट्टे, फरश, तलवारी, परीघ, मुद्गल, शक्ति इत्यादि अनेक शस्त्रें हातांत धारण केलीं, आणि वृषभ, अश्व, रथ, खर, उंट, हत्ती अशा वाहनांवर बसून, अहंपणा मिरवीत रणांत आल्या. तों तेथें स्वकीय जन कोणी चरणरहित, कोणी दांत विचकलेले, कित्येक आंतडीं लोंबत असलेले, कोणी घायानें जर्जर झालेले, कित्येक रुदन करीत चरफडणारे, कोणी पाणी मागत आहेत असे, कित्येक मस्तकांतून रक्त वाहात असलेले, कोणी मृत्युमुखीं पडलेले, अशा प्रकारची आप्त मंडळी स्त्रियांनीं पाहून त्या आवेशास चढून कल्की सैन्यावर धांवत गेल्या.

त्यावेळीं कल्कीचे वीर म्लेंच्छ जीन स्त्रियांचें सैन्य आपल्यावर आलें असें पाहून, मनांत आश्चर्य मानून, कल्कीजवळ जाऊन सांगूं लागले कीं—हे प्रभो कल्केश्वरा ! म्लेंच्छ बौद्धांच्या स्त्रिया स्वजनांच्या कैवारासाठीं रणांत शस्त्रास्त्रांनिशीं सिद्ध होऊन आल्या आहेत, त्यांच्याबरोबर रणांत कसें झुंजावें ? आजपर्यंत स्त्रिया अबला त्यांच्याबरोबर कोणी समर केलेलें नसतां, आपण झुंजावें तर जग आपली निंदा करील.

असें कल्केश्वर ऐकून सैन्यासह स्त्रियांसमोर झाला. तों त्या व्यूह रचून रणांत उभ्या हात्या,त्यांस कल्की म्हणाला— स्त्रीजनहो ! रणांत वीर पुरुषांनीं स्त्रियांबरोबर लढावें असें कोठें सांगितलें आहे ? स्त्रियांचीं मुखकमळें पाहून नेत्रांस आनंद होतो अशा स्त्रियांवर प्रहार कोण करील ? वीर पुरुष स्त्रियांवर कधींही शस्त्र सोडणार नाहींत. तरी तुम्हीं आपापल्या घरीं सुखानें जा. तुम्हीं मृदु शरिराच्या अबला! तुमच्यावर माझ्या वीरांनीं शस्त्रप्रहार केला तर तुम्हीं यमपुरी पाहावयास जाल ! तुम्हीं प्राणास मुकाल व माझ्या वीरांस स्त्रिहत्येचा दोष लागेल. हें उभय वर्गास अनिष्ट आहे, यास्तव आपल्या घरीं सुखानें जा.

असें कल्कीचें वचन ऐकून स्त्रिया हास्य करून ह्मणाल्या— तूं आमच्या पतींस जिवें मारलेंस त्यामुळें आह्मीं मृतप्राय

झालों,ह्मणून मृत्यूस भीत नाहीं. तरी आतां वटवट न करितां युद्धास सिद्ध हो. तुझ्या भाषणावरून तूं भट ( योद्धा ) नसून केवळ भट्ट ( भिक्षुक ब्राह्मण ) आहेस. म्हणूनच युद्ध-कौशल्यता न दाखवितां वटवट मांडिली आहेस. लाडू, करंज्या, अनारसे, घीवर, वडे, घारगे, मोदक पोळ्या, मांडे, पुऱ्या, मोतीचूर, सांधणें, दहींभात यांवर हात मारणारा भट्ट ( ब्राह्मण ) आहेस. तूं जर भट असशील तर आमच्या समोर रणांगणांत उभा राहशील.

असें त्या स्त्रिया बोलून खड्ग, शक्ति, धनुर्बाण, तोमर, मुसळ, शूल, परीघ, मुद्गल इत्यादि शस्त्रास्त्रें घेऊन कल्कीवर सोडिलीं; पण तीं शस्त्रें हीनबळ होऊन, मूर्तिमंत रूपानें मागें फिरून, स्त्रियांस ह्मणालीं–नारीजनहो ! आह्मांस तुह्मीं कल्कीवर प्रेरिलें परंतु आमची गती त्याच्यापुढें चालत नाहीं. ज्याच्या आश्रयानें आह्मीं दुसऱ्यास मारतों तोच हा कल्की हृषीकेशी प्रत्यक्ष जगदात्मा आहे.त्याच्या आज्ञेनें आह्मीं त्रैलोक्यांत संचार करीत असतों. त्यानेंच आह्माला नानारूपें व अनेक नामें दिलीं त्याचा सर्वांस आधार आहे. ज्याच्या आदिमायेनें उत्पत्ति, स्थिति,प्रलय होतो तोच हा त्रिगुणातीत परमात्मा पद्माकांत आहे. जें जें ह्मणून दिसतें तें सर्व मायिक आहे व जो जगद्व्यापक ईश तोच हा कल्की आहे. ब्रह्मा,

विष्णु रुद्र इंद्रादि देवता कल्कीरूपी आहेत. असा तो कल्की भगवान् सर्वत्र भरून उरला आहे. त्या नारायणास व त्याच्या सेवकांस प्रहार करण्याची आमची योग्यता नाहीं. असें असून आह्मीं जर त्याच्यावर प्रहार केला तर जसा प्रल्हादासाठीं खांबांतून नरहरी प्रगट झाला तसा तो प्रगट होऊन सर्वांचा संहार करील. नृसिंह तोच कल्की त्याचें सामर्थ्य कोणाच्यानेंही वर्णन करवणार नाहीं. यास्तव तुह्मीं त्याला शरण जा ह्मणजे तो तुमचें भवबंधन तोडून मोक्ष-सदनीं नेईल.

अशी शस्त्रांची वाणी श्रवण करून, त्या स्त्रिया स्नेह मोहनरूपी बंधनतूांन मुक्त होऊन, कल्कीस शरण गेल्या. असें पाहतांच कल्कीस संतोष झाला, आणि हास्य करून आत्मनिवेदन कारण, कर्मयोग, आत्मनिष्ठा, भक्तियोग, नैष्कर्मलक्षण, ज्ञानयोग, अभेदाश्रय इत्यादि योगांचा स्त्रियांस उपदेश केला. तो ऐकतांच त्या सर्व कामिनी जितेंद्रिया होऊन, योगीजनांस जें दुर्लभ पद तें अनायासें पावत्या झाल्या. अशा प्रकारें बौद्ध म्लेंच्छांच्या स्त्रियांस कल्केश्वरानें कैवल्यपदाची प्राप्ती करून दिली, आणि भीमसमर करून म्लेंच्छ बौद्धांस मारून कल्की त्यांचीं ज्योतिस्थानें पावता झाला. अंतकाळीं ज्याच्या स्मरणानें भवमोचन होतें त्याच्याच

हस्तानें मरण आल्यास संसारबंधन कोठून राहील? बौद्ध म्लेंच्छ महापापी नास्तिक त्यांचा अंत रमाकांताच्या हस्तानें झाला; ह्मणून त्यांच्या दारुण पापांचा समूळ नाश होऊन त्यांस कैवल्यसदन प्राप्त झालें. या बौद्ध म्लेंच्छ वधाची कथा जे शुद्ध मनानें ऐकतील त्यांचीं शोक, मोह दारिद्र्यादि दारुण दुःखें नाहींशीं होऊन, त्यांचे मनोरथ पूर्ण होतील. व ते नाना भोग भोगून जगांत धन्यता पावतील. आणि त्यांच्या जमन्मरणाची भीति अंतीं निरसून जाईल. असें हें मोक्षदायक आख्यान अन्य कार्यें सोडून एकाग्र मनानें श्रवण करावें.

---

अध्याय १७ वा.

# कल्कीशीं ऋषींचें गाऱ्हाणें व कुथोदरी राक्षसी व तिचा पुत्र विकंज यांचा संहार.

कल्कीनें बौद्ध जीन स्त्रियांस ज्ञानोपदेश करून, अक्षय्य मुक्ति दिल्यावर, म्लेंच्छ जीनांस परिवारासह जिंकून त्यांचें राहिलेलें वित्त, मणि मौक्तिकादि रत्नें घेऊन कीकट देशाहून निघून सर्व सैन्यासह चक्रतीर्थास आला. तेथें स्नानसंध्यादि कर्मँ करित असतां, वालखिल्यादि ऋपिगण वल्कलें

व जटा धारण केलेले भीत भीत येऊन दीनवाणीनें उंच स्वरें हांक मारून ह्मणाले—हे प्रभो खड्गपाणी त्रिभुवनपते कल्केश्वरा ! तूं जगज्जीवन दीननाथ आहेस ह्मणून तुझ्या चरणीं आलों आहों तरी आमचें रक्षण करावें.

अशी ऋषींची वाणी ऐकून, कल्की त्यांस नमून हात जोडून ह्मणाला—समस्त ऋषिजनहो ! तुह्मीं काय हेतु धरून मजजवळ आलां आहां ? तुह्मांस कोणी भिवविलें किंवा तुमचा कोणी अपमान केला ? अथवा तुमच्या ब्रह्मकर्मास व होमकर्मास कोणी विघ्न आणिलें कीं काय ? ज्यानें तुह्मांस त्रास दिला तो जरी इंद्र असला तरी त्यास मी शिक्षा करून तुमचें रक्षण करीन.

असें कल्कीचें गंभीर भाषण ऐकून ऋषि मधुर वाणीनें ह्मणाले—हे भक्तरक्षका पद्मावरा ! तूं सकल ब्रह्मांड व्यापक असून, कर्त्ता अकर्त्ता असा भूत भविष्य वर्तमान जाणणारा आहेस. तुला सर्व कळत असून, आह्मांस प्रश्न करतोस तरी सांगतों श्रवण कर. व या दुःखापासून आमची मुक्तता कर. आह्मांला दुःख देणारी एक निशाचरी ( राक्षसी ) कुंभकर्णाची मुलगी व कालकंजासुराची कांता कुथोदरी नांवाची विक्राळ व भयंकर स्वरूपाची आहे. तिच्या देहाचें वर्णन आमच्यानें करवणार नाहीं. तरी किंचित सांगतों श्रवण कर.

८५४।
६४४

तिनें हिमाचलाची उशी करून, तीवर आपलें मस्तक ठेवून, निषधाचलावर दोन्हीं आपले पाय ठेवून निजली आहे. अशा प्रकारें ती दीर्घशरीरी असून तिचे स्तन विंध्याद्री सह्याद्री-सारखे, व हात वृक्षाच्या खांद्यासारखे पसरले आहेत. पर्व-तासारख्या तिच्या एका स्तनांतील दूध विकंज नांवाचा तिचा मुलगा पीत आहे. अशी ती भयंकर राक्षसी निजली असून, तिच्या श्वास वायूनें आह्मीं विकल होऊन, आका-शांत भ्रमण करीत होतों ते दैवयोगानें आपल्या चरणाजवळ आलों आहों. धर्मरक्षण करणें हा तुझा धर्म आहे. यास्तव पुरुषोत्तमा भक्तकैवारिया ! तिला यमसदनीं पाठवून आमचें रक्षण कर.

अशी त्या ऋषींची वाणी ऐकून, कल्केश्वर ह्मणाला–मुनीजनहो ! तुह्मीं मनांतील भय दूर करून स्वस्थ असा. आतां मी हिमाचलावर जाऊन, राक्षसीचा संहार करून तुमची भीती दूर करितों.

असें बोलून पद्माकांत चतुरंग सैन्यासह हिमाचलावर जा-ण्यास निघाला. त्याच्या मागून वालखिल्यादि ऋषिगण राक्षसीचा नाश होणार ह्मणून संतोष पावून चालूं लागले. तों कलंकी उत्तर दिशेचा मार्ग क्रमित हिमाचलाच्या सन्निध परिवारासह येऊन एक रात्र वस्ती करून, प्रातःकाळीं उठून

हिमाचलावर सैन्यासह निघाला. तों पुढें एक चपल गतीनें गर्जना करीत वाहणारी शुभ्र सरिता दृष्टीस पडली. ती दुधासारखी नदी पाहून कल्कीसैन्य चकित होऊन, पुढें जावयास मार्ग नाहीं असें पाहून उभें राहिलें.

मग तो भगवान् विष्णुयशसुत, त्यास सर्व माहित असून, क्षीर नदीचें उत्पत्तिवृत्त ऋषींस विचारूं लागला. कल्की ह्मणाला-मुनीजनहो ! तुह्मीं सर्व ज्ञानसंपन्न आहां ह्मणून तुह्मांस एक प्रश्न करितों. ही दुधानें भरलेली नदी कोठून आली तें मला सांगावें.

अशी कल्कीची वाणी ऐकून, मुनी ह्मणाले-हे त्रिभुवनपते ! तूं सर्व जाणत असतां आह्मांस विचारतोस हें तुझें सोंग-ढोंग आहे. तरी सांगतों श्रवण कर. कुथोदरी नांवाची जी राक्षसी सांगितली, तिनें हिमाचलावर निद्रा केली आहे. तिचे पर्वतासारखे स्तन दुधानें भरलेले असून, एक स्तन तिचा विकंज नांवाचा पुत्र जेव्हां पिऊं लागतो तेव्हां दुसऱ्या स्तनांतुन पान्हा सुटून त्या दुधाचा जो ओघ वाहूं लागतो तीच ही दुधानें भरलेली नदी होय. ही सात घटकापर्यंत अशीच वाहात असेल. मग एका क्षणांत आटून जाईल.

असें ऋषींचें वचन श्रवण करून, सैनिक विस्मित होऊन परस्परांस ह्मणाले-अहो ! हें काय आश्चर्य ! जिच्या एका स्तनां-

तून इतकें दूध येतें तिच्या देहाचें महत्व व बळ कसें असेल ? आणि एका स्तनांतील दूध पिणारा जो मुलगा त्याचें शरीर कसें असेल ? जो बाल अवस्थेमध्यें दुधाची नदी पिणारा त्यास तारुण्य दशा येतांच तो सर्वांचा अंत करील.

अशा प्रकारें तें सैन्य आश्चर्यांत पडलें. असें पाहून कलंकी आपल्या शस्त्रास्त्रांनिशीं घोड्यावर बसून, आपल्या सैन्य परिवारासह ऋषींनीं दाखविलेल्या मार्गानें हिमाचलावर गेला तों ती राक्षसी आपल्या पुत्रास स्तनपान करवीत होती. तिला पाहतांच कल्कीच्या मनांत आलें कीं, ही केवळ काळाची कांता ब्रह्मांडाचा अंत करण्याकरितां प्रगट झाली आहे. हिच्यासारखी त्रैलोक्यांत दुसरी कोणीच नाहीं. ताटिका, हिडिंबा, शूर्पणखा इत्यादि अनेक राक्षसी झाल्या पण हिची बरोबरी करणारी एकही नाहीं. हिचें काजळाच्या पर्वतासारखें शरीर, श्वास वायूनें वनगजेंद्र भ्रमण करीत आहेत. कर्णविवरांत वनगज केसरी प्रमानें झोंपा घेत आहेत. अशा त्या भयानक राक्षसीस पाहतांच कल्कीच्या सैन्यास भय उत्पन्न झालें. कित्येक वीर थरथर कांपून त्यांच्या हातांतील शस्त्रें खालीं गळून पडलीं. असें पाहून कल्कीनें धीर देऊन ह्मटलें–अहो ! पायदळ सैन्यहो ! तुह्मीं पर्वतावरील किल्ल्यांत जाऊन भोंवता अग्नि प्रदीप्त करून तेथें सुखानें रहा. आणि

हत्ती, घोडे, रथ यांवरून युद्ध करणाऱ्या योद्ध्यांनीं मजबरोबर यावें. मी आतां अल्प क्षणांत त्या राक्षसीचा अंत करतों. असें बोलून सैन्यास पर्वत दुर्गांत घालून, भोंवता अग्नि पेटविला.

मग तो कल्की मुख्य वीरांस बरोबर घेऊन राक्षसीसमोर गेला आणि फरश, शक्ति, शूल, घण, तोमर, मुद्गल, खड्ग बाण इत्यादि शस्त्रांनीं राक्षसीस ताडण करूं लागला.

तेव्हां त्या घोर निशाचरीनें क्रोधाविष्ट होऊन उठून भयंकर आरोळी मारिली, त्या नादानें ब्रह्मांडगोल रसातळास जातो कीं काय ? असें भासूं लागलें. दिग्गजांचे कानटाळे बसून नक्षत्रें भंगून खालीं पडूं लागलीं, शेष मान सरसावूं लागला, त्यावेळीं तो भयानक शब्द ऐकतांच कल्कीचें सैन्य मूर्छित होउन धरणीवर पडलें. मग भयानक राक्षसी सैन्याचें भक्षण करण्याकरितां विक्राळ मुख पसरून पुढें धांवत आली. आणि नाकाच्या श्वासवायूनें गज अश्व रथ आदि सैन्य आकर्षून गिळून टाकलें. जशा मुंग्या मुखवातानें अस्वलीच्या मुखांत शिरतात त्याप्रमाणें राक्षसीच्या उदरांत सैनिकांचा प्रवेश झाला. असें देव गण गंधर्व, किन्नर यांनीं पाहतांच जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. तेव्हां त्रैलोक्यांतील प्राण्यांस आम्हांस राक्षसी भक्षण करील ह्मणून भीति

उत्पन्न होऊन तेही मूर्छित पडले. असा एकच आकांत उड-तांच श्रीमुरारीनें कुथोदरीच्या उदरांत काय केलें तें श्रवणकरावें.

जसें पूर्वी इंद्रानें वृत्रासुराची कुस भेदून आपलें सैन्य बाहेर काढिलें होतें, त्याप्रमाणेंच कल्कीनें बाहेरील आकांत आकांत ऐकून आपलें शिवदत्त खड्ग हातांत घेऊन, त्यानें राक्षसीची कुस भेदून सैन्यांसह बाहेर पडला. रथ हत्ती घोडे योनीद्वारानें बाहेर आले, कित्येक महावीर कर्णांतून नाकांतून बाहेर पडले. अशा प्रकारें कल्की आपल्या सैन्यासह कुस भेदून बाहेर पडतांच ती राक्षसी व्याकूळ होऊन गडबडां लोळूं लागली. तरी तिनें आपल्या तामसी स्वभावानें हात पाय सोडीत कल्की सैन्यास ताडण करूं लागली. तिचे ते प्रहार चुकवून कित्येक वीरांनीं फरश, शक्ति, शूल, घण, तोमर, मुद्गल, खड्ग, बाण इत्यादि शस्त्रांनीं ताडण केलें. कित्येकांनीं केंश धरून मस्तकावर मुद्गल हाणिले, कित्येक कुऱ्हाडी घेऊन हात पाय तोडूं लागले, अशाप्रकारें कल्की वीरांनीं चोहोंकडून शस्त्रें हाणून कुथोदरीचीं सर्व गात्रें शिथिल करून, हाडांचा चुराडा केला. त्यामुळें रक्ताची नदी वाहूं लागली; तरी ती राक्षसी आपला मूळ स्वभाव सोडीना. मग तिनें मेघगर्जनेसारखा भयंकर शब्द करितांच, त्या नादानें आतां कल्पांत होतो कीं काय असें वाटूं लागलें.

त्यावेळीं दिग्गज थरथरां कांपूं लागले, शेष पृथ्वीभार सोडून पळावयास पाहूं लागला.

अशी त्रैलोक्यमंडळांत धुमाकुळ होतांच कल्कीनें कल्पांतकाळच्या विजेसारखा बाण धनुष्यावर योजून, कुथोदरीच्या हृदयावर सोडला, त्याबरोबर ती गतप्राण होऊन पडली. मग तिचा विकंज नांवाचा पुत्र माता मृत झाली असें पाहून धरणीवर अंग टाकून दुःखानें लोळूं लागला.

मग तो कुथोदरीचा पुत्र विकंज पांच वर्षांचा होता तो मातेच्या कैवारास्तव कल्की सैन्यावर आवेशानें आला. त्याचा देह पर्वतासारखा असून, त्यानें हजारों हत्तीच्यां माळा गळ्यांत घातल्या होत्या, सर्प पागोट्यासारखे मस्तकास गुंडाळले होते, कानांतील अलंकार हत्ती घोड्यांचे असून, करांगळींत सिंह देहाच्या मुद्रिका व पायांत खर उंटांचे देहांचे वाळे घातले होते. असा तो विकंज राक्षस कल्कीसैन्यांत शिरतांच, कल्कीनें प्रळयाग्नीसारखें ब्रह्मास्त्र सोडून विकंजाचें शिरकमळ तोडून टाकिलें. अशाप्रकारें मायलेंकरास मृत्यु येतांच त्रैलोक्यास स्वस्थता येऊन देवगणांनीं कल्कीवर पुष्पवर्षाव केला.

नंतर ऋषी जयजयकार करून कल्कीस ह्मणाले—हे सर्वेश्वरा हृषिकेशी ! आतां हरिद्वारास चलावें. असें ऋषींचें

वचन ऐकून, कल्की आनंदित होऊन सर्व सैन्यासह हरिद्वारास आला. ती रात्र त्यानें ऋषींबरोबर गोष्टी सांगण्यांत घालवून, प्रातःकाळीं उठून स्नानसंध्यादि कर्में सारून गंगातटाची शोभा अवलोकन करित फिरत असतां, गंगातीरावरील समस्त मुनी भागीरथीची स्तुति करून कल्केश्वराच्या दर्शनास आले.

---

## अध्याय १८ वा.

## कल्कीस मरुराजानें सांगितलेलें वंशावळीकथन.

गंगातीरावरील ऋषी कल्कीच्या दर्शनास येतांच, नारायणानें त्यांस उत्तमासनें बसावयास देऊन, पूजा केल्यावर हात जोडून म्हटलें—अहो ऋषिजनहो! तुम्हीं तीर्थाटनवासी परोपकारी दिसतां; तुम्हीं आपलें दर्शन दिलेंत तेणेंकरून आम्हीं त्रैलोक्यांत धन्य झालों. असें कल्की बोलतांच वशिष्ठ, भृगु, अत्री, पराशर, नारद, वामदेव, देवल, अश्वत्थामा, दुर्वास, गालव, कृप, अंगिरा, भार्गव, कण्व, वेद आदिकरून तपस्वी कल्कीच्या वचनानें आनंदित होऊन, सूर्यचंद्र कुलोत्पन्न जे मरु, देवापि राजे यांस पुढें करून ह्मणाले—हे पद्माकांता, वैकुंठनाथा, मुकुंदा, तुला आमचा नमस्कार असो.

तूं ब्रह्मांडनायक उत्पत्ति, स्थिति, पालन कर्त्ता असून धर्मरक्षक व भक्तवत्सल आहेस, तरी आह्मांस प्रसन्न हो.

अशी मुनीजनांची वाणी ऐकून कलंकी ह्मणाला–ऋषिजनहो! तुम्हीं माझ्या दर्शनास येथें आलेत तरी तुमच्यापुढें हे दोन महंत तपस्वी कोण आहेत. ते भागीरथीचें स्तवन करून हर्षित झालेले दिसतात. तरी यांचीं नांवें काय? व यांनीं गंगेची स्तुति कशी केली तें मला सांगावें.

असें त्याचें वचन ऐकून सूर्यकुलोत्पन्न मरु राजा हात जोडून ह्मणाला–हे भगवंता! तूं सर्व जाणता असून, आम्हांस विचारतोस तरी माझें वंशवृत्त सांगतों श्रवण कर. सर्वांच्या आदीचा तूं नारायण प्रलयसमुद्रांत असतां, तुझ्या नाभीकमलापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला. त्याचा पुत्र मरिची, मरिचीपासून मनुराज. मनूचा इक्ष्वाकु, इक्ष्वाकुचा युवनाश्व, त्याचा मांधाता, त्यापासून पुरुकुत्स, त्याचा अनरण्य, त्याचा त्रसदस्यू, त्रसदस्यूचा हर्यश्व, त्यापासून त्र्यरुण, त्याचा त्रिशंकु, त्याचे पासून हरिश्चंद्र, त्याचा हरित, हरिताचा भरुक, त्याचा वृक, वृकाचा सगर, त्यापासून अनुक्रमें पुढें समंजा, अंशुमान, दिलीप, भगीरथ, नाभ, बली, सिंधुद्वीप, अयुतायु, ऋतुपर्ण, सुदास, सौदास, अष्मक, मूलक,

दशरथ, एडविडा, विश्वसह, खट्वांग, दीर्घबाहू, दिलीप, रघु, अज, दशरथ, श्रीराम असे उत्पन्न झाले.

इतकें ऐकून कल्की मरुराजास ह्मणाला—जो दाशरथी राम सांगितलास त्याचें चरित्र मला सांगावें. मग मरूनें रामचरित्र कथन करून म्हटलें—हे पुरुषोत्तमा ! श्रीरामापासून कुश, त्याच्या पासून अतिथी, निषेध,नभ, पुंडरिक, क्षेमधन्वा, हीन, देवानिक, पारित्रायक, बलाहक,अर्क, अजनाभ,खगण, विधृत, हिरण्यनाभ, पुष्प, ध्रुव, स्यंदन, अग्निवर्ण, व त्यापासून शीघ्र तोच माझा पिता व मी त्याचा पुत्र, माझें नांव मरु असें आहे. मी सर्व संगाचा परित्याग करून कलाप गांवांत राहून तपाचरणांत कालक्रमणा करीत आहें. कलियुगाअंतीं तुझा अवतार होणार असें मी व्यासमुखानें ऐकिलें होतें तो तुझा अवतार झाला ह्मणून तुझ्या दर्शनास आलों. अशी ही मरु राजानें सांगितलेल्या वंशावळीच्या श्रवणानें दुरितांचा नाश होतो.

अध्याय १९ वा.

# देवापि राजाची वंशावळी व कल्कीचा राजांस बोध.

मरु राजाची वंशावळी ऐकल्यावर कल्केश्वर त्यास ह्मणाला—हे राजेश्वरा! तुझें वृत्त ऐकून मी संतोषित झालों. तरी हा तुझ्याबरोबर तेजःपुंज पुरुष कोण आहे तें मला सांगावें. असें ऐकून देवापि हस्त जोडून ह्मणाला—हे भगवंता, माझें वंशवृत्त सांगतों श्रवण कर. तुझ्या नाभिकमलापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला. त्यापासून अत्री, चंद्र. वुध, पुरुरवा, नहुष, ययाति, ययातीच्या दोन स्त्रिया शर्मिष्ठा व देवयानी; त्यापैकीं देवयानीपासून यदु व तुर्वसु असे दोन पुत्र झाले, आणि शर्मिष्ठेच्या उदरीं द्रुह्यु, अनु, पुरु असे तीन पुत्र झाले. पुढें पुरुपासून जन्मेजय, प्रचिन्वान्, प्रवीर, मनस्यू, अभयद, उरुक्षय, त्र्यरुणी, पुष्करारुणी, बृहत्क्षेत्र, हस्तिराज, त्यानें हस्तनापूर स्थापिलें.

पुढें हस्तीराजाचा अजमीढ, त्याचा ऋक्षराज, संवरण, कुरु, सुधनु, चवन, कृति, बृहद्रथ, जरासंध, सहदेव, सोमापी, श्रुतश्रव, सुरथ, विदूरथ, सार्वभौम, जयसेन, रथानीक, युयातु, कोपन, देवातिथी, ऋक्षराज, दिलीपक, प्रतिपक, त्याचा

मुलगा मी. माझें नांव देवापि असें आहे. मी आपलें राज्य शंतनूस अर्पण करून, कलाप गांवांत तपाचरण करित राहिलों होतों. तों आपल्या आगमनाचें वृत्त कानीं पडतांच, मुनिजनांसह दर्शनास आलों. आतां मीं आपल्या दर्शनानें काळाच्या मुखांतून मुक्त होऊन मोक्षसदन पावेन.

अशीं मरु देवापि राजांचीं वचनें ऐकून कल्केश्वर त्यांस ह्मणाला—नृपतीहो ! तुम्हीं जगविख्यात व धर्मज्ञ आहां, तरी माझी आज्ञा प्रमाण मानून स्वराज्याचें स्वधर्मनीतीनें पालन करावें. हे मरु राजा ! मी आधीं अधर्मी म्लेंच्छादिकांस मारून, अयोध्यापुरीच्या राज्यावर तुझी स्थापना करितों. तसेंच पुक्कसादिक जे अधर्मी त्यांचा संहार करून देवापीस हस्तनापुरीं स्थापितों. मी आपल्या परिवारासह मथुरापुरींत राहून सर्वांच्या दुःखाचें निवारण करीन. तसेच जे उदरावीण उष्ट्रवदनाचे दुष्ट शय्याकर्ण व एकजंघ यांस मारून कृतयुगाची स्थापना करून सद्धर्मानें प्रजापालन करीन. तरी तुह्मीं तपाचरण सोडून सैन्यासह महारथी होऊन, माझ्या बरोबर चलावें.

हे अति चतुरा मरु भूपते ! तुला विशाखयूप राजा आपली कन्या अर्पण करील तिचा तूं अंगिकार कर, आणि हे देवापि भूपाळा ! रुचिराश्व राजाची जी शांति नामक कन्या

तिच्याशीं तूं लग्न लाव. अशीं कल्कीचीं वचनें ऐकून ते मुनीसहित राजे विस्मित होऊन, उत्पत्ति, स्थिति, प्रलय-कर्त्ता आदिनारायण तो हाच असें ओळखिलें.

इतक्यांत असें अद्भुत वर्तलें कीं, सूर्यासारखे तेजस्वी, नाना रत्नांनीं मंडित व शस्त्रास्त्रांनीं भरलेले असे दोन दिव्य रथ आकाशमार्गानें खालीं उतरले. ते पाहतांच, सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. तेव्हां कल्की राजांस ह्मणाला— तुह्मीं दोघे इंद्रादि लोकपालांचे अंश असून, कालाच्या वक्रगतीमुळें गुप्त होतेत ते आज येथें प्रगट झालेत. तरी हे रथ इंद्रानें तुमच्याकरितां पाठविले आहेत, त्यांतील वस्त्रें व शस्त्रें यांचा अंगिकार करून त्यांवर आरोहण करावें.

असें हृषिकेशी बोलतांच, देवांनीं राजांवर पुष्पवृष्टी केली. त्याबरोबर ऋषिजनांनीं कल्कीची स्तुति आरंभिली. तोंच एक सुवर्णकांतिसारखा तेजस्वी परमहंस आकाश मार्गानें कल्कीजवळ खालीं उतरला.

---

२०५३
५३१
६९
नों. दि. ...... ६।७।२।५।५

## अध्याय २० वा.

# कृतयुगकथित कालमान, मरुदेवापीचीं लग्नें व धर्माचें कल्कीजवळ आगमन.

यती कल्कीजवळ येतांच, कल्कीनें वंदन करून, त्याचें पूजन केलें आणि प्रश्न केला कीं, माझ्या दैवयोगानें आपण येथें प्राप्त झालेत तरी आपलें नांव काय तें सांगावें. आपणा सारखे महात्मे पुरुष किल्मिषांचा नाश व जगाचा उद्धार करण्यासाठीं भूतलावर संचार करीत असतात. तरी आज आपल्या दर्शनानें मी धन्य झालों.

असें कल्कीचें भाषण ऐकून यती ह्मणाला—हे कल्केश्वरा ! तुझा पृथ्वीवर अवतार झाला ह्मणून मी कृतयुग तुझें ऐश्वर्य पाहण्याकरितां येथें आलों आहें. तूं सर्वांच्या आधींचा नारायण कालात्मा भगवान् उपाधिरहित असून, निमिष, काष्ठा, कला, क्षण, घटिका, प्रहर, दिवस, रात्र, पक्ष, मास, ऋतु, अयन, युगें व मन्वंतरें हीं सर्व तूं आपल्या मायेनेंच उत्पन्न केलीं असून, तुझ्या नेत्र कटाक्षानेंच हें जग चालत आहे. मन्वंतराचे आधिपती चौदा मनु असून, त्या मूर्ती तुझ्याच अंगभूत आहेत. त्यांचीं नांवें सांगतों ऐक.

स्वायंभुव, स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णी, दक्षसावर्णी, ब्रह्मसावर्णी, धर्मसावर्णी, रुद्रसावर्णी, वेदसावर्णी व इंद्रसावर्णी असे हे चौदा मनु जाणावे.

आतां एकेका मनूचें आयुष्यप्रमाण सांगतों ऐक. मनुष्याचें जें एक वर्ष तो रात्रदिवसासह देवांचा एक दिवस. या मानानें देवांचीं बारा हजार वर्षें लोटतांच, मनुष्यांचीं कृतत्रेतादि चार युगें होतात. चार युगें एकात्तर वेळ गेलीं ह्मणजे एक मनूचें आयुष्यप्रमाण होतें. याप्रमाणें सर्व मनूंचें आयुष्यप्रमाण असून, ब्रह्मदेवाच्या एका दिवसांत चवदा मनु होऊन जातात. तितक्याच कालमात्राची ब्रह्मदेवाची रात्र होते. अशा दिवस रात्रींनीं ब्रह्मदेवाचीं शंभर वर्षें भरलीं ह्मणजे ब्रह्मदेव तुझ्या स्वरूपीं लीन होतो.

नंतर पुनः प्रळयांतीं तुझ्या नाभीकमलापासून ब्रह्मदेव उत्पन्न होऊन सृष्टिरचना चालवूं लागतो. असें हें कालमान तुझ्या आधीन आहे ह्मणून तुला कालात्मा भगवान् असें ह्मणतात. जो घटका, दिन पासादिकाल त्यांतीलच मी कृतयुग असून, माझ्या कारकीर्दीत प्रजाजन कृतकृत्य होऊन वागतात. ह्मणून माझें नांव कृत असें सर्व जगांत प्रसिद्ध झालें आहे. असा मी सद्धर्मपालक आहें.

असें वचन श्रवण करून कल्की हर्षित होऊन कलीबरोबर युद्ध करावें असें मनांत आणून, आपल्या सैनिकांस ह्मणाला–कलीस मारण्याकरितां चतुरंग सैन्याची सिद्धता करून लौकर चला. अशी कल्कीची आज्ञा ऐकतांच मरु व देवापि राजांस हर्ष झाला. मग त्यांनीं वंदन करून, पूर्वीं कल्कीनें सांगितल्याप्रमाणें राजकन्याशीं यथाविधी लग्नें लाविलीं. नंतर राजांनीं आपल्या अंगांत अभेद्य कवचें, मस्तकाचें रक्षण करणारीं शिरस्त्राणें, अंगुलीचें रक्षण करणारे घोरपडीच्या कातड्याचे हातमोजे असे युद्धाचे पोषाख चढवून, अक्षय्य भाते पाठीवर बांधून, हातांत धनुष्यें घेऊन, इंद्रानें पाठविलेल्या रथांत बसले, आणि सहा अक्षौहिणी सैन्याचे नायक होऊन सर्वांचे पुढें झाले. त्यांच्या मागून विशाखयूप राजा तीन लक्ष हत्ती, सात हजार महारथी, दहा कोटी घोडेस्वार व दोन लक्ष पायदळ यांसह निघाला. तों त्याच्या मागून रुधिराश्व राजा निघून त्यानें आपल्याबरोबर एकेक हजार रथ व हत्ती, अर्धा लक्ष घोडे व दोन लक्ष पायदळ घेतलें होतें. मग कल्की दहा अक्षौहिणी सैन्य घेऊन, आपल्या बंधु पुत्र आप्तजनांसह जसा इंद्र दैत्यांस जिंकण्याकरितां निघाला तसा दिग्विजयार्थ चालला. असें धर्मास कळतांच तो कल्कीच्या दर्शनास निघाला. त्याला कली आडवा आला

पण धर्मानें त्यास न जुमानतां, सत्य, अभय, सुख, प्रसाद, योग, स्मृति, बोध, आनंद, नरनारायण, ऋषि; तसेंच शांति, श्रद्धा, मैत्री, पुष्टि, तुष्टि, बुद्धि इत्यादि धर्मपालन करणाऱ्या मूर्तींसह धर्म ब्राह्मणाच्या रूपानें कल्कीपुढें येऊन उभा राहिला. त्यास कल्कीनें पाहतांच, यथाशास्त्र पुजून ह्मटलें— हे द्विजवर्या ! आपण काय कारणास्तव येथें आलां आहां ? आपण राहतां कोठें व आपलें नांव काय तें कथन करावें.

---

अध्याय २१ वा.

## धर्माचें जन्मवृत्त आणि कल्की व कली यांचें युद्ध.

कल्कीचा प्रश्न ऐकून, धर्म आपल्या परिवारासह हात जोडून ह्मणाला—हे ब्रह्मांडनाथा श्रीमुरारे, नारायणा ! तूं सर्वांचें अंतर जाणणारा असतां, मला प्रश्न केलास तरी मी माझी जन्मकथा सांगतों श्रवण कर. तुझ्या वक्षस्थळापासून सर्व जिवांची इच्छा पूर्ण करणारा असा जो प्रत्यक्ष धर्माभिमान तो मी धर्म उत्पन्न झालों. मी आपल्या परिवारासह तुझ्या आज्ञेनें सर्व ब्रह्मांडांत फिरत असतों. परंतु सांप्रत

संकटांत पडलों आहें. काल आणि बलिष्ठ कली यांनीं मला पीडा दिली आहे. त्यांचे आश्रित बर्बर, कांबोज, पुक्कस, पुलिंद, श्वपच, म्लेंच्छ, चौन इत्यादि दुष्ट आहेत. त्यांनीं माझी निर्भत्सना करून, माझ्या परिवारास पीडा दिली त्यामुळें फार दुःख झालें होतें. पण आपल्या दर्शनानें मी धन्य झालों, तरी आतां मज दीनावर कृपा करावी.

अशी धर्माची सुंदर वाणी ऐकून कल्की ह्मणाला–हे धर्म-मूर्ते ! धैर्य धर. तुला मी निर्भय करितों. हा पहा सूर्यवंशीय मरुराजा व मूर्तिमंत कृतयुग माझ्याबरोबरच आहेत. ब्रह्म-देवानें माझी प्रार्थना केली ह्मणून मी वैकुंठराणा मनुष्यरूपानें या भुवनांत उत्पन्न झालों आहें. मींच कीटक देशस्थ बौद्ध जनांचा संहार केला असें अंतरीं जाणून सुखी हो. आतां तूं मनांतील भीती सोडून यज्ञ दान तप व्रतें करून पृथ्वीवर सुखानें रहा. मी सत्यात्मा भगवंत जगांत असतां भीति व मोहादिक यांची बाधा कशी होईल ? आतां मी गमन करितों. तूंही आपल्या स्वपुत्र बांधवांसह दिग्विजयास चल. असें कल्कीनें आश्वासन देतांच, धर्मास हर्ष झाला.

तों पुलिंद, कांबोज, बर्बर, खस, चौन, पुक्कस, शबर श्वपच, व म्लेंच्छादि महाक्रूर अशा पाप्यांचें निर्बिज करितांच, कलीचा नाश सहज होईल, असें कल्कीनें जाणून, जें कलीचें

मुख्य वस्तीस्थान विशसनपुर, तेथें कावळे, घुवडें, भालवा, कोल्हे, कुत्रीं, भूतें इत्यादि निरंतर आक्रोश करीत असून, गोमांसाची दुर्गंधी सुटली होती. जिकडे तिकडे स्त्रियांचीं भांडणें, कलह, द्यूत, मिथ्या भाषण यांनीं युक्त वादविवाद चालले आहेत, पुरुष स्त्रियांच्या आज्ञेत वागणारे, भगवन्नामाचा गंधही नाहीं, असें जें कलीचें नगर त्यांत कल्केश्वर जाण्यास निघाला.

तेव्हां धर्म स्वजन स्त्रियांस सिद्धाश्रमीं स्थापून, वेदब्रह्मरूप आपला स्यंदन व चतुरंग दळ यांसह कल्कीबरोबर निघून विशसनपुरांत निघून आला. असें कलीस कळतांच, तो आपल्या हत्ती, घोडे, रथ, पायदळ अशा सैन्यानिशीं सिद्ध होऊन, आपल्या पेचकाक्ष रथावर बसून, परिवारासह विशसनपुराबाहेर आला. उभय सैन्यें एकत्र मिळतांच, युद्धास आरंभ होऊन, धर्मानें कलीस पाहतांच, ऋषिजनांसह, कल्कीच्या आज्ञेनें अनेक शस्त्रास्त्रांनिशीं मोठ्या आवेशानें कलीवर धांवत जाऊन द्वंद्व युद्धास मिसळला.

असें पाहतांच सूर्यवंशीय मरु राजानें अपार दळासह कांबोज व खशाशीं युद्ध चालविलें. देवापि राजा चीन, बर्बर यांच्याबरोबर झुंजूं लागला. विशाखयूपानें पुलिंद व

श्वपच यांच्याशीं तुंबळ युद्ध मांडिलें. त्या चांडाळांत कोक विकोक नांवाचे दोन बंधु ब्रह्मदेवाच्या वरानें गर्विष्ठ झालेले होते, त्यांस सर्व देव भीत असत. ते उभयबंधु एकत्र राहून रणांत युद्ध करीत, त्यामुळें ते मृत्यूस अजिंक्य होते. त्यांनीं हातांत गदा घेऊन कल्कीवर धांवणें केलें. त्यांच्याबरोबर कल्की निकरानें लढूं लागला. शुंभाबरोबर कल्कीवीर आपलें हस्तकौशल्य दाखवूं लागले.

त्यावेळीं उभय सैन्यांचा झगडा होत असतां, वीर करकरां दांत खात शस्त्रें सोडूं लागले. तोंच मरु, देवापी, कल्की, विशाखयूप, धर्म यांनीं शंख वाजविले, त्याबरोबर कलीच्या वीरांनींही वाद्यांचे नाद काढिले. दोन्ही दळांच्या वाद्यगजरांत अपार शंख वाजूं लागले; त्यावेळीं ब्रह्मांडगोल थरथरां कांपूं लागला. कूर्मास भय पडलें, शेष दचकून मान सरसावून हा अनर्थ काय? असें बोलूं लागला. नक्षत्रें रिचवूं लागून मेघांची दांतखिळी बसून यमास दचका बसला. दिग्गज चळचळां कांपून मेरु मंदार आपटूं लागले. तेव्हां देवांस भीति पडली. दोहोंकडील सैन्यें एकमेकांच्या सैन्यांचा नाश करूं लागलीं.

अशा त्या रणधुमाळींत परस्परांची वीरमंडळी पृथ्वीवर मरून पडली. हत्ती सैरावैरां धांवूं लागले, रक्ताच्या नद्या

वाहूं लागल्या, कित्येक जीव रक्षणास्तव गिरिकंदरीं जाऊन बसले. असा तो युद्धप्रसंग अवर्णनीय होय. त्यावेळीं कल्कीनें कोक विकोकास खड्गानें ठार केलें. शुंभ पृथ्वीवर मूर्छित पडला. त्याप्रसंगीं कल्की प्रलयकाळच्या कृतांतासारखा दिसत होता. त्यानें किती वीरांचें खंडन केलें त्याची गणती शेषालाही झाली नाहीं. तसेंच कल्कीच्या वीरांनीं, मरु व देवापी यांनीं असंख्य शत्रुवीरांस यमसदनीं पाठविलें. कल्कीच्या वीरांचे तीक्ष्ण बाण गज, कलेवरें, अश्व, नर, यांचें भेदन करून पृथ्वींत प्रवेश करीत असत.

असा आकांत वर्ततांच, धर्मानें कलीवर तीक्ष्ण बाण सोडून त्याचें सर्वांग खिळून टाकिलें. कृतयुगानें अति रागानें अनेक शस्त्रें कल्कीवर सोडलीं. तोंच त्यानें आवेशास चढून हजारों बाण सोडले ते विजेसारखे चमकूं लागले. मग धर्मानें दोनशें बाण सोडिले ते कलीनें वरच्यावर तोडून भूमीवर पाडून, लगेच हजार बाण धर्मावर सोडतांच धर्म क्षणभर विकळ झाला. नंतर मूर्छना सांवरून धर्मानें प्रलयाग्निसारखा बाण कलीवर टाकतांच, कली मूर्छित होऊन धरणीवर पडला. त्याबरोबर तोंडांतून रक्तप्रवाह चालून, नेत्र पांढरे झाले. मग थोड्या वेळानें सावध होऊन चोहोंकडे पाहूं लागला तों धर्म व कृतयुग काळासारखे धनुष्यबाण घेऊन उभे आहेत असें

दिसलें. तेव्हां तो घाबरून आपलें वाहन जें गाढव तें व रथ टाकून नगरांत पळून जाऊन स्त्रियांत लपून बसला.

तों इकडे दंभ व सत्य झुंजत असतां, सत्याचा मारा सहन न होऊन, दंभ पळून गेला. तसेंच प्रसादानें लोभास व अभयानें क्रोधास जर्जर करून पळवून लाविलें. असे कलीचे झुंजार वीर रण टाकून विशसनपुरांत पळून गेले. असा कलीचा परिवार स्वनगरांत जाऊन लपला असें धर्म व कृतयुग यांस कळतांच ते आनंदित झाले. नंतर स्वसैन्यासह कलीच्या विशसनपुरांत जाऊन, बाणावर अग्निअस्त्राची योजना करून, तो बाण सोडून दिला. त्याबरोबर कलीच्या नगरास आग लागून स्त्रिया, पुत्र, आप्तजन त्यांत दग्ध होऊन कलीचें अंगही भाजलें. तेव्हां तो दग्ध शरीरी कली मृतपरिवाराबद्दल रुदन करीत एकटाच वर्षांतरीं जाऊन गुप्त राहिला.

---

अध्याय २२ वा.

## कोकविकोकाचें मरण व कल्कीचें भल्लाटपुरास गमन.

कली वर्षांतरास पळाल्यावर, कल्कीच्या वीरांनीं दुष्टांचा संहार केला आणि सूर्यवंशीय मरु राजानें शंक, कांबोज यांस व देवापीनें दिव्य शस्त्रास्त्र प्रहारांनीं शबर, चौन, बर्बर यांस सहपरिवारें मारिलें. तसेंच विशाखयूप राजानें खड्ग घेऊन पुलिंद, पुक्कस यांचा क्षणमात्रांत संहार केला. अशा प्रकारें राजांनीं दुष्टांस मारून जय संपादन केला.

तोंच शकुनी दैत्याचे नातु—वृकासुराचे पुत्र कोक विकोक नांवाचे गदायुद्धांत प्रवीण होते त्यांच्यावर कल्की धांवत गेला. त्यावेळीं ते दोघे वीर सिंहासारखी गर्जना करीत रणांत उभे राहिले. त्या गर्जनेनें शेषास दचका बसून, दिग्गजांचीं टाळीं बसलीं. त्या तिघांचें तुंबळ युद्ध सुरू होतांच, परस्पर गदेचे घाय मर्मी मारूं लागले. त्यामुळें मूर्च्छना येऊन पडत व पुनः सावध होऊन, एकमेकांस ताडण करीत असत. त्या तिघांचें निर्वाण युद्ध चाललें असतां, त्या दोघांनीं एकदम कल्कीवर गदा फेंकल्या, त्यायोगें कल्की मू-

र्छित पडला. मग सावध होऊन, क्रोधानें भाला घेऊन, विकोकाचें शिरकमळ छेदन केलें. त्याबरोबर मरण आलें पण त्याला ब्रह्मदेवाचा वर होता कीं, तुह्मां दोघांस जो कोणी एकाचवेळीं प्रहार करून मारील तर दोघांसही मरण येईल आणि एकाचाच जर प्राण घेईल तर दुसऱ्याच्या अवलोकनानें पहिला जीवंत होईल. त्याप्रमाणें विकोकास मारतांच, कोकाच्या दृष्टीनें तो पुनः जीवंत झाला. असें पाहतांच सर्वांस आश्चर्य वाटलें.

तेव्हां कल्कीनें कुंत घेऊन कोकाचें शिर उडविलें. तोंच कोक विकोकाच्या अवलोकनानें जीवंत झाला. याप्रमाणें त्या त्रिवर्गाचें जें युद्ध जुंपलें होतें त्याचें वर्णन करणें अशक्य होय. कल्कीनें हजार वेळ दोघांचीं शिरें उडविलीं परंतु ते एकमेकांच्या दृष्टीनें तितक्या वेळां जीवंत होऊन कल्कीबरोबर निकरानें लढूं लागले.

असें पाहतांच कल्कीस चिंता पडून, आतां काय करावें तें सुचेनासें झालें. तेव्हां कल्कीचा घोडा कोकविकोकांवर धांवून त्यांस लाथांनीं तुडवूं लागला. त्यामुळें ते दोघे बंधु जर्जर होऊन, घोड्यावर असंख्य बाण सोडूं लागले. तेव्हां घोडा चवताळून त्या दोघांस चावण्याकरितां धांवत सुटून, त्यांचें मांस तोडूं लागला. त्यावेळीं त्यांनीं घोड्याचें पुच्छ

धरून, आकाशांत गरगर फिरवून जमिनीवर आपटावें असें मनांत आणून पुच्छ धरावयास गेले तोंच घोडा खवळून त्यानें त्यांच्या हृदयावर लत्ताप्रहार हाणिला, त्यावरोबर ते मूर्छित पडले.

नंतर ते सावध होऊन उठून कल्कीबरोबर युद्ध करण्यास सरसावले. त्यावेळीं ब्रह्मदेव समरंगणांत येऊन कल्कीस हात जोडून ह्मणाला–" हे त्रिभुवनपते पद्माकांता ! तूं सर्व जाणत आहेस परंतु मानव अवतार घेतला आहेस ह्मणून सांगतों ऐक. या दोघां बंधूंस माझा वर आहे ह्मणून त्यांस जय मिळत आहे. यांतील एक जर मरण पावला तर त्याला दुसऱ्यानें पाहिलें कीं पहिला जिवंत होतो. यास्तव दोघांस एकाच ठिकाणीं गांठून यांच्या मस्तकावर एकदांच मुष्टिप्रहार दे ह्मणजे दोघेही मरण पावतील. नाहींतर तूं शंभर वर्षें लढलास तरी त्यांस मरण येणार नाहीं."

असें ब्रह्मदेवाचें वचन श्रवण करून, कल्कीनें त्या दोघांस एकत्र गांठून वज्राप्रमाणें मस्तकावर मुष्टिप्रहार दिले. त्यावरोबर कोक विकोकाचीं मस्तकें पक्व फळासारखीं चूर्णवत् होऊन गतप्राण होऊन पडले. त्यावेळीं देवांनीं पुष्पवर्षाव करून कल्कीचें स्तवन केलें, व दुंदुभी वाजविल्या. असा दुष्टांचा संहार होतांच जगास आनंद झाला.

मग कल्कीच्या कवि बंधूनें महासमर करून सारथ्यासहित रथ व दहा हजार महारथी सपरिवार मारले. दुसऱ्या प्राज्ञ बंधूनें तुंबळ युद्ध करून शतसहस्र रथी यमसदनास पाठविले. तिसरा सुमंत्रक बंधु यानें वीस हजार रथी मारले. आणि गार्ग्य भार्ग्य विशालादिक जे कल्कीचे वीर त्यांनीं म्लेंच्छ बर्बरादिकांस मारलें. अशा प्रकारें दुष्ट जनांस मारून कल्की विशाखयूपादि राजांसह विजयी झाला. नंतर तो कल्केश्वर भल्लाटेश्वर शशिध्वज राजास जिंकण्याकरितां अफाट सेनेसह वाद्य गजरानिशीं भल्लाटपुरास जाण्यास निघाला.

---

अध्याय २३ वा.

## शशिध्वज सुशांता संवाद व शशिध्वजाचें युद्धार्थ गमन.

कल्कीश्वर विशाखयूप राजादि असंख्य सैन्यासह भल्लाटपुराच्या सन्निध आला. तेव्हां त्या नगराचा राजा शशिध्वज, त्याला दहा हजार हत्तींचें बळ होतें. त्यास कल्कीश्वर नारायण प्रत्यक्ष भगवान् आपल्याबरोबर समर करण्यास आला आहे असें कळतांच त्यास युद्धानें संतोषित करावें. असा

विचार करून, आपली चतुरंग सेना व पुत्र प्रधानादि वीर जनांस बरोबर घेऊन, शशिध्वज युद्धास जाण्यास निघाला.

तेव्हां त्याची पतिव्रता स्त्री सुशांता नांवाची चंद्रवदना, केवळ देवांगनाच अशी, जसा तत्वज्ञानी शशिध्वज तशीच ती, कल्की हा विष्णु अवतार जाणून, राजापाशीं येऊन हात जोडून विनंति करून ह्मणाली–हे नाथा! सर्वांच्या अंतर्यामीं जो जगन्नाथ तोच साक्षात् कल्की प्रभु होय. त्याच्याबरोबर युद्धास सिद्ध झालेत तरी तो प्रत्यक्ष नारायण आहे. त्यास तुह्मीं ताडण कसें कराल तें सांगा पाहूं? हरि आमचें मुख्य दैवत त्यास प्रहार कराल तर आह्मांस अमित दोष लागतील.

अशी सुशांतेची वाणी ऐकून, शशिध्वज कांतेस ह्मणाला–ममप्रिये! सांगतों श्रवण कर. ब्रह्मदेवानें निर्माण केलेलें धर्माचरण फार कठिण आहे. रणांत उभें राहून गुरु, शिष्य, थोर, लहान, पिता, बंधु, जांवई इत्यादि आप्तजन जरी समोर आले तरी त्यांचा घात करावा. क्षत्रियांस रणांत मृत्यु किंवा जय या दोहोंपैकीं एक सुखावह होतें. जयप्राप्ती मिळाल्यास सुखानें राज्य भोगण्यास मिळतें आणि मरण आल्यास स्वर्गलोकीं सुख मिळतें असा क्षत्रियधर्म आहे. यास्तव मी क्षत्रिय कुलोत्पन्न कल्की नारायणाशीं युद्ध करून जय किंवा मृत्यु मिळवीन. नाहीं तर माझ्या क्षत्रिय धर्मास कलंक लागेल.

अशी भ्रताराची वाणी ऐकून सुशांता हात जोडून ह्मणाली–प्राणनाथा ! हरिचरणाची सेवा करणाऱ्या भक्तांच्या मनांत भेद नसतो. तुह्मीं हरीचे सेवक व तो परब्रह्म ईश असें असतां दोघे मोहवश होऊन युद्धांत एकत्र कसे मिळाल ? असें सुशांतेचें भाषण ऐकतांच शशिध्वज राजास मोठा आनंद होऊन तो ह्मणाला–सखे ! जशी धन्याची इच्छा असेल तशी सेवकानें वर्तणूक केली पाहिजे. सेव्य, सेवा व सेवकपण ही विष्णूची माया जाणावी. स्वामी कल्की नारायण व मी त्याचा सेवक आहें. पूर्ण ब्रह्म श्रीविष्णूंत व आत्म्यांत मुळींच भेद नाहीं. एका नारायणावांचून त्रिभुवनांत कांहींच नसून, मीतूंपण ही त्रिगुण माया जनांस मोहांत पाडते. परंतु वध्य, मारक, मारविता; सेव्य, सेवक, सेवविता आणि ध्येय, ध्यान, ध्याता ईश्वर जाणावा. यास्तव कांते ! मी आज सैन्य घेऊन कल्कीबरोबर युद्धास जातों. तूं कमलापती विष्णूचें षोडशोपचारें पूजन करित सुखानें राहा.

"असें पतीचें वचन ऐकून सुशांता आनंदित होऊन ह्मणाली–"स्वामी ! आपण धन्य अहांत, आपण कमलापतीची सेवा करून, त्याचें चिंतन करित असतां, ह्मणून तुमच्या संगतीनें मीहि जगांत धन्य झालें. आपणासारख्या विष्णुभक्तांस इहपरत्रीं वैष्णवी गति प्राप्त होईल." असें बो-

लून तिनें पतिचरणावर मस्तक ठेविलें. तेव्हां राजालाही आनंदाश्रु येऊन, त्यानें सुशांतेस आलिंगून विष्णूचें स्मरण व त्याच्या रूपाचें ध्यान केलें. नंतर शय्याकर्णादि वीरगण व अपार सैन्य बरोबर घेऊन, शशिध्वज राजा रणांगणांत येऊन कल्कीसैन्याशीं युद्धास मिसळला. त्याबद्दलचें वर्णन पुढें केलें आहे.

---

## अध्याय २४ वा.

# कल्की व शशिध्वजवीरांचें युद्ध व मरु देवापीचा पराजय.

कल्कीनारायणाचे समर्थ वीर शशिध्वज राजाचें सैन्य पाहून मोठ्या आवेशानें शस्त्रास्त्रांनीं सुमंडित होऊन युद्धास सिद्ध झाले. दोहोंकडील सैन्यांत वाद्यांची घाई होऊन, महावीर आरोळ्या देऊं लागले. तेव्हां पृथ्वी कंपायमान होऊन, शेष भीतीनें डोलूं लागला. दोन्हीं दळांतील रथ्यांवर रथी, हत्तीवर हत्ती, घोड्यांवर घोडे चढाई करूं लागले. असें तें युद्ध धर्मन्यायानें चाललें होतें. शशिध्वजाचा सूर्यकेत नांवाचा वडील पुत्र मरु राजावर बाण सोडित धांवला. ते दोघे एकमेकांवर असंख्य बाणांचा वर्षाव करूं लागले. शशिध्वजाचा धाकटा मुलगा बृहत्केतु हातांत गदा घेऊन देवापीवर गेला. विशाखयूप

राजा बरोबर शशिध्वज भिडला. रुधिराश्व रजस्यान नामक शशिध्वजाच्या वीराबरोबर लढूं लागला आणि भर्ग्य नांवाचा कल्कीवीर अनेक शस्त्रास्त्रांनिशीं शांत नांवाच्या शशिध्वजाच्या वीराशीं तुंबळ युद्ध करूं लागला.

त्या युद्धांत जसे कल्कीचे प्रबळ वीर तसेच शशिध्वजाचे खड्गें, गदा, तोमर, शूल, शक्ती, कुंत, बाण, मुसळ, मुद्गल, भाले अशीं शस्त्रें परस्परांवर सोडूं लागले. त्या शस्त्रास्त्रांच्या वृष्टींत अश्व, रथ, गज सैरावरा धांवत होते; त्यांच्या चरणघातानीं धूळ उडून रणभूमींत अंधार पडला होता. पूर्वीं जसें देव दैत्यांत महासमर जुंपलें होतें तसेंच कल्कीचें व शशिध्वजाचें तुंबळ युद्ध लागलें होतें तें पाहण्याकरितां देव गंधर्व सिद्ध चारण विमानांत बसून आले. त्यांसही भयंकर दचका बसला.

त्या युद्धप्रसंगीं कित्येकांचीं ढोपरें, मांड्या, चरण, जांघा, हात, पाय, शिरें तुटून पक्ष्यासारखीं आकाशांत उडत होतीं. कित्येक पदरहित, दांत विचकलेले, कोथळे फुटलेले, अर्धे मेलेले, प्राणास मुकलेले वीर रणांत लोळत असून, अश्व गजांचीं कलेवरें असंख्य पडलीं होतीं. असा घोर संग्राम दोन प्रहर चालला होता. त्यांत उभय दळाचे कोट्यावधि वीर प्राणास मुकले. अशा प्रकारें उभय दळांत रणधुमाळी

माजतांच, कावळे, गिधाडे, कोल्हे यांस भक्ष्य मिळाल्यामुळें ते आनंद पावले. रक्ताच्या नद्यांतून असंख्य मेतें वाहूं लागलीं. त्या रक्तप्रवाहाच्या अवलोकनानें सर्वत्रांस भीती उत्पन्न झाली व भूतांदिकास आनंद होऊन तीं आनंदानें नाचूं बागडूं लागलीं.

नंतर शशिध्वजाचा वडील मुलगा वीस वर्षांचा सूर्यकेतु यानें असंख्य तीक्ष्ण बाणांनीं मरु राजास वक्षस्थळीं विंधलें. तेव्हां त्यानें दहा बाण सोडून राजकुमारास मूर्छित पाडिलें. थोड्या वेळानें सावध होऊन पुनः वीस बाण सोडले ते मरूनें वरच्यावर तोडून, शंभर बाण सोडून सूर्यकेतूस पृथ्वीवर पाडिला. तो लगेच गदा घेऊन धांवत जाऊन, गदेनें मरूचे चार घोडे मारून, रथ लाथेनें आकाशांत उडवून दिला व मरूच्या मस्तकावर गदेचा प्रहार केला; तेणेंकरून मरु राजा मूर्छित पडला. असें मरूच्या सारथ्यानें पाहून, त्याला दुसऱ्या रथांत घालून पळवून नेलें. अशा प्रकारें सूर्यकेतूस जय मिळाला.

इकडे शशिध्वजाचा कनिष्ठ मुलगा सोळा वर्षांचा बृहत्केतु नांवाचा त्याचें व देवापि राजाचें तुंबळ युद्ध जुंपलें. ते दोघे बलाढ्य वीर एकमेकांवर अनेक शस्त्रास्त्रांचा मारा करूं लागले. तरी ते मागें हटत नव्हते. नंतर बृहत्केतूनें देवापीचे

चार घोडे व सारथी मारिला. असें पाहतांच देवापीनें राजकुमाराच्या वक्षस्थळीं वज्रासारखा मुष्टिप्रहार केला. त्याबरोबर राजपुत्र मूर्छित पडला. असें पाहून त्याचा बंधु सूर्यकेतू धांवून, त्यानें देवापीच्या मस्तकावर मुष्टीप्रहार केला; त्यामुळें देवापीराजा भूमीवर मूर्छित पडला. तेव्हां सूर्यकेतूनें त्याच्या सैन्याची दाणादाण उडविली. अशा प्रकारें दोन्हीं राजांचा पराजय करून बृहत्केतु व सूर्यकेतु विजयी झाले. पुढें शशिध्वज व कल्की यांचें युद्ध होईल.

---

## अध्याय २५ वा.

## कल्की शशिध्वजाचें युद्ध, कल्कीचा पराजय व सुशांतेनें केलेलें स्तवन.

सूत शौनकादिकांस सांगतात—नंतर तेजोराशी शशिध्वज राजा विशाखयूप राजाशीं झुजूं लागला. तोंच पुढें धर्म, कृतयुग व भक्तजनवेष्टित सूर्यासारखा तेजस्वी, घोड्यावर स्वार झालेला असा कल्की भगवान् शशिध्वजराजानें पाहून, दोन्हीं हात जोडून नयनांतून आनंदाश्रु सोडित मधुरवाणीनें ह्मणाला—हे वनमाळी ! ये ये माझ्याजवळ लौकर ये, आणि आपल्या तीक्ष्ण बाणानें माझ्या वक्षस्थळीं प्रहार कर. अ-

थवा माझ्या तीक्ष्ण बाणाची तुला भीती वाटत असेल तर माझ्या हृदयांतील गाढ अंधकारांत प्रवेश कर.

नारायणा ! तूं जर निर्गुणास सगुणत्व आणिलें आहेस, अद्वैताचें शास्त्रानें खंडण केलें आहेस, निष्काम असतां सकाम होऊन सेना समुदायानें युद्ध करित आहेस तर तूं परमात्मा जगदीश्वर माझ्याबरोबर समर करून, तें अद्भुत कौतुक सकल लोक पाहातील असें कर. तूं निर्गुण निर्विकार कामरहित आहेस अशा तुजवर मी जर प्रथम प्रहार करीन तर मला लोक हांसतील आणि मी जरें दुसऱ्याचें ऐकून तुजवर प्रथम बाण सोडीन तर हरिहरांत भेद केल्यानें जी गति होते तीच गती माझी होईल. यास्तव हे निर्गुणा आत्मारामा ! तूंच आपल्या तीक्ष्ण बाणानें आधीं माझें विदारण कर.

असें शशिध्वजाचें गूढ वचन ऐकून तो अक्रोध कल्कीनारायण क्रोधित होऊन, धनुष्यास बाण लावून बाणापाठीं बाण शशिध्वजावर सोडूं लागला. परंतु दहा हजार हत्तींचें बळ ज्याला अशा त्या शशिध्वजानें त्या बाणांस न जुमानतां, कल्कीवर असंख्य बाणांचा वर्षाव करूं लागला. कल्की जे जे बाण सोडी ते ते बाण शशिध्वज तोडून टाकित असे. जसे भीष्मार्जुन किंवा वृत्रासुर व इंद्र त्याप्रमाणें ते

दोघे वीर अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांचे प्रहार एकमेकांवर करित होते. असा त्यांचा घोर संग्राम पाहून सर्वांस दचका बसून, आजच येथें प्रलय होतो कीं काय ? असा मानवांस विचार पडला, व देव विमानें घेऊन पळत सुटले. असें पुष्कळवेळां शस्त्रास्त्रांचें तुंबळ युद्ध झालें पण दोघांचा उद्योग व्यर्थ गेला. अर्थात् त्यांचीं शस्त्रास्त्रें निष्फळ झालीं. कारण उभयतांचीं गात्रें सतेज दिसत होतीं.

नंतर ते भुजदंड थोपटून जसे जरासंध व भीमसेन किंवा शंबर आणि प्रद्युम्न मल्लयुद्धास प्रवर्तले तसे युद्ध करूं लागले. मग कल्कीनें शशिध्वजाच्या हृदयावर प्रहार केला, त्यामुळें त्यास मूर्छना आली. ती सांवरून त्वेषानें उठून कल्कीच्या हृदयावर दोन मुष्टिघात दिले. त्यांच्यायोगें कल्की रक्त ओकून मरणप्राय होऊन भूमीवर पडला.

असें धर्म व कृतयुग यांनीं पाहतांच, ते कल्कीस उचलावयास जवळ धांवत आले. तों शशिध्वजराजानें धर्म व कृतयुगास कांखेंत मारून कल्कीस हृदयाजवळ उचलून घेऊन, जो जगत्प्रभु मोक्षरूपी गृह प्रत्यक्ष नारायण तो आपणास मिळाला ह्मणून शशिध्वज त्या तिघांसह मोठ्या आनंदानें नाचत स्वगृहीं गेला. तों सुशांता कांता वैष्णवजनांनीं वेष्टित बसली होती, तिला पाहून ह्मणाला–हे प्राणप्रिये ममकांते !

आज मला जें कोणासही प्राप्त न होणारें असें दैवयोगानें प्राप्त झालें आहे. जो पूर्णब्रह्म सनातन सर्व देवांच्या प्रार्थनेनें शंभली गांवांत उत्पन्न झाला तो कल्की नामक भगवान्, पद्मेचें पाणिग्रहण बौद्ध म्लेंच्छाचा संहार व माझ्याबरोबर युद्ध करून गाढ मूर्च्छेच्या मिषानें तुझी सेवा पाहण्याकरितां येथें प्राप्त झाला आहे. तो हा पहा माझ्या वक्षस्थानीं व एका कांखेंत धर्म आणि दुसऱ्या कांखेंत कृतयुग घेऊन आलों आहें. तरी यांचें अवलोकन करून यथाविधीनें पूजन कर. पूर्वजन्मींच्या पुण्याईमुळें यांचें दर्शन झालें.

अशी पतीची वाणी श्रवण करून सुशांतेनें हात जोडून नमन केलें आणि भक्तिभावानें यथाविधी पूजन करून, कल्कीनारायणाची स्तुति केली. ती भाविक जनांकरितां येथें देतों.

जयहरेमराधीशसेवितं तवपदांबुजं भूरिभूषणम् ॥ कुरुममाग्रतः साधुसत्कृतं त्यजमहामते मोहमात्मनः ॥ १ ॥ तववपुर्जगद्रूप संपदा विरचितंसतां मानसेस्थितम् ॥ रतिपतेर्मनोमोहदायकं ॥ कुरुविचेष्टितं कामलंपटम् ॥ २ ॥ तवयशोजगच्छोकनाशनं मृदुकथामृतंप्रीतिदायकं ॥ स्मितसुधोक्षितंचंद्रवन्मुखं तवकरोत्वलं लोकमंगलम् ॥ ३ ॥ ममयतिसवंयंसर्वदुर्जयोयदि तवा प्रियं कर्मणाचरेत् ॥ जहितदात्मनः शत्रुमुद्यतंकुरुकृपांनचे

दिह्गीश्वरः ॥ ४ ॥ महदहं युतंपंचमात्रया प्रकृतिजाययानि र्मितंवपुः ॥ तवनिरीक्षणाल्लीलयाजगत्स्थितिलयोदयं ब्रह्म-कल्पितम् ॥ ५ ॥ भूवियन्मरुद्वारितेजसांराशिभिः शरीरेंद्रि याश्रितैः॥ त्रिगुणयास्वयामाय याविभोकुरुकृपां भवत्सेवनार्थि-नाम् ॥ ६ ॥ तव गुणालयं नाम पावनं कलिमलापहं कीर्त-यंतिये ॥ भवभयक्षयंतापतापितामुहुरहोजनाः संसरंतिनो॥७॥ तवजनुः सतां मानवर्द्धनं जिनकुलक्षयं देवपालकम् ॥ कृतयुगा-र्पकं धर्मपूरकं कलिकुलांतकं शंतनोतुमे ॥ ८ ॥ ममगृहं पति-पुत्रनप्तृकं गजरथैर्ध्वजैश्चामरैर्धनैः ॥ मणिवरासनं सत्कृतिं विनातवपदाब्जयोः शोभयंतिकिम् ॥९॥ तवजगद्वपुःसुंदरस्मितं मुखमनिंदितंसुंदरारवम् ॥ यदिनमेप्रियंवल्गुचेष्टितंपरिकरो-त्यहोमृत्युरस्त्विह ॥ १० ॥ हयचरभयहरकरहरचरणखरतर-वरशरदशवलदमन ॥ जयहतपरभरभववरनशनशशधर शतसमरसभरवदन ॥ ११ ॥

असें हें सुशांताकृत स्तवन कल्कीनारायण ऐकून मूर्च्छना टाकून वर उठून बसला.

अध्याय २६ वा.

## कल्की, सुशांता, शशिध्वज यांचा संवाद व रमेचें कल्कीशीं लग्न.

कल्कीनारायण सुशांतेचें स्तवन ऐकतांच, उठून बसला. तों पुढें सुशांता उभी असून, तिच्या दोहोंबाजूस धर्म व कृतयुग उभे होते आणि मागील बाजूस शशिध्वज उभा होता. असें पाहतांच हृषिकेशी लाजून सुशांतेस ह्मणाला— हे लावण्यखाणी ! तूं कोणाची कामिनी आणि माझें स्तवन कां ह्मणून केलेंस ? शशिध्वज राजा महा प्रतापी असून, तो माझ्या मागें उगाच उभा कां राहिला आहे ? असें तिला विचारल्यावर कृतयुगास व धर्मास ह्मणाला—अहो ! आपण या स्थानीं कसे आलों ? आपण रणांगण सोडून शत्रूच्या घरीं आलों, व ही शत्रूची स्त्री आपली स्तुति कां करीत आहे ? या शशिध्वज राजानें मज मूर्च्छितास कां मारलें नाहीं तें मला सांगा.

असा पद्मारमणानें कृतयुगास व धर्मास प्रश्न करितांच सुशांता हात जोडून ह्मणाली—हे पद्मारमणा ! तूं ब्रह्मांडाचा धनी ! तुझी सेवा या त्रिभुवनांत करणार नाहीं असा कोण आहे ? ब्रह्मदेवादि सर्व देव गंधर्व, दैत्य, नाग, नर तुझी निरं-

तर सेवा करित आहेत. मग आमच्या सेवेचें आश्चर्य कां वाटावें ? आपण आतांच बोललां कीं, शत्रूची स्त्री माझी सेवा कशी करते ? तर देवा सांगतें ऐक. भगवंता ! जे तुझे सेवक भक्त त्यांच्याच दर्शनानें शत्रुभाव निरसून जातो, मग तुझ्या प्रत्यक्ष दर्शनानें तो शत्रुभाव कसा राहील ? तुझ्या बरोबर माझ्या प्राणनाथानें महायुद्ध करून शेवटीं शत्रुभाव टाकिला, मग तो तुला येथें आणावयास समर्थ कां होणार नाहीं ? गा पद्मापती ! माझा हा शशिध्वज प्राणपती तुझा निस्सीम भक्त असून, त्याच्याच सहवासानें मी आपली दासी झालें आहें. नारायणा ! तूंच आमचें अंतर आणून मूर्च्छेचें मिष घेऊन येथें आलास.

असें सुशांतेचें वचन ऐकून धर्म व कृतयुग कल्कीस ह्मणाले-हे खड्गपाणी ! शशिध्वज व सुशांता या उभयतांची तुझ्यावर निस्सीम भक्ती आहे, ती पाहून आम्हीं धन्य झालों. या उभयतांच्या तेजानेंच तुम्हांस पूज्यत्व प्राप्त झालें असून, यांच्यासारख्या पुण्यराशी जगतांत मिळणार नाहींत. असें कृतयुग व धर्म बोलतांच, शशिध्वज हात जोडून ह्मणाला-हे कल्केश्वरा पद्माकांता ! तूं जगदात्मा प्रभु असतां, मी कामादिरागानें वैरभाव धरून तुझ्यावर अनेक शस्त्रांचे प्रहार केले त्याबद्दल मी दंडास पात्र आहें. तरी मला

योग्य शासन द्यावें. योग्य शिक्षा केल्यावांचून मला मुक्ति मिळणार नाहीं.

असें राजाचें वचन ऐकून, कलंकी हास्यवदन करून ह्मणाला—हे भूपा ! तूं मला जिंकलेंस, तुझ्यासारखा प्रतापी वीर या त्रिभुवनांत नाहीं. म्हणून तूं जगांत धन्य आहेस. तुझ्या प्रतापानळानें माझी सेना होरपळली आहे. असें कल्कीचें वचन ऐकून राजानें आपल्या पुत्रांस नगरांत बोलावून आणिलें. मग रमा नांवाची आपली मुलगी सुशांतेच्या मनांत कल्कीस द्यावी असें आल्यावरून राजानें लग्नाची सामग्री सिद्ध करून, कल्कीच्या वीरांस बोलावून आणण्याकरितां दूतांस रणांत पाठविलें. ते रणभूमीवर येऊन कल्कीवीरांस ह्मणाले—शशिध्वज राजा कल्कीला आपली कन्या देत आहे तरी सैन्यासह नगरींत चलावें. असें ऐकतांच विशाखयूप व मरु आदि राजे सैन्यासह नगरींत आले.

नंतर शशिध्वज राजानें सर्व नगर शृंगारून सुमुहूर्त पाहून कल्कीबरोबर रमेचें लग्न लाविलें. सर्वांस वस्त्रालंकार, दानें भोजनें घालून तृप्त केलें. त्यानंतर कल्की सभामंडपांत बसला असतां, समग्र नगरस्थ जन कल्कीच्या दर्शनास आले. ते जसा नक्षत्र वेष्टित चंद्र, त्याप्रमाणें कल्कीनारायणास वेष्टून बसले.

---

अध्याय २७ वा.

## शशिध्वज राजाचा पूर्वजन्मवृत्तांत.

कल्कीभोंवतीं विशाखयूप राजादि सर्व राजे, शशिध्वज, त्याची कांता सुशांता, धर्म व कृतयुग बसले असतां, राजे शशिध्वजास ह्मणाले—गा राजेश्वरा ! तुह्मांस प्रत्यक्ष कल्कीनारायण जांवई मिळाला; त्यामुळें तुह्मीं धन्य अहां; हरीच्या ठायीं तुमची निस्सीम भक्ति पाहून आमचीं सभासदांचीं अंतःकरणें आश्चर्ययुक्त झालीं, तरी ही अद्वैत भक्ति तुह्मां स्त्रीपुरुषांस कोठून प्राप्त झाली ? या भक्तीचा कोणी सिद्धानें उपदेश केला किंवा स्वभावतःच उत्पन्न झाली हें आह्मांस सांगावें.

असें राजांचें वचन ऐकून, शशिध्वज ह्मणाला—भूपतीहो ! आमचें जन्मकर्म सांगतों श्रवण करा. त्याच्या श्रवणानें सर्व कामें खचित पूर्ण होतील. पूर्वी एक हजार युगांचे अंतीं आह्मीं उभयतां गिधाड पक्ष्याच्या जन्मीं वृक्षावर राहात होतों व वनोपवनें फिरून, मेलेल्या प्राण्यांच्या मांसावर आपली कालक्रमणा चालविली होती. तों एके दिवशीं आमच्या घरट्याजवळ एक पारधी येऊन त्यानें आमचें मांस भक्षण करण्याच्या इराद्यानें वृक्षाखालीं जाळें पसरून,

त्यावर मांसाचे तुकडे टाकून आपण लपून बसला. तेव्हां आह्मीं दोघें क्षुधाक्रांत झालेलीं भक्ष्य पदार्थांकरितां घरट्यां-तून बाहेर पडलों. तोंच वृक्षाखालीं मांस पडलेलें पाहून त्यावर झडप घातली. त्यामुळें जाळ्यांत गुंतून गेलों. मग त्या पारध्यानें आह्मांस पकडून, गंडकी नदीवरील शिळेवर नेऊन आपटून प्राण घेतले. परंतु ती शीळा गंडकी नदी जवळच विष्णुचक्रांकित असल्यामुळें त्या शिळेवर आमचे प्राण गिधाडाच्या देहांतून निघतांच, चतुर्भुज होऊन, दिव्य विमानांत बसून वैकुंठांत गेलों. तेथें हजार युगेंपर्यंत आनं-दांत राहिलों, तेथून पांचशें युगें ब्रह्मलोकीं वास केला. मग चारशें स्वर्गभुवनांत राहिलों आणि आतां या भूमंडळांत दोघेंही उत्पन्न झालों. आह्मीं गंडकी नदीजवळ विष्णुचक्रां-कित शिळेवर मृत्यु पावलों, ह्मणून मागील जन्माची आठ-वण झाली. त्याच्यायोगेंच हा श्रीहरीच्या भक्तीचा योग आमच्या हृदयांत वसला. आम्हांस सिद्धादिकांचा उपदेश मुळींच झालेला नाहीं. हा लोकोत्तर अद्भुत प्रभाव गंडकीचाच जाणावा. तिच्या सेवेसारखें वैभव त्रैलोक्यांत नाहीं. अहो, प्रत्यक्ष वैकुंठनाथ शाळिग्राम शिळांत राहातो. त्याच शिळा गंडकीनदींत पसरल्या आहेत. त्या नदीचें वर्णन माझ्यानें करवत नाहीं. तिच्या जलस्पर्शानें मोक्षसदन प्राप्त होतें.

ह्या सकळ ब्रह्मांडांत सर्व पदार्थ हरिरूपी आहेत, हरि वांचून किंचितही ठाव नाहीं. यास्तव सेवा करण्यास एक श्रीभगवान व त्याचा सेवक आपण असें मानावें. ब्रह्मदेवादिक उत्पत्त्यादि करणाऱ्या मूर्ती मायेच्या उपाधीनें झालेल्या यांत द्वैत नसतें. जो श्रीहरीस स्मरून त्याचीं नामें अहर्निशीं गातो त्याच्या आनंदसुखास पार नाहीं. तो सर्वदा ब्रह्मानंदसागरांत डुल्लत असतो, त्याला आपल्या देहाचें स्मरण राहात नाहीं. भगवद्भक्ती सर्व लोकांस पवित्र करित असून ब्रह्मरूप संपत्तीला प्रकाशित करते.

या ब्रह्मांडांतील लोक सात्विक, राजस व तामस गुणाचे आहेत. जे भगवद्भक्त ते सत्वगुणी, इंद्रियांस संतोषित करणारे ते राजस गुणी व जे घोर संकल्पी द्वैतदर्शनी ते तामसी जाणावे. सत्वाश्रयानें निर्गुणपण, रजाश्रयानें विषयाची बुद्धि व तमाश्रयानें निरयप्राप्ती होते. यास्तव भगवद्भक्त सुख देणारें व योग्य असेल त्याचेंच आचरण करितात. विष्णूचें पवित्र व अन्नशिष्ट नैवेद्योच्छिष्ट तेंच अति श्रेष्ठ भोजन सात्विक भक्तांस आवडतें. जें शरीरास सुख देणारें, शुक्र व रक्त वाढविणारें व इंद्रियांस प्रीति उत्पन्न करणारें अन्न त्यास राजस असें ह्मणतात. तसेंच तिखट, दाहक, अति उष्ण, शिळें, आंबट, कडू अन्न तामस जाणावें, तें तामसांस आवडतें. सात्विक

जन वनांत, राजस जन उत्तम मंदिरांत; तामस जन मद्य,द्यूत, विश्वयोषिता अशा स्थानीं वास करितात. अशा प्रकारचे त्रिविध जन त्रिभुवनांत आहेत. भक्तांच्या चिंतनाप्रमाणें श्रीहरी त्यांजवर प्रेम ठेवितो. असें आहे ह्मणून भक्तिभावानें श्रीहरीचें चिंतन केलें असतां निर्वाण (मोक्ष) पद प्राप्त होतें. अशी नारदाची वाणी ऐकून तो सनकमुनी अत्यानंदानें इंद्रगृहीं गेला.

शशिध्वज राजांस ह्मणाला—असा हा भक्तिमहिमा ब्रह्मसभेंत जेव्हां नारदानें सांगितला तेव्हां मी तेथें होतों. तेव्हां मी जें ऐकिलें होतें तेंच तुह्मांस सांगितलें. आतां तुमची काय इच्छा आहे ? राजे ह्मणाले—हे शशिध्वज राजेंद्रा भगवद्भक्ता ! सर्व जिवांच्या हिताकरितां तत्पर असणारा, असा तूं असून क्रूर व हिंसायुक्त अशा युद्धकर्मास प्रवृत्त कसा झालास ? हें आह्मांस सांगून आमच्या संशयाचें निरसन करावें. अशी नृपांची वाणी ऐकून शशिध्वज त्यांस सांगूं लागला. ती कथा पुढें वर्णन केली आहे.

## अध्याय २९ वा.

## शशिध्वजानें सांगितलेलें भक्त व भक्तिआख्यान.

शशिध्वज राजा सर्व भूपांस म्हणाला—अहो विशाखयूपादि भूपतीहो ! जी यथेच्छ स्वरूप धारण करणारी, द्वैत धर्म प्रकाशणारी त्रिगुणात्मिका ईश्वराची माया तिनें आपल्या सामर्थ्यानें अनंत ब्रह्मांडें उत्पन्न करून धर्माचा प्रसार होण्याकरितां चार वेद उत्पन्न केले; तेच अधर्माचा नाशकर्ते व सद्धर्माचा प्रसार करणारे असून, विषयकामुक जनांस भक्तिमार्ग दाखविणारे आहेत. ह्मणून या ब्रह्मांडांत जी विशुद्ध वेदवाणी तीच खरी धर्मप्रवर्त्तक असें जाणावें. वात्स्यायन व स्वयंभु आदि मुनी वेदवाक्याप्रमाणेंच ईशपूजन करितात, त्याप्रमाणेंच आम्हीं क्षत्रिय वेदोक्त धर्माचा आश्रय धरून रणांगणांत निर्भय वागतों. जे आह्मांस मारावयास येतात त्यांस आह्मीं मारितों. ज्याला मारूं नये त्याला मारल्यानें व जो मारण्याला योग्य त्याच्या रक्षणानें नरास महादोष लागतो. त्याच्या शुद्धतेस जगांत प्रायश्चित्त नाहीं. असें भगवान् व्यासऋषी स्वमुखानें बोलले आहेत. यास्तव जे महावीर समोर युद्धास येतील त्यांसीं घोर युद्ध करून त्यांस

यमसदन दाखवावें ह्मणूनच मी तुमच्या वीरांचा घात करून, धर्म, कृतयुग व कल्की यांस जिंकून घरीं घेऊन आलों. वेद-वचनाप्रमाणें वागणें हा मुख्य धर्म व वेदवचनाचें उल्लंघन करणें हा अधर्म, म्हणून मी वेद वचनावर विश्वास ठेवून श्रीहरीची सेवा करित असतों त्यामुळें मला पातकांची किंचित् भीति वाटत नाहीं. ईश्वराच्या आश्रयानेंच देहधारणा करून हरिभक्ति करणाराच्या सुखास पार नाहीं.

असें शशिध्वजाचें भाषण ऐकून राजे पुनः म्हणाले—हे पुण्यशीला शशिध्वजा! गुरूच्या शापानें निमी राजा मरण पावला पण त्याला लागलीच मोक्षप्राप्ती झाली! तसाच विमुक्त पूर्ण ज्ञानी वशिष्ठ शिष्याच्या शापानें जन्म मरणाच्या फेऱ्यांत कां पडला? असें ऐकतांच शशिध्वज म्हणाला—भूप हो! मनुष्य चौऱ्याशीं लक्ष योनींत दुःखें भोगून शेवटीं सत्कृत्यांमुळें मनुष्यजन्म पावतो. तेव्हां तो तीर्थक्षेत्रें व साधूच्या संगतीनें शुद्धांतःकरणी बनून लक्ष्मीपतीचे दर्शनानें सलोक्यता मुक्ति पावतो. तो मुक्त असला तरी ईश्वराच्या सेवेंत आनंद मानतो. त्याच हेतूनें वशिष्ठ जन्म मरणास उद्युक्त झाला व निमी राजा साधु संगतीनें मुक्ति पावला. हें भक्ति भक्तांचें आख्यान श्रीहरीच्या भक्तीची वृद्धि करणारें आहे. याच्या श्रवण पठणानें मोक्षसदन प्राप्त होतें.

---

## अध्याय ३० वा.

# शशिध्वज राजाचा पूर्वजन्मवृत्तांत.

शशिध्वज राजानें भक्तभक्तीचें आख्यान विशाखयूप राजादिकांस सांगितल्यावर, तो कल्कीस हात जोडून ह्मणाला— हे त्रैलोक्यनाथा ! हे सर्व राजे जसे तुझे आश्रित आहेत तसाच मीही तुझा आज्ञाधारक आहें. तरी आतां माझा वृद्धापकाळ झाला यास्तव मी तपाचरण करण्यास हरिद्वारीं जातों. जगन्नाथा ! माझे पुत्रपौत्रादिक आपले आश्रित आहेत, त्यांचा तुझ्यावांचून पालनकर्त्ता कोणी नाहीं. जसा जांबुवंताच्या व द्विविद वानराच्या मनांतील हेतु तूं जाणत होतास, तसाच माझ्याही मनांतील जाणून त्यांच्यासारखें आमचें रक्षण कर.

असें बोलून शशिध्वज सुशांतेस बरोबर घेऊन हरिद्वारीं जाण्यास सिद्ध झाला. तोंच कल्केश्वर लज्जित होऊन बसला. असें पाहून सभेंतील राजे आश्चर्यचकित होऊन ह्मणाले—हे प्रभो जगत्पती ! आपणासमोर शशिध्वज राजानें जें भाषण केलें तें ऐकून आपण अधोवदन होऊन बसलेत याचें कारण काय ? कल्की ह्मणाला—हा प्रश्न शशिध्वजासच विचारा-तो तुमचा संशय दूर करील. मग राजांनीं शशिध्वजास वि-

चारतांच, तो सांगूं लागला कीं—भूपहो ! पूर्वी त्रेतायुगांत श्रीरामानें अवतार घेतला. त्याचा बंधु लक्ष्मण यानें रामनामांकित तीक्ष्ण बाणानें रावणाचा वडील पुत्र इंद्रजीत याचा वध करून मुक्त केला. पण त्या ब्रह्मकुलोत्पन्न वीराला लक्ष्मणानें अग्निगृहांत मारलें ह्मणून त्याला एक दिवसा आड येणाऱ्या तापानें गांठलें त्यामुळें लक्ष्मण धरणीवर पडला. असें औषध क्रिया जाणणाऱ्या द्विविद नांवाच्या वानरानें जाणून, लक्ष्मणास भूमीवर निजवून एक रामनामांकित पत्रिका लिहून ती अंतरिक्षांत लक्ष्मणासमोर हातांत धरून त्यास दाखविली. ती पाहतांच लक्ष्मणाचा एकाहिक ज्वर जाऊन, उठून बसला, आणि द्विविदास ह्मणाला—तुझ्या कृत्यानें मी संतोष पावलों तरी इच्छित वर मागून घे.

हें लक्ष्मणाचें वचन श्रवण करतांच, द्विविद ह्मणाला—हे अनंता ! ‘ माझी वानरदेहापासून मुक्तता व्हावी ’ हीच माझी इच्छा, पूर्ण करणार आपण समर्थ अहां. लक्ष्मणानें सांगितलें—हे वानरोत्तमा ! मी पुढें कृष्णावतारीं बलराम नांवाचा अवतार घेईन तेव्हां तुझा मनोरथ पूर्ण करीन. आणि परोपकारार्थ दुसरा वर देतों कीं, जर मनुष्यास एकाहिक ज्वर येऊं लागेल तर— “ समुद्रस्योत्तरेतीरे द्विविदो नाम वानरः ॥ एकाहिकं ज्वरं हंति लिखनं यस्तु पश्यति ॥ १ ॥ हा उत्तम

मंत्र ताडपत्रावर लिहून, तें पत्र घराच्या द्वारांत वर टांगून ठेवून त्याकडे ताप येणाऱ्या मनुष्यास पाहात राहण्यास सांगावें ह्मणजे ताप नाहींसा होईल. हें माझें वचन असत्य होणार नाहीं.

नंतर तो द्विविद वानर महारण्यांत जाऊन बलरामाच्या दर्शनाची वाट पाहात राहिला. पुढें कांहीं कालानें नारायणानें श्रीकृष्ण व लक्ष्मणानें बलराम अवतार घेतला, तेव्हां बलरामानें वानरास मुसलप्रहारानें मुक्ति दिली. त्याचप्रमाणें भगवंतांनीं जेव्हां पांचवा वामनावतार घेतला तेव्हां त्यांचा एक चरण ऊर्ध्ववृद्धि पावतांच, त्या चरणांतून एका निमिषांत जांबुवंतानें एकविस प्रदक्षिणा घातल्या. तें त्याचें अद्भुत सामर्थ्य पाहतांच, वामनानें वर मागण्यास सांगितला. तेव्हां जांबुवंत ह्मणाला–नारायणा ! ‘ तुझ्या चक्रप्रहारानें मला मोक्ष मिळावा. ’ ती त्याची इच्छा ऐकून वामनानें ह्मटलें–ही तुझी इच्छा मी कृष्णावतारीं पूर्ण करीन.

नंतर भगवंतानें कृष्ण अवतार घेतला, त्यापूर्वी मी सत्राजीत नांवाचा राजा होतों. मी सूर्यास प्रसन्न करून घेतांच, त्यानें मला एक स्यमंतक मणी प्रसादादाखल दिला. तो मणी मी गळ्यांत घालून कृष्णाच्या सभेंत गेलों होतों, तेव्हां तो तेजस्वी मणी कृष्णानें माझ्याजवळ मागितला, तो मी त्यास न

देतां तसाच घरीं गेलों. पुढें माझा प्रसेन नांवाचा धाकटा भाऊ तो मणी गळ्यांत घालून, अरण्यांत शिकारीस गेला. तों त्या मण्याचें तेज पाहून सिंहानें प्रसेनास ठार मारून मणी घेऊन चालला असतां, तें कृत्य जांबुवंतानें पाहून, सिंहास ठार केला व मणी घरीं नेऊन आपल्या जांबुवंती कन्येच्या पाळण्यावर बांधिला.

तों इकडे प्रसेनाबरोबर गेलेलें सैन्य प्रसेनाचा कोठें पत्ता नाहीं असें सांगत आलें. त्यावेळीं मला वाटलें कीं, माझ्या भावाला कृष्णानें मारून मणी घेतला असावा. असें मी लोकांजवळ बोलतांच, ती बातमी कृष्णास कळून, आपलयास विनाकारण दोष लागला ह्मणून मण्याच्या शोधाकरितां श्रीकृष्ण हिंडत हिंडत जांबुवंताच्या विवरांत शिरला. तों जांबुवंतीच्या पाळण्यावर मणी टांगलेला पाहून, कृष्णानें जांबुवंताबरोबर अठ्ठाविस दिवसरात्र युद्ध करून जर्जर केलें. तेव्हां जांबुवंतानें श्रीकृष्णाला रामरूपानें ओळखून, आपली जांबुवंती कन्या अर्पण करून वर मणी आंदण दिला. नंतर जांबुवंतास मुक्ति दिली.

मग श्रीकृष्ण मणी घेऊन द्वारकेस येऊन, मला बोलावणें करून, सर्वांसमक्ष मण्याची हकिगत सांगून तो मणी माझ्या स्वाधीन केला. तेव्हां मी दोष दिल्याबद्दल खिन्न झालों. मग

कृष्णाची मर्जी आपणावर राहावी ह्मणून, सत्यभामा नांवाची कन्या व मणी कृष्णास दिली. पण तो मणी कृष्णानें परत मला देऊन तो हस्तनापुरास गेला, तों इकडे द्वारावतीस मध्यरात्रीं शतधन्व्यानें मला ठार मारून तो मणी चोरून नेला. हा मागील वृत्तांत मला श्रीकृष्ण जांवई मिळाला ह्मणून आठवत आहे. तेव्हांच मी कृष्णदर्शनानें मुक्त झालों असतों, परंतु मी विनाकारण कृष्णावर दोष ठेविला म्हणून मला गर्भवास भोगावा लागला. पूर्वीचा सत्राजीत राजा तोच मी शशिध्वज कल्कीस कन्या अर्पण करून त्याच्याच हस्तें मरण यावें अशी इच्छा करित आहें. पण तो जांवई व मी सासरा असतां त्याच्या हातानें मरण इच्छितों ह्मणून तो लज्जित झाला आहे. असें हें शशिध्वजानें सांगितलेलें अद्भुत वृत्त ऐकून, सर्व राजे आनंदानें कल्कीचें स्तवन करूं लागले.

---

अध्याय ३१ वा.

## नागकन्या, राजांस व कल्कीस राज्यप्राप्ती, मायास्तवन व शशिध्वजास मुक्ती.

मग कल्की आपल्या शशिध्वज सासऱ्यास रम्य वचनांनीं विनवून, गमनार्थ आज्ञा मागून भूपगणांसह निघाला व

शशिध्वज इच्छित वर मिळवून मायेचें स्तवन करून स्त्रीसह वनांत गेला. नंतर कल्की सैन्यासह कांचन नगरींत आला. ती नगरी गिरी दुर्ग यांनीं वेष्टित असून तिच्या रक्षणार्थ विषाची वृष्टि करणारे सर्प होते. त्यांचा व गिरी दुर्गांचा कल्कीनें तीक्ष्ण शस्त्रानें संहार करून, नगरांत प्रवेश केला. तों जिकडे तिकडे चंदनाचे वृक्ष असून त्यांवर सर्पांच्या पिळण्या पडल्या होत्या, व मंदिरांत फक्त नागकन्यांशिवाय दुसरें कोणी नव्हतें.

त्या कांचनपूर नगरांत मनुष्याचा वारा नाहीं असें कल्कीनें पाहून राजांस ह्मटलें—आपण जर या नगरांत प्रवेश केला तर नागकन्यांच्या विषानें जळून जाऊं. कारण येथें नागकन्या शिवाय दुसरा कोणाचा वास नाहीं. तर आंत प्रवेश करावा कीं नाहीं ? याबद्दल तुमचा विचार काय आहे? असें ऐकतांच राजे विचारांत पडले. इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, "हे ब्रह्मांडनायका ! जर तूं सैन्यासह प्रवेश करशील तर नागकन्येच्या विषानें सैन्याचें भस्म होईल. यास्तव तूं आपल्या विजयी अश्वावर बसून एकटाच जा, ह्मणजे जय घेऊन येशील.' अशी आकाशवाणी ऐकतांच, कल्की सैन्य मागें ठेवून, पोपटास बरोबर घेऊन घोड्यावर स्वार होऊन, नगरद्वारांत येऊन आंत पाहूं लागला तों

एक सुंदर नागकन्या, मनास मोह उत्पन्न करणारी दृष्टीस पडली. तिच्या नेत्रांतून अग्नीच्या ज्वाळा निघत होत्या. तिची ज्यावर दृष्टी पडे त्याचें भस्म होऊन जाई. त्या नागकन्येपुढें कल्की जाऊन उभा राहिला, पण त्यास विषबाधा झाली नाहीं.

असें पाहतांच नागकन्येस चमत्कार वाटून ती ह्मणाली– हे महापुरुषा ! आजपर्यंत येथें जे सुर नर गण गंधर्व आले त्याचें माझ्या दृष्टीनें भस्म झालें, पण तुला बाधा झाली नाहीं त्यावरून मला वाटतें कीं, आपण वैकुंठपती भगवान् आहां, तरी या स्थानीं तुमची माझी भेट कोणत्या पुण्यानें झाली ? कल्की म्हणाला–हे रूपसुंदरी ! तूं कोण कोठील व कोणाची कामिनी ? आणि तुझी अशी गति होण्याचें कारण काय ? व तुझे नेत्र विषारी कां झाले ?

असें कल्कीचें वचन ऐकून ती विषनयना ह्मणाली–माझा पूर्व वृत्तांत सांगतें ऐक. मी चित्रग्रीव नामक गंधर्वाची भार्या नांवाची स्त्री, मला सुलोचना असेंही ह्मणत असत. मी एके दिवशीं पतिबरोबर विमानांत बसून, गंधमादन पर्वतावर येऊन, तेथील लता वृक्षाच्या कुंजांत पतीशीं रममाण झालें, तों तेथें एक यक्ष राहात होता, त्यास मी पाहतांच त्याची निंदा केली, तेव्हां त्यानें शाप दिला कीं, "तूं माझी निंदा

करून ज्या नेत्रांनीं मला पाहिलेंस ते नेत्र विषयुक्त होतील." असें बोलून मला या विषनगरींत लोटून दिलें. त्या दिवसापासून मी येथें एकटीच राहात आहें. हे भगवंता! आज मी तुझ्या दर्शनानें शापापासून मुक्त होऊन विषनेत्रा होतें तीं अमृतनेत्रा झालें असें वाटतें, तरी आतां मला पतिदर्शनास जाण्याची आज्ञा दे. असें बोलतांच ती गंधर्व स्त्री दिव्यदेह पावून कल्कीस नमन करून स्वर्गलोकीं गेली.

नंतर कल्की तेथें एक दिवस राहिला आणि त्या नगरींत माहामती राजाची स्थापना केली. तेथून परिवारासह अयोध्यापट्टणास येऊन, त्या स्थानीं मरु राजास स्थापिलें. मग मथुरेस येऊन तेथील राज्यावर शशिध्वजपुत्र सूर्यकेतूस बसविलें. नंतर हस्तनापुरास देवापी राजाची स्थापना करून, कल्की जयवाद्यें वाजवीत शंभल गांवांत आला.

मग कल्कीनें आपल्या कवि, प्राज्ञ, सुमंत्रक आदि पांच भावांची शौंभ, पुलिंग, सुराष्ट्र, पौंड्र व मागध या पांच देशांत स्थापना केली. गोत्रजांस अंग, वंग, मध्यकर्नाट, आंध्र, कलिंग, मौंड्र, कीकट हे सात देश दिले. द्वारकेजवळील चौल बर्बरादिक देश पुत्रांस वांटून दिले, आणि दिग्विजय करून आणलेलें असंख्य धन बापास अर्पण केलें व ग्रामवासी जनांस आश्वासन देऊन पद्मा व रमा यांसह शंभळी

ग्रामांत सुखानें नांदूं लागला. त्यामुळें आबालवृद्ध जनांस सुख होऊं लागलें.

असा तो वैकुंठराणा कल्की पृथ्वीवर नांदूं लागल्यापासून देशांतील आधिव्याधि दुःख, दरिद्र नाहींसें झालें, भूमीस अपार पीक आलें; ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चारी वर्ण आपआपल्या धर्माप्रमाणें चालूं लागले. अशी कथा सूतांनीं शौनकादिकांस सांगितली. ती ऐकल्यावर ऋषींनीं प्रश्न केला कीं–सूतमुने ! शशिध्वज राजा वनांत जातांना मायेचें स्तवन करून गेला; तें मायास्तवन आम्हांस सांगावें. मग सूत ह्मणाले–पूर्वीं मार्कंडेयानें हाच प्रश्न शुकाला केला होता. तेव्हां त्यानें जें सांगितलें तेंच तुह्मांस सांगतों श्रवण करा.

विष्णुभक्त शशिध्वज जेव्हां अरण्यांत जावयास निघाला तेव्हां मायेचें स्तवन करूं लागला. तो ह्मणाला–हे आदिमाये ! तूं शुद्ध सत्वगुणमयी असून विशुद्धरूपिणी आहेस. तूं ब्रह्मा, विष्णु, महेशाची माता, तुझा महिमा वेदांसही कळला नाहीं. भूतगण व पंचतन्मात्रा तुझ्या कुक्षींत वसत आहेत. देव, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, आदि देवता तुला वंदन करितात. तुझी लीला प्राण्यांस संसार प्रपंच्यांत पाडते. अशा माये!तुला मी नमन करितों. हे मायादेवी!तुला, आदि मध्य,

अंत नसून प्राण्यांस तुझा आधार आहे. एकनिष्ठ भावानें तुझी उपासना केली असतां तूं प्रसन्न होतेस. देवता, पशुपक्षी, मनुष्यें यांपासून तूं अलिप्त आहेस. तुझ्या प्रकाशावांचून ब्रह्मदेवानें उत्पन्न केलेल्या वस्तूंवर तेज पडत नाहीं. अशी तूं ब्रह्मरूपिणी तुला वंदन करितों. तूं चिदाभासरूपानें जलांत रस, तेजांत रूप, भूमींत गंध, पवनांत स्पर्श व आकाशांत शब्द उत्पन्न करून अनेक रूपांनीं जगांत प्रगट होतेस, अशी तूं विश्वरूपिणी आहेस. सावित्री, लक्ष्मी, पार्वती हीं तुझींच रूपें असून तूं विश्वांत भरून उरली आहेस. तूं कामरूपिणी अनेक मूर्तींनीं प्रकाशित झाली आहेस, यज्ञयोग साधनांनीं तुझी पूजा करितात. देवी! कालिका, दुर्गा, चंडिका हीं तुझींच नांवें आहेत त्या तुला साष्टांग दंडवत असो.

अशा प्रकारें शशिध्वज राजा स्तवन करून वनांत कोकमुखीं जाऊन निरंतर श्रीहरीचे रूपाचें ध्यान करित बसला. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर, सुदर्शनानें मरण येतांच, दिव्य देह पावून विमानांत बसून मोक्षसदनीं गेला.

---

२४०५३
५२१
६२

## अध्याय ३२ वा.

# जीव-मायासंवाद व विष्णुयशाची देहमुक्ती.

कल्कीनारायण शंभल ग्रामांत सुखानुभव घेत असतां, त्याचा बाप विष्णुयश याच्या मनांत जगाच्या कल्याणास्तव यज्ञ करून देवतांस संतुष्ट करावें असें येतांच, त्यानें तो विचार कल्कीस कळविला. तेव्हां कलंकी सर्व परिवारासह प्रयागास येऊन यज्ञ सामग्री सिद्ध करून, भार्गव, कृप, वशिष्ठादिकांस बोलावून आणून, विष्णुयशास दिक्षा देऊन यज्ञाची सुरवात केली. रोज लक्षावधि ब्राह्मणांस भोजनें होऊं लागलीं. त्या स्थानीं रंभा उर्वशी तिलोत्तमा यांचें नृत्य व गण गंधर्वांचें गायन चाललें होतें. ती अवर्णनीय शोभा पाहण्याकरितां देशोदेशींचे असंख्य लोक आले होते. सर्व सामग्री विष्णु पुत्ररूपानें पुरवित होता. नंतर तो यज्ञ समाप्त होतांच, विष्णुयशानें अनेक प्रकारचीं दानें, वस्त्रालंकार, रत्नें, इत्यादि सर्वांस देऊन त्यांची तृप्तता केली, त्यामुळें आलेल्या लोकांनीं विष्णुयशाची वाखाणणी केली.

मग वशिष्ठादि ऋषींनीं विष्णुयशास मध्यस्थानीं बसवून, पूर्वींच्या राजांचीं चरित्रें सांगण्यास आरंभ केला. इतक्यांत नारदमुनी तुंबरूसह त्या स्थानीं आले. त्यांचा विष्णु-

यशानें योग्य सत्कार, व पूजन करून आसनावर बसवून प्रार्थना केली कीं, हे देवऋषे, नारदमुने ! आज माझ्या शत-जन्माचें पुण्य फळास आलें ह्मणून आपणासारख्याचें दर्शन झालें. तरी मी या भवसागरांतून कोणत्या कर्मानें तरून अखेरचे मोक्षपदास प्राप्त होईन तें मला सांगावें.

असा विष्णुयशाचा प्रश्न ऐकून नारद ह्मणाला–अहो ! या ब्रह्मांडोदरांत माया मोठी बलवत्तर आहे. पहा हा कल्की माता पिता बांधवांस मुक्ति देत नाहीं. कल्की उत्पत्ति स्थिति प्रळयकर्त्ता पूर्ण ब्रह्म, विष्णुयशाचा पुत्र झाला आहे आणि विष्णुयश त्यास सोडून मला हात जोडून मुक्तीची इच्छा करितो याबद्दल मला आश्चर्य वाटतें. ईशमाया अति गहन असून, हिचें वर्णन कोणासही झालें नाहीं. मायेनें सर्व त्रिभु-वन व्यापिलें आहे. असा विचार करून नारद विष्णुयशास ह्मणाला–हे कल्कीताता ! तुला जीवमाया संवादाची कथा सांगतों श्रवण कर.

एके समयीं जीव देहाचा आश्रय धरून असतां, माया त्यास ह्मणाली–अगा जीवा ! मी ईशमाया, तुझा त्याग केल्यास या शरिरांत कसा वांचशील ? जीव ह्मणाला–दे-हाच्या आश्रयाशिवाय मी वांचत नाहीं, व मी, माझें ह्मणणें हें देहावांचून कसें होईल ? माया बोलली–देहास

आलिंगन दिल्यानें जी बुद्धि होते तीच तुझी कायम कां राहाते ? मायेधीन चेष्टांवांचून तुझ्या दुसऱ्या कोणत्या चेष्टा तें मला सांग पाहूं ? जीव ह्मणाला-माझ्या अधिकारावांचून विषयप्रकाश होत नाहीं. माया बोलली-चैतन्यरहित नर माझ्या योगानें सचेतन होतात.

अशा या मायेच्या वचनानें जिवास कोप येऊन ह्मणाला-मूर्खे ! माझ्या संसर्गानें तूं नाना नामस्वरूपिणी झाली आहेस. असें असतां जशी व्यभिचारीण स्त्री आपल्या पतीची निंदा करते तशीच तूं माझी निंदा करतेस. माझ्या ऐश्वर्याच्या आभावानें तुझे गुण लोपून जातील. ह्मणून मला आवरून बसली आहेस. माझ्या आश्रयानें अनेक लीला करतेस पण त्या सर्व मिथ्या आहेत. सनातन परमात्म्याच्या आधीन तूं असून सर्व ब्रह्मांड व्यापून आहेस. हें पंचभूतात्मक शरीर आत्म्याच्या प्रवेशानें चालतें. आत्मा बाहेर जातांच भूतांचा लोप होतो. नानारूपें व नामें मायाकृत असून कोट्यावधि ब्रह्मांडें मायेनें व्यापिलीं आहेत. अशी जी दारुण माया ती तुझा पुत्र कल्की याच्या आधीन आहे. यास्तव विष्णुयशा ! तूं आतां ईशमाया जाणून, लक्ष्मीकांतास शरण जाऊन आपली सार्थकता करून घे. तृष्णा, आशा, लोभ, ममता सांडून अंतरीं शांति वैराग्याचा स्वीकार कर. आणि जग-

द्रूपी श्रीभगवंत व भगवंतस्वरूपी सर्व जग असें ज्ञानदृष्टीनें पाहून आत्म्यास आत्मा मिळव ह्मणजे मोक्षपदाला पावशील.

असा नारदानें विष्णुयशास उपदेश केल्यावर, त्याचा निरोप घेतला. मग तुंबरू व नारदानें कल्कीस प्रदक्षिणा घालून ते दोघे कपिलाश्रमास गेले. इकडे विष्णुयश आपला कल्की पुत्र हा प्रत्यक्ष नारायण असें जाणून सर्व संगांचा परित्याग करून स्त्रीसह बदरिकाश्रमीं गेला. तेथें उग्र तपश्चर्या करून कांहीं काळ लोटल्यावर एके समयीं आपोआप जिवाची ब्रह्मीं योजना करून पंच भौतिक शरिराचा त्याग करून श्रीहरीच्या सायुज्यपदास गेला. असें कल्कीमाता सुमतीनें पाहून तीही पतिबरोबर सती गेली.

ती बातमी ऋषीमुखानें कल्कीनें ऐकून अपार शोक केला. नंतर मातापितरांचें उत्तर कार्य केल्यावर, कल्केश्वर पद्मा व रमा यांसह शंभली ग्रामांत राज्य करूं लागला.

---

## अध्याय ३३ वा.

# परशुरामकथित रुक्मिणीव्रत व रमेस पुत्रप्राप्ती.

कल्की पद्मा व रमा यांसह शंभल ग्रामांत सुख भोगीत असतां, महेंद्राचलाहून परशुराम तीर्थयात्रा करित तेथें आला.

तो भार्गव कल्कीचा गुरु आला असें कल्कीस समजतांच, दोन्हीं स्त्रियांसह कल्कीनें सामोरें जाऊन साष्टांग नमस्कार करून घरीं आणून षोडशोपचारें पूजन करून सिंहासनावर बसविलें. मग उत्तम प्रकारचीं पक्कान्नें घालून, अमूल्य वस्त्रालंकार अर्पण केल्यावर, त्यास पलंगावर निजवून, कल्की चरण चुरूं लागला व दोन्ही स्त्रिया पंख्यानें वारा घालूं लागल्या. तेव्हां गुरूजी संतोषित झाले. मग कल्कीनें हात जोडून प्रार्थना केली. पद्मारमण ह्मणाला—गुरो भार्गवा! तुमच्या प्रसादानें माझे धर्म, अर्थ व काम पूर्ण झाले, त्यामुळें मी जगांत धन्य झालों. परंतु गुरूजी एक विनंति आहे. ती हीच कीं—ही माझी कनिष्ठ रमा कांता हिच्या वचनाकडे लक्ष पुरवावें. असें हृषिकेशी बोलतांच, रमा हात जोडून ह्मणाली—अहो भार्गवा परशुरामा! मी पुत्राची इच्छा करित आहें. तरी कांहीं व्रत जप नियम सांगून माझी इच्छा पूर्ण करावी. असें ऐकतांच परशुराम ह्मणाला—हे कल्कीकांते! रुक्मिणी-व्रताचें आचरण कर ह्मणजे तुला सुपुत्र होईल. असें ऐकून रमा ह्मणाली—हें व्रत कोणी केलें होतें व याचा विधी काय तो मला कथन करावा. मग परशुराम सांगूं लागला.

भार्गव ह्मणाला—पूर्वीं ययाति नांवाचा राजा महापराक्रमी होता त्याला शुक्राची कन्या देवयानी व वृषपर्वा दैत्याची

कन्या शर्मिष्ठा फार सुंदर होती. राजाला शुक्रानें अशी आज्ञा केली होती कीं " शर्मिष्ठेच्या रूपास मोहून जर तिशीं रत होशील तर तुला वृद्धपण प्राप्त होईल. " शापामुळें राजानें विचार केला कीं, या शर्मिष्ठेच्या सुंदर रूपापुढें मला मदनाची बाधा होऊन शुक्रवचनाप्रमाणें वृद्धावस्था प्राप्त होईल. यास्तव तिला दूर ठेवावी असा विचार करून तिला एकांतस्थानीं नेऊन ठेविलें. त्या दिवसापासून तिला पतीचें दर्शन नाहीं.

मग ती शर्मिष्ठा एके दिवशीं भागीरथी तीरीं जाऊन रुदन करित बसली. तों तेथें जवळच विश्वामित्र ऋषिजवळ कित्येक स्त्रिया व्रत करित बसल्या होत्या त्या तिच्या दृष्टीस पडल्या. त्यांनीं केळीचे खांब लावून मखर तयार करून त्यांत चतुष्कोनी वेदिका स्थापून त्यावर अष्टदल कमल काढून वासुदेवाची मूर्ति स्थापन केली होती, आणि सर्वोपचारांनीं पूजा करित बसल्या होत्या. असें पाहून शर्मिष्ठा त्यांच्याजवळ जाऊन ऋषीस नमन करून, व्रतस्थ नारींस दीनवाणीनें म्हणाली—मी वृषपर्वा दैत्याची मुलगी व ययाति राजाची कनिष्ठ कांता असून, माझा पतीनें त्याग केला म्हणून मी दीन झालें आहे. तों दैवयोगानें तुमचें दर्शन

झालें. तरी आतां हें व्रताचरण माझ्याकडून करवून माझें रक्षण करावें.

असें तिचें वचन ऐकतांच, स्त्रियांस दया येऊन त्यांनीं आपल्या पूजा साहित्यांतून थोडें साहित्य तिला देऊन, तिजकडून व्रत करविलें. त्या व्रताचे प्रभावानें पतीची भेट होऊन तिला तीन पुत्र झाले. अशा या रुक्मिणीव्रताच्या आचरणानें दुःखांचें निवारण होऊन पुत्रपौत्रादि संतति प्राप्त होते व जगांत सुख मिळतें. हेंच व्रत सीतेनें पतिवियोगास्तव अशोक वनांत केलें होतें, व बृहदश्वाच्या उपदेशावरून द्रौपदीनेंही आचरिलें होतें. ह्मणून त्या दोघी दुःखांतून मुक्त होऊन पतिपुत्रांसह सुखानें नांदल्या.

अशी परशुरामाची वाणी ऐकून रमेनें त्या व्रतास वैशाख शुद्ध द्वादशीच्या दिवशीं भार्गवासमोर आरंभ करून यथाविधीनें वासुदेवाची पूजा केली. असें हें व्रत चार वर्षें आचरण करून लक्षावधि ब्राह्मणांस पक्वान्नाचीं भोजनें घातलीं. मणी, रत्नें, सुवर्ण, वस्त्रालंकार ब्राह्मणांस अर्पण केले. सुवासिनीचीं पूजनें केलीं. विष्णुप्रीत्यर्थ भूमी, ग्राम, सदनें, सालंकार गाई यांचीं दानें केलीं. असें हें रुक्मिणीव्रत करून रमा कल्कीबरोबर सुख भोगित असतां, तिला दोन पुत्र झाले. एकाचें नांव मेघमाल व दुसऱ्याचें बलाहक. ते दोघे रमेचे पुत्र शूर

वीर बळवान सीतेच्या लवांकुशासारखे भासत होते. अशा या रुक्मिणीव्रतानें रमेचे मनोरथ पूर्ण होऊन ती पतिपुत्रांसह उत्तम प्रकारचे भोग भोगीत शंभल गांवांत सुखानें नांदूं लागली.

---

अध्याय ३४ वा.

# कल्कीची स्त्रियांबरोबर विलासक्रीडा.

आतां कल्कीनें केलेलें कर्म कथन करितों. त्याच्या श्रवणानें उत्तम गति प्राप्त होईल. कल्की शंभल ग्रामांत बंधु पुत्र व आप्तांसह नांदत असतां हजार वर्षें लोटलीं. ती शंभल नगरी इंद्राच्या अमरावतीसारखी शोभत होती. तींत ठायीं ठायीं पताकाध्वज फडकत असून, तेथें अडसष्ट तीर्थें उत्पन्न झालीं होतीं. सर्व जन आपला धर्म नित्य नेमानें पाळित असत. अशी ती नगरी वैकुंठासारखी शोभत होती. त्या नगरींत कल्कीराणा दोन स्त्रियांसह प्रसन्न मनानें रमत असे.

एके दिवशीं कल्की इंद्रानें दिलेल्या यथेच्छ गमन करणाऱ्या रथांत नारीजनांसह बसून वनोपवनें, पर्वत फिरत स्त्रियांबरोबर लताकुंजांत स्त्रीलंपटासारखा रमत होता. त्या वेळीं तो पक्ष मास किंवा रात्र दिवस कांहींच जाणत नव्हता. असा रमत रमत इंद्रनील मण्यानें प्रकाशित असलेली महा-

पर्वताची गुहा होती तींत प्रवेश करता झाला, त्याच्यामागून पद्मा व रमा हजार स्त्रियांसह गिरिकंदरीं पतीबरोबर रमावें अशा इच्छेनें चालल्या असतां एक अद्भुतपुरी पाहात्या झाल्या. तींत इंद्रनीलाचें तेज पडलें असून, त्यांतून स्त्रियांचीं प्रतिबिंबें दिसत असून, मध्यभागीं नूतन मेघाप्रमाणें श्याम-वर्ण स्वपतीचें प्रतिबिंब पाहून चकित होऊन खिन्न झाल्या. मग पद्मेनें नेत्रांतील काजळ काढून नखानें कल्कीचें व शुकाचें चित्र काढलें व कल्कीस्वरूप ध्यानांत आणून नम-स्कार घातले व पूजा केली. तों त्या कल्कीस्वरूपांत तिच्या चित्तवृत्ति निमग्न होऊन ती भूमीवर पडली. मग सावध होऊन पद्मा, रमा व सर्व स्त्रिया स्तुति, पूजन नृत्य करूं लागल्या तेव्हां त्यांची इच्छा जाणून वैकुंठनाथ जसा हत्तींच्या कळपांत सिंह शिरावा त्याप्रमाणें स्त्रीसमूहांत प्रगट होऊन सर्वांस आलिंगन देता झाला.

नंतर कल्की सर्व स्त्रियांस रथांत घालून फिरावयास निघून वनोपवनें, स्वर्गभुवन, कुबेराचा बाग, इंद्राचें वन, गिरिकंदरीं, गगनांत फिरून ज्या स्त्रीचें जसें मन,तिच्या प्रमाणें तिशीं रत झाला. अशा प्रकारें सर्व स्त्रियांच्या कामना पूर्ण केल्या. तो पद्माकांत रतिप्रसंगीं कमलेचें मुखकमलामृत प्राशून अति मस्त व रमेच्या कोमलांगाच्या उटण्यानें रतिप्रसंगीं वासरंगी

होई, आणि इतर ज्या स्त्रिया त्यांच्या रतिप्रसंगीं कुचकुंकुमानें आरक्तदेही होत असे. अशा प्रकारें कल्की रमत असतां आपला, दुसऱ्याचा देह किंवा रात्र दिवस हें त्यास कांहींच कळत नव्हतें. तशाच पद्मा रमादि स्त्रिया कल्कीस स्तनाच्या मध्यभागीं आलिंगन देऊन रत होत असत. मग त्या सर्व सुंदरी वनविहारानें विकळ झाल्यामुळें कल्कीबरोबर जलक्रीडा करण्यास सरोवरांत जाऊन, पोहण्या घेणें, उड्या मारणें, परस्परांमागें लागणें इत्यादि क्रीडा करून, संतोष पावल्या. असें हें कल्केश्वराचें क्रीडाख्यान जे नर श्रवण पठण करतील त्यांस मुक्ति मिळेल.

---

अध्याय ३५ वा.

## कल्कीपुत्रांची राज्यावर स्थापना व कल्कीचें वैकुंठीं गमन.

मग ब्रह्मादि देवगण, महर्षि, गंधर्व, सिद्ध, चारण, किन्नर, अप्सरा आदिकरून मंडळी आपापल्या वाहनीं बसून, कल्केश्वराच्या दर्शनास शंभलग्रामीं आली. ती शंभल नगरी सुवर्णाच्या तटांनीं व रत्नखचित मंदिरांनीं केवळ दुसरी लं-

काच अशी शोभत होती. तिच्या मध्यभागीं सभामंडपांत जगन्निवास कल्केश्वर भूपांनीं वेष्टित बसला होता. त्याच्या अनुपम्य स्वरूपावरून कोटी मदनांची कुर्वंडी करून टाकावी. त्याच्या लावण्यास रंभा उर्वशी मेनका नागिणी भुलून कामज्वरानें पीडित होऊन तटस्थ झाल्या. अशा त्या कल्केश्वरास देवांनीं पाहतांच त्यांस हर्ष होऊन, ब्रह्मदेवास पुढें करून स्तवन आरंभिलें. तें असें कीं–हे जगदीश्वरा लक्ष्मीपती! तूं अनंतकोटी ब्रह्मांडांचा ईश त्रिगुणातीत मायेपरता असून, ब्रह्मा विष्णु महेश हे सर्व तुझे दास आहेत. तूं उत्पत्ति, स्थिति, लय कर्त्ता असून, तुझ्यायोगें विश्व चालतें. तूं प्रत्यक्ष श्रीभगवान् धर्म रक्षणासाठीं पृथ्वीवर मनुष्यरूपानें स्त्रीसह अवतार घेतलास. म्लेंच्छ बौद्धादि पाखंडी जन, अधर्म, कलीकुल यांचा स्वबळानें विध्वंस करून कृतयुगाची स्थापना केलीस. तुला येथें उत्पन्न होऊन पुष्कळ दिवस झाले तरी आतां कृपा करून वैकुंठास चलावें. तुझ्यावांचून आम्हीं स्वर्गांत दिनासारखे झालों आहोंत म्हणून शरण आलों आहों. तरी आमचें रक्षण कर.

असें देवांचें वचन ऐकून, कल्की हर्षित होऊन वैकुंठीं जाण्याचा विचार करूं लागला. मग जय, विजय, मेघमाल व बलाहक अशा चार पुत्रांस सभेत बोलावून राजधर्माचा उ-

पदेश करून राज्यावर स्थापिलें आणि प्रजा जनांस पाचारून आपलें वृत्त सर्वांस सांगूं लागला.

कल्की म्हणाला—सकल जनहो ! मी प्रत्यक्ष आदिनारायण व माझी कांता लक्ष्मी ही पद्मा झाली आहे. पूर्वी पृथ्वीवर कलियुगांत अधर्म कली फार मातले त्यांच्या संहारार्थ देवांनीं माझी प्रार्थना केली ह्मणून मी मानवावतार घेऊन, अधर्म, कली यांचा व बौद्ध म्लेंच्छ बर्बर चौन इत्यादि पाखंड्यांचा संहार केला आणि कृतयुगाची स्थापना करून, यथान्याय धर्माचरण लावून तुमचें आजपर्यंत पालन केलें. आज येथें मला बोलाविण्याकरितां देव आले आहेत, तरी मी आतां निजधामास जातों. हे माझे चार पुत्र तुमचें रक्षण करतील.

असें कल्कीचें वचन ऐकून, प्रजाजन स्फुंदस्फुंदून रडत प्रार्थना करून ह्मणाले—हे भक्तरक्षका जगदीशा ! आजपर्यंत आमचें रक्षण करून, आतां वैकुंठीं जावयास सिद्ध झालास तरी तूं जिकडे जाशील तिकडे आह्मींही येणार. आह्मीं जर तुला सोडूं तर येथें व परलोकीं आह्मांस शोक होईल, यास्तव आह्मीं तुजमागून येणार हें खास. तूं जर आह्मांस फसवून जाशील तर प्राणत्याग करूं

अशी प्रजेची वाणी ऐकून कल्कीनें त्यांचें शांतवन केलें. नंतर कल्की पद्मा व रमा यांसह हिमाद्रीसंबंधी पुण्यवनास गेला. पुढें जें निजधामगमन आख्यान तें फारच दुःखदायक ह्मणून श्रोत्यांची विनवणी करितों कीं, रामविजयादि प्राकृत ग्रंथ कवींनीं वर्णन केले; त्यांत निजधामीं जाण्याचें कोणींच वर्णन केलें नाहीं. ह्मणून येथेंही लिहिलें नाहीं.

---

अध्याय ३६ वा.

## ग्रंथसमाप्ति.

कल्की पुण्यवनास जातांच समस्त प्रजाजनांस दुःख झालें. मग कल्कीच्या आज्ञेनें कृतयुग व सद्धर्म पृथ्वीवर सुखानें संचार करूं लागले. तसेंच मरु, देवापी राजे सद्धर्मानें प्रजा पालन करूं लागले. विशाखयूप राजास कल्की निजधामीं गेला असें कळतांच, तो पुत्रांस गादीवर बसवून पुण्यवनास गेला. त्याच प्रमाणें इतर राजे कल्की विरहानें स्त्रीपुत्रांचा त्याग करून अरण्यांत गेले. पुढें सत्ययुगांत धार्मिक राजे होऊन अपार सुख पावतील. ते यज्ञयागादि सत्कर्में करतील, तेणेंकरून देवांस अवदानें मिळतील. पृथ्वी अपार पीक देऊं

लागेल. त्यामुळें आबालवृद्ध जनांस फार सुख होईल. असें हें कल्कीचरित्र मार्कंडेयादि ऋषींस शुकदेवानें सांगितलें. तें ऐकून ऋषी कल्कीचे गुणानुवाद गाऊं लागले. नंतर शुकदेव नरनारायण आश्रमीं गेला.

या कल्की चरित्राच्या श्रवणानें शोक, संताप, पाप, कलिदोष यांचें दहन होऊन मोक्षप्राप्ती होते. ही कल्कीचरित्राची कथा भागवतांत वर्णन केली असून, मत्स्य कूर्मादि दहा अवतार जे श्रीहरीनें घेतले त्यांतील जो परशुराम अवतार त्याचें कोंकणक्षेत्र सह्याद्री तळीं आहे, तेथें राजापूर नामक नगरांत धूपपापेश्वर नामक गांव आहे. तेथील धूतपापेश्वरलिंगाचे पुजारी घगवे नांवाचे असून, त्या कुळांत पंडितनायक सदाशिव, त्याची पतिव्रता बायको पार्वती. तिच्या पोटीं विठ्ठल नांवाचा पुत्र वेदशास्त्रांत व ज्योतिषांत प्रवीण झाला. त्याची स्त्री रुक्मिणी, तिच्या पोटीं विठ्ठलापासून रघुनाथ जन्मला. तो तर्कज्ञानी महाशास्त्री निपजला. त्याची पत्नी सीता तीच माझी माता. त्या रघुनाथसीतेपासून मी परशुराम जन्मून मातापित्याची सेवा करित होतों. त्यांनीं कल्कीविजय नामक कथा प्राकृत भाषेंत वर्णन करावी अशी माझ्या मनांत प्रेरणा उत्पन्न केली. मग

मी आरंभ करून शके १७९८ धातृ संवत्सर, ज्येष्ठ महिना, मंगळवार पौर्णिमा त्या दिवशीं ग्रंथाची समाप्ती केली.

हा ग्रंथ श्रवण केल्यानें दारुण पापें भस्म होतात, याचीं अकरा आवर्त्तनें भक्तीनें केलीं असतां पुत्र पौत्र धन धान्य गोधनें अक्षय्य होतील आणि या लोकीं मनोरथ पूर्ण होऊन अंतीं मोक्षसदन प्राप्त होईल.

आतां छत्तिस अध्यायांतील कथा संक्षेपानें सांगतों श्रवण करान्या. पहिल्या अध्यायांत मंगलाचरण, कल्किपुराणाचें आदि कारण व भविष्य कलीचें विवरण केलें आहे. कलि अधर्म फार माजले ह्मणून ब्रह्मादिक देव गाईरूपी पृथ्वीसह श्रीहरीस शरण गेले. त्यांच्या कैवारास्तव विष्णूनें शंभल गांवांत विष्णुयश ब्राह्मणाचे पोटीं जन्म घेतला. हें दुसऱ्यांत सांगितलें आहे. तिसऱ्यांत कल्कीची मुंज, भार्गवापासून विद्याप्राप्ती व शिवापासून अश्व, शुक्र, खड्गाची प्राप्ती. चवथ्यांत विशाखयूप राजास कल्कीनें साधुधर्म सांगितला व शुकानें कल्कीस पद्मेचें वृत्त कथन केलें. पांचव्यांत पद्मेच्या स्वयंवरांत सर्व राजे स्त्रीरूप पावले. सहाव्यांत पद्मेचा व शुकाचा संवाद. सातव्यांत पद्मेनें शुकाला हरिभक्तीचें विवरण व अर्चन विधान सांगितलें. आठव्यांत शुकानें पद्मेचा समाचार सांगतांच कल्कीनें सिंव्हलीं गमन केलें. नवव्यांत कल्की पद्मेची उप-

वनांत भेट व संवाद. दहाव्यांत पद्मेचें पाणिग्रहण व राजांची स्त्रीरूपांपासून मुक्तता. अकराबाराव्यांत राजांस अनंतमुनीनें मायादर्शन निरसन सांगितलें. तेराव्यांत कल्की पद्मेसह शंभळ गांवांत येऊन, सैन्यासह दिग्विजयास निघाला. चौदाव्यांत कल्कीनें कीकट देशांत जाऊन जीन राजास मारलें. पंधराव्यांत जीन राजाचा बंधु शुद्धोदन यास सैन्यासह जिंकला. सोळाव्यांत जीनांच्या स्त्रिया कल्कीस शरण आल्या. सत्राव्यांत हिमपर्वतावरील कुथोदरीस व तिच्या पुत्रास मारलें. पुढील दोन अध्यायांत हरिद्वारीं मरु देवापींनीं आपापलें वृत्त कथन केलें. विसाव्यांत कलीच्या नाशार्थ निघून शक कांबोजादिकांस व कलिकुलास देशोधडीस लाविलें. बाविसाव्यांत कोक विकोकास मारिलें. तेविसाव्यांत शशिध्वज राजाबरोबर युद्धास सिद्ध झाला. चोवीस पंचविसाव्यांत शशिध्वजाच्या पुत्रांनीं मरु देवापि व कल्की सैन्यास युद्धांत पाडिलें व शशिध्वजानें कल्कीस मूर्च्छित पाहून घरीं नेलें, मग त्याच्या स्त्रीनें सुंदर गीतें गाऊन त्यास उठविलें. सव्विसाव्यांत रमेचें व कल्कीचें लग्न लागलें. सत्ताविसाव्यांत शशिध्वजराजानें भूपांस पूर्वजन्मवृत्त कथन केलें. अठ्ठाविसाव्यांत शशिध्वजानें राजांस श्रीहरिभक्ती भक्तलक्षण सांगितलें. एकुणतिसाव्यांत भक्ति भक्त माहात्म्य, लि-

साव्यांत जांबुवंताचा समाचार. एकतिसाव्यांत विषकन्येचा उद्धार करून मरु देवापीस राज्यावर स्थापिलें. बत्तिसाव्यांत नारदाच्या उपदेशानें विष्णुयश वनांत जाऊन मोक्षसदनीं गेला. तेतिसाव्यांत परशुरामाच्या उपदेशानें रमेनें रुक्मिणीव्रत आचरतांच, तिला दोन पुत्र झाले. चौतिसाव्यांत कल्कीनें स्त्रियांबरोबर वन–जलक्रीडा केली. पस्तिसाव्यांत कल्की पुत्रांस राज्यावर बसवून स्त्रियांसह निजधामीं गेला. छत्तिसाव्यांत समस्तजन व देवगण संपूर्ण सुख पावले. असा हा छत्तिस अध्यायांचा ग्रंथ भक्तिभावानें श्रवण पठण करून, यांत कांहीं न्यूनाधिक असल्यास श्रोतेजनांनीं क्षमा करावी. अशी सविनय प्रार्थना करून, श्रीकल्कीनारायणास साष्टांग नमन करतों.

समाप्त.

प्रिंटर–श्रीराम सीताराम वर्तक, "शंकर" प्रिंटिंग प्रेस, चौपाटी पोष्टाजवळ मुंबई. नं० ४.

प्रकाशक–पी. बी. पाठक, बुकसेलर्स जुम्मामसीद, प्रिन्सेस स्ट्रीट मुंबई नं० २. व गिरगांव मुंबई नं० ४.